हुंडा नाटक.

(सचित्र.)

रचणार

गणपतराव सोकरजी त्रिलोकेकर.

किंमत १ रुपया.

॥ श्री ॥

हुंडा नाटक.

(सचित्र)

हें

(संसारिक नाटक)

गणपतराव सोकरजी त्रिलोकेकर
(मुंबई हायकोर्टांतील सीनियर ट्रान्स्लेटर व इन्टरप्रिटर)

यांनीं रचून

मुंबईंत,

जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्यांत छापिलें.

सन १९०४.

किंमत १ रुपया.

हा ग्रंथ

मराठी संगीत नाट्यकलेचे आद्य प्रवर्तक,

नाट्यकलाभिज्ञ

माझे परमपूज्य तीर्थरूप

रा. रा. सोकर बापूजी त्रिलोकेकर

(संगीत हरिश्चंद्र इत्यादि नाटकांचे कर्ते)

यांस

पितृभक्तिपुरःसर

अर्पण करितों.

ग० सो० त्रि०.

॥ श्री ॥

प्रस्तावना.

श्लोक—(शार्दूलविक्रीडित).

पाठारेप्रभुकन्यका उपवरा ऐशा गणाव्या किती ॥
दुर्दैवी धनहीन आत्मजनकां चिंतानलीं लोटिती ॥
हृद्रोगें झुरती अशा तरि किती जाती स्वधामाप्रती ॥
हुंड्याचा परिणाम दुष्ट किति हा ज्ञाते कसे नेणती ॥

(सो० वा० त्रि०)

संसारिक अथवा सामाजिक नाटकें ज्यांस इंग्रजींत 'सोशियल प्लेझ्' ह्मणतात अशीं नाटकें पाश्चिमात्य लोकांत पुष्कळ वर्षांपासून प्रचारांत आहेत, व त्यांचा खरा गुण व उपयोग त्यांस पूर्णपणें अवगत आहेत. एखाद्या समाजांतील गुण-दोषांचें हुबेहुब चित्र वाचकांच्या अथवा प्रेक्षकांच्या मनावर उत्तम रीतीनें ठसा उमटेल अशा प्रकारें रेखण्यास संसारिक नाटकासारखा दुसरा सुलभ व खातरी-लायक मार्ग नाहीं हें निर्विवाद आहे. शेरिडन, गोल्डस्मिथ वगैरे प्रख्यात आंग्ल-नाटककारांनीं व मोलियर वगैरे फ्रेंच नाटककारांनीं लिहून ठेविलेलीं नाटकें या गोष्टीची प्रत्यक्ष साक्ष देत आहेत.

वरील प्रकार आपणांस माहित असोन व नाट्यकला आपल्या लोकांत आज बरींच वर्षें प्रचारांत असोन, आपल्या लोकांत अशा तऱ्हेचीं नाटकें फारच थोडीं झालीं आहेत ही एक अति आश्चर्याची गोष्ट नव्हे काय! परंतु त्यांत आश्चर्य कशाचें! सुधारणेच्या इतर बाबतींत ज्याप्रमाणें आपलें पाऊल पाठीमागें त्याप्र-माणें याहि बाबतींत तें तसें असावें यांत नवल काय? शिवाय, लोकांस संगीत नाटकांचा नाद लागल्यापासून सामाजिक नाटकें—जीं वास्तविक गद्यात्मकच अ-सलीं पाहिजेत—त्यांकडे दुर्लक्ष्य होणें हें साहाजिकच नव्हे काय? असो.

अशा प्रकारचें एखादें नाटक रचावें असें मला वाटल्यावरून परक्या समाजा-पेक्षां स्वताचा समाज जास्त परिचयाचा व निकट संबंधाचा असल्यामुळें त्यांतच विषयशोधनार्थ पाहूं लागलों. या सुमारास आपल्या जातींत हुंड्याचें बरेंच

वंड माजलें होतें (तें अद्यापिहि तसेंच जारीनें चालू आहे). या स्थितीचें हुबेहुब वर्णन आमच्या तीर्थरूपांनीं रचून दिलेल्या व प्रस्तावनेच्या सुरवातींत छापलेल्या फक्त एका श्लोकांतच चटकदार रीतीनें येऊन गेलें आहे. तर अशा अनिष्ट-परिणामी चालीपासून होणाऱ्या अनर्थाचें चित्र यथामति आपल्या ज्ञातिबांधवां-पुढें नाटकरूपानें ठेवण्याच्या हेतूनें मीं प्रस्तुतचें नाटक रचिलें. पुढें त्या नाटकाचे प्रयोग '**धी प्रभु ॲमेच्युअर्स**' नामक मंडळी (ज्या मंडळींतील पात्रांचीं नांवें नाटकपात्रांच्या यादींत दिलीं आहेत)—त्या मंडळीनें आपल्या ज्ञातींतील सरळ व शुद्ध मनाचे, निस्पृह व नाट्यकलाप्रवीण **रा. रा. बाळकृष्ण वासुदेव नारायण कीर्तिकर** व इतर नाट्यकलामर्मज्ञ गृहस्थांच्या देखरेखीखालीं सन १८९५ सालीं मुंबईंत गेइटी थिएटरांत करून दाखविले. ही मंडळी सुशिक्षित व विद्वान् असल्यामुळें ते प्रयोग इतके उत्तम वठले कीं पुन्हा त्या नाटकाचे प्रयोग करून दाखविण्याच्या अनेक सूचना मंडळीस आल्या; परंतु कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें तसा योग घडून आला नाहीं.

वरील नाटकप्रयोग झाल्यानंतर या नाटकाविषयीं अनुकूल व सविस्तर असा अभिप्राय त्या वेळच्या मुंबईवैभवामध्यें आला होता. तसेंच जिकडून तिकडून पुस्तक छापवून प्रसिद्ध करण्याच्या शिफारसी होऊं लागल्या; परंतु अनेक अड-चणींमुळें पुस्तक छापणेंहि तसेंच राहिलें. इतक्यांत, आपल्या ज्ञातींतील प्रसिद्ध मराठी कवि, काव्यमर्मज्ञ **डा० कान्होबा रणछोड कीर्तिकर** यांनीं या नाटकाची हस्तलिखित प्रत रत्नागिरीस मागवून नेली व ती प्रत परत पाठवितांना त्यांनीं फारच अनुकूल अभिप्राय प्रदर्शित करून अशा प्रकारचीं आणखीं नाटकें लिहिण्याची शिफारस केली. त्यामुळें मला बरेंच उत्तेजन येऊन मीं हें नाटक छापवून प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें आहे. प्रयत्न पहिलाच आहे. व अशा तऱ्हेचा ग्रंथ आजपर्यंत आपल्या ज्ञातिबांधवांपैकीं कोणींहि लिहिलेला नाहीं. सबब माझी ही कृति सर्वांस कितपत मान्य होईल तें माझ्यानें सांगवत नाहीं. तथापि मला एवढें म्हटल्याशिवाय रहावत नाही कीं जे कोणी निःपक्षपातानें व शुद्ध मनानें हा ग्रंथ वाचतील त्यांस त्यांत वावगें असें कांहींच आढळणार नाहीं असा माझा समज आहे. असो.

वरील '**प्रभु ॲमेच्युअर्स**' ज्यांनीं माझें नाटक रंगभूमीवर उत्तम रीतीनें

आणून माझ्या कृतीचें चीज केलें त्याबद्दल मी त्या सर्वांचा फार आभारी आहें. त्याचप्रमाणें माझे तीर्थरूप **रा. रा. सोकर बापूजी त्रिलोकेकर** ज्यांनीं मला हें नाटक लिहितेवेळीं अति उपयोगी अशा अनेक सूचना केल्या व खरोखरींच ज्यांच्या आशीर्वादाचें हें सर्व फळ आहे, त्यांचाहि मी फार ऋणी आहें.

ही प्रस्तावना पुरी करण्यापूर्वी, आपल्या ज्ञातींतील प्रसिद्ध व कुशल चित्रकार **रा० महादेव विश्वनाथ धुरंधर** ज्यांनीं वेळोवेळीं आर्टस् एक्झिबिशन्कडून बक्षिसें मिळविलीं आहेत व ज्यांनीं केवळ मित्रत्वाच्या नात्यानें आपला अमूल्य वेळ खर्चून या पुस्तकासाठीं चित्रें काढून दिलीं आहेत त्यांचे मी फार फार आभार मानितों.

मुंबई,
ता० ७-१०-१९०४.

ग. सो. त्रि.

पात्रें.

खंडेराव ऊर्फ दादाजी. (रा० दिनकर खंडेराव विजयकर बी. ए.) ... एक प्रभुज्ञातीय वृद्ध गृहस्थ.
सुंदरराव ... ... (रा० रामदत्त विठोबा देसाई. बी. ए. एल्. एल्. बी.) ... एक प्रभुज्ञातीय गृहस्थ.
विश्वासराव ... ... (डा० विनायक सोकरजी त्रिलोकेकर. एल्.एम्. ॲन्ड एस्.) एक प्रभुज्ञातीय गृहस्थ.
वामनराव ... ... (रा० रामराव गजानन जयकर. बी. ए.)... ... ... खंडेरावाचा वडील मुलगा.
शामराव ... ... (रा० नारायण गजानन जयकर. बी. ए.) ... ... खंडेरावाचा दुसरा मुलगा.
धाकलाभाई ... ... (रा० मोरेश्वर रामचंद्र कोठारे. बी. ए. एल्. एल्. बी.) ... खंडेरावाचा तिसरा मुलगा.
रामराव ... ... (रा० मोरेश्वर बावाजी राणे. बी. ए. एल्. एल्. बी.) } शामरावाचे प्रभुज्ञातीय मित्र
गजानन ... ... (रा० नारायण रघुनाथ त्रिलोकेकर.) } शामरावाचे प्रभुज्ञातीय मित्र

बाळंभट (रा० नागेंद्रनाथ त्रिंबकराव कोठारे.) **व्यंकय्या** (रा० विनायक त्रिंबक कोठारे.) **गोविंदभट** इ. ब्राह्मण. **रामा** (रा० यशवंतराव त्रिंबक कोठारे.) **गोविंदा** (रा० अनंदराव सदाशिव नायक.) इ० गडी. **भगवानदास दलाल** (रा० रामराव जगन्नाथ देसाई.) **मारवाडी. परदेशी भय्या** (रा० माधवराव काशीनाथ धैर्यवान). **पोलिसकान्स्टेबल** (रा० मोरेश्वर पुतोबा कीर्तिकर) इ० इ०.

सोनाबाई ऊर्फ दादीबाई (रा० विश्वासराव रामचंद्र कोठारे.)—खंडेरावाची स्त्री.
काशीबाई ... ... (रा० मार्तंड पुरुषोत्तम जोशी.)—सुंदररावाची स्त्री.
बेनाबाई ... ... (रा० यशवंत विठ्ठल तरखड.)—सुंदररावाची मुलगी व शामरावाची स्त्री.
पुतळाबाई ... ... (रा० रामराव त्रिंबकराव कोठारे.)—वामनरावाची स्त्री.
नानीबाई, धारुबाई, चंपुबाई, हिराबाई इ० इ०.
रंगी नायकीण ... (रा० देवराव पंडित.)

हुंडा नाटक.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

(स्थल–मुंबई–पोपटवाडींतील घर.)

[सुंदरराव व काशीबाई.]

(काशीबाई खोलींत लोंकरीचें काम करीत बसली आहे. सुंदरराव बाहेरून येतो.)

सुंदरराव—(कपडे काढीत असतां) नको हा संसार ! संसारांत राहून जर चार घटका सुख नाहीं तर काय उपयोग !

काशीबाई—(वर मान करून हंसत) कां ? संसाराचा कंटाळा यायला इतकं झालं तरी काय ? ज्या कामास जायाचं झालं होतं तें काम झालं नाहीं वाटतं ?

सुं०—कसचं काम घेऊन बसली आहेस ! तुला खरोखर सांगतों आपल्या वेनूस तशीच अविवाहित ठेवलेली पतकरली पण तें लोकांचें आर्जव करणें नको ! मघां त्या कृष्णंभटानें सांगितल्याप्रमाणें खंडेरावाकडे गेलों होतों. मुलगी वगैरे सर्व कांहीं पसंत झालें पण दोन शेर सोन्याशिवाय ते मुलगी करीत नाहींत.

का०—अगबाई ! इतकं सोनं कोठून द्यावयाचं तरी !

सुं०—तूंच पहा तरी. काय आमच्या लोकांनीं अवदसा घेतली आहे ही ! जो उठला तो दोन तीन शेर सोनें व शिवाय रीत मागतो ! एवढें आणावें कुठून ? माझ्या सारख्या गरीबाजवळ एवढी रीत करण्यास पैसे कोठून येणार ! काय आमच्या वाडवडिलांनीं धन दौलत ठेविली आहे कीं त्यांतून आह्मीं त्यांस द्यावें ! आणखी त्यांत एकादी मुलगी असती तर पतकरतें ! हो, कशीतरी तजवीज केली असती. परंतु या मला दोन मुली आहेत. मोठी तर सतरा वर्षांची झाली. तिच्या खालची चौदा पंधरा वर्षांची असेल. कशी हं हं ह्मणतां वाढली ! मुलींनां

वाढायाला वेळ नाहीं लागत! आतां माझ्यासारख्यानें प्रत्येक मुलगीच्या पाठीमागें एवढी रीत करावी तरी कोठून!

का०—तें सगळं खरं, पण करणार काय? आपल्या जातीमध्यें दुसऱ्या जातींसारखे पंच थोडेच आहेत कीं त्यांच्या कानांवर गोष्ट घातली असतां आपल्या सारख्या गरीबांची दाद लागेल.

सुं०—खरोखर, तसला कांहीं प्रतिबंध असता तर फार चांगलें झालें असतें! पण अशी जर आमच्या जातींत एकी असती तर तिची इतकी वाईट स्थिति कां झाली असती? स्वतांच्या जातीविषयीं अभिमान न बाळगणारे असे आमचे लोक जितके सांपडतील तितके इतर कोणत्याही ज्ञातींत सांपडणार नाहींत. आपलें तेवढें झालें म्हणजे झालें, मग दुसऱ्याचें कांहीं कां होईना! याचमुळें ही आमची अशी स्थिति!

का०—तें सगळं खरं पण आपल्या बेनूचा कसा काय विचार? तिला मगशिरांत अठरावं वरीस लागेल.

सुं०—मला तर अगदीं सुचेनासें झालें आहे. तिचें लग्न नाहीं झालें तों पुतु वाढली आहेच. तिला चौदावें वर्ष चाललें आहे वाटतें?

का०—चौदावं कसं. तिला हें पंधरावं वरीस चाललं आहे. सोळावं पुसांत लागेल.

सुं०—घे तर. दोघींचींही लग्नें करणें अवश्य आहे. पण लग्नें करावयाचीं कशीं. येवढा पैसा आणूं कोठून! मला तर वाटतें कीं यांनां तशाच वाढूं द्याव्या! असेल त्यांच्या नशिबीं तर मिळतील त्यांनां नवरे! नाहीं तर रहातील तशाच! आपण त्यास काय करणार? त्यांचें नशीब त्यांच्या बरोबर! आईबाप मुलांस जन्म देतात पण कर्म देत नाहींत! (इतक्यांत बाळंभट उपाध्ये येतात.)

बा०—कसं काय यजमान ठीक आहेना?

सुं०—हं आहे ठीकच म्हणावयाचें.

का०—बसा बाळंभटजी (बाळंभट बसतात). पण कांहो बाळंभटजी, तें बेनूचं यादवन घेऊन गेले होतेत त्याचं काय झालं?

बा०—रामरावाकडे ना? तें घेऊन ठेविलें आहे. पण योग जमेलसा रंग दिसत नाहीं. त्यांनांही मोठी रीत पाहिजे. जिकडे जावें तिकडे दोन शेर तीन शेर सोनें मागतात.

का०—वरं ते काय रीत मागतात?

बा०—रीत का? दोन शेर सोनें व पांचशें रुपये रोकड. शिवाय तांब्या वाडगा व मधुपर्काचा पितांबर व चांगली मोठ्या दाण्यांची भिकबाळी!

सुं०—वा: वा: आणखी कांहीं नाहीं का? हो मागायला काय? उचलली जीभ लावली टाळ्याला! बाळंभट, तेवढें देण्याची आपणांस शक्ति नाहीं. काय चमत्कार आहे तरी! कांहो बाळंभट, हा रामराव येवढा ऐवज मागतो तर काय त्याला भीक लागली आहे!

बा०—रीत मागणें हें कांहीं भिकारी किंवा श्रीमंत यावर अवलंबून नाहीं. भिकारीही मागतात व श्रीमानही मागतात. दोघेही एकच!

सुं०—या श्रीमान लोकांचीं पापें आह्मांस नडताहेत हीं! वाळे तोडे वगैरे देण्याची ही रीत त्यांनींच पाडली. त्यांचें पाहून गरीबही तसेंच करूं लागले!

का०—पण बाळंभट, दुसरा नाहीं कां एकादा तुमच्या पहाण्यांतला मुलगा?

बा०—काशीबाई, मुलगे पुष्कळ आहेत. पण उपयोग काय? तोच पहाना ठाण्यास तुमचा सदानंद आहे तो. परवां मुंबईस आला होता. त्याच्याकडे एक याद्गन घेऊन गेलों होतों.

का०—त्याच्या तर सगळ्या मुलांचीं लग्नं झालीं आहेत.

बा०—वा! त्याच्या पहिल्या कीं दुसऱ्या मुलाची पहिली बायको नुकतीच वारली नाहीं का?

का०—हं. हं. खरंच. त्याचं लगीन करीत आहे का ह्मातारा?

बा०—होय. तेव्हां त्याच्याजवळ एक याद्गन घेऊन गेलों होतों. मुलगी आहे तुमच्या सारख्याची. पण ह्मातारा किती जबरा पहा! त्यानें मला चक्क विचारिलें; "भटजी तुमचा यजमान दोन शेर सोनें देण्यासारखा आहे का? तसें असेल तर पुढें मग याद्गनाविषयीं विचार!" मीं त्याला सांगितलें, "माझा यजमान इतका कांहीं श्रीमान नाहीं. साधारण चार चौघांसारखी रीतभात करील." हें ऐकतांक्षणीं ह्मातान्यानें मला साफ सांगितलें कीं, "तसें आहे तर आलेत तसे चालते व्हा. आमचे मुलगे काय वाटेवर पडले आहेत!"

का०—तो ह्मातारा तसाच आहे. प्रत्येक मुलाच्या पाठीमागं दोन दोन शेर सोनं घेतलं आहे. अशा रीतीनें त्या ह्मातान्यानें आठदहा हजारांचं सोनं घरांत जमविलं आहे.

सुं०—जमवो बापडा! आणखी जमवो! पण बाळंभटजी, मी तुह्मांस खरोखर सांगतों असें अडवून धरून पैसे अथवा रीत काढण्यांत मोठें शहाणपण नाहीं, व अशा रीतीनें घेणाऱ्यांस बरकतही नाहीं.

बा०—यांत काय संशय!

सुं०—पण बाळंभट, मुलगा तरी आहे का चांगला? कीं आपला असाच?

बा०—हं हं! तें विचारूंच नका. ज्याप्रमाणें रीत मागणें हें गरीब किंवा श्रीमान यांवर नाहीं त्याचप्रमाणें हुंड्याचें मान शहाणा किंवा मूर्ख मुलगा यावर नाहीं. किंबहुना उलटच आहे असें ह्मटलें तरी चालेल. सध्याच्या मानाप्रमाणें भटके, दारू पिणारे, अक्षरशत्रू अशां मुलांची किंमत तर शहाण्यासुरत्या मुलांपेक्षां देखील जास्त आहे.

सुं०—हो, असें तर खरेंच, व अंतीं तसेंच होतें. एखाद्या शहाण्या मुलास मोठासा हुंडा देऊन जरी मुलगी दिली तरी तिच्याविषयीं पुढें मग काळजी करायाची जरूर पडत नाहीं. कसें तरी आपल्या बायकोचें पोट भरील. पण तशी गोष्ट दुसऱ्यांची नाहीं. त्यांनां रीत द्या, आपली कष्ट करून जिवापलीकडे वाढविलेली मुलगी द्या, व त्यांचा पुढला देखील संसार संभाळा. भटजी तुह्मांला काय सांगूं! अहो वासकुटें, शर्टें, टोप्या, जोडे, बूट, चहा काफी छत्र्या हेंही त्यांनां पुरविलें पाहिजे!

का०—काय करतां. पोटच्या गोळ्यासाठीं तेंही करावं लागतं.

बा०—हो! खरोखरच. (घड्याळांत तीन वाजतात.) ओहो! तीन वाजले हे! बरं यजमान, घेतों आतां रजा.

सुं०—या.

का०—बाळंभटजी, मीं सांगितलेली गोष्ट विसरूं नका बरं.

बा०—छे. छे. विसरतों कसा. मी त्याच खटपटींत आहे. मी ह्मणतों एकदां बेनाबाईचं लग्न लावून गांवीं मुलीचं लग्न करावयास जाईन. पाहूं कसं काय साधेल तें खरें. येतों बरं काशीबाई. (जातो.)

का०—अगबाई–कशी हं हं ह्मणतां दुपार निघून गेली. चला बाई. संध्याकाळच्या धंद्यास लागावं. (आंत जाते.)

सुं०—आपणही सोशिअल क्लबमधून जाऊन यावं. तेथें तरी अंमळ दुःखाचा विसर पडेल. (जातो.)

प्रवेश २ रा.

(स्थल—रस्ता.)

[बाळंभट.]

बा०—(स्वगत)–रामरावांनीं जबाबासाठीं आजच बोलावलें होतें. तेंव्हां पहिल्यानें तिकडेच जावं. जबाब काय मिळणार त्याचें भविष्य मीं पूर्वींच करून ठेविलं आहे. त्यांच्या तोलास तोल देणारा व्याही भेटल्याशिवाय तेथें कसचें जुळतं! तेव्हां सुंदररावांच्या मुलीचें याद्वन तेथून परत येणारच! पण आतां दुसऱ्या कोणाच्या येथें घेऊन जावं बरं? मी तर अगदीं कंटाळून गेलों बुवा! तीन वर्षें झालीं इकडून तिकडे आणि तिकडून इकडे याप्रमाणें नेतां नेतां तें याद्वनही बिचारं फाटून गेलें. परंतु छः एकीकडेही जमत नाहीं! माझ्या ओळखींपैकीं एकही घर राहिलं नाहीं–नाहीं, पण हो, बरी आठवण झाली! विठ्ठलवाडींतल्या खंडेरावांच्या मुलाचं दुसरं लग्न होणार ह्मणून ऐकतों खरं! पण तेथें डाळ शिजेल असं मला तर वाटत नाहीं! खंडेरावांजवळ मागें एकदां जाण्याचा प्रसंग आला होता तेव्हांच्या अनुभवावरून माझी पक्की खातरी आहे कीं तेथें कांहीं वळायचं नाहीं–पण प्रयत्न तर करून पाहूं! मुलगाही कांहीं चांगला नाहीं! बिजवर असून ढंग बरेच आहेत! पण त्याची आपणाला कशाला पंचाईत पाहिजे! आपलं काम लग्न जुळवून द्यावयाचं–पुढें कांहीं कां होईना–आपली दक्षणा ताजी झाली ह्मणजे झालं–हं–तेथेंच प्रयत्न करून पाहूं–हं–बोलतां बोलतां देवळाजवळ आलों–चला तेथेंच जाऊं! नरहरभटजींची भेट घ्यावयाची आहे! चला.

(जातो.)

प्रवेश ३ रा.

(स्थल—झावबाचें देऊळ.)

(कांहीं मंडळी देवाचें दर्शन घेत आहे, कांहीं गप्पा मारीत बसली आहे, इतक्यांत बाळंभट तेथें येतात त्यांस पाहून.)

गोविंदभट—नमोनमः नमोनमः बाळंभट आज तुह्मी येथें कोठें?

बाळंभट—सहज येथील पुजारी नरहरीभटजींनां भेटण्यास आलों आहें. आहेत कां नरहरभटजी येथें?

गो०—नरहरभटजी का? ते तर आतांच बाहेर गेले. येतील थोड्या वेळानें. पण तुह्मी तर अंमळ वसा. पुष्कळ दिवसांनीं भेट झाली. (बाळंभट बसतात.)

गो०—(चंची काढून) पान तर खाल. (पान खातात. इतक्यांत आंतून पांच दहा ब्राह्मण मुगटे व पंचपात्र्या हातांत घेऊन ढेंकर देत येतात व देवळाच्या ओटीवर जातात.)

बा०—हे हो कोण?

गो०—हे का? अहो हे सदाव्रतांतले ब्राह्मण.

बा०—ठीक! नानासाहेबांनीं स्थापिलेल्या सदाव्रतांतले होय? आहा! त्यांच्या आत्म्यास किती सुख होत असेल बरें! सदाव्रतापेक्षां अधिक पुण्यदायक धर्म कोणता!

गो०—सर्व धर्मांत अन्नधर्म उत्तम खरा, परंतु अशा सदाव्रतास मी धर्म मानीत नाहीं.

बा०—तें कां बरें?

गो०—कारण उघड आहे. अहो बाळंभट, गलेलठ्ठ व आळशी अशांस, मग ते ब्राह्मण असले म्हणून काय झालें–यथेच्छ भोजन देण्यांत पुण्य तें कसलें? अशा धर्मसंस्था एकंदर गांवांतील भिकार वाढविण्यास कारणीभूत होतात–दुसरें कांहीं नाहीं. आपणां दक्षणी लोकांत अशा संस्था फारच थोड्या. परंतु त्या गुजर लोकांत अशा संस्थांचें बरेंच बंड माजलें आहे. एकंदरीनें पाहतां, या संस्था स्थापन करण्याचा मूळ हेतू तो एकीकडेसच राहून, एरवीं मोलमजुरी व इतर अंगमेहनतीचीं कामें करून जे आपलीं पोटें भरते अशा लोकांस आळशी बनवून, एकंदर समाजाचें व देशाचेंही अकल्याण करण्यास या संस्था बऱ्याच अंशीं मदत करतात असें ह्मटलें असतां अतिशयोक्ति केल्याच्या दोषास मी पात्र होईन असें निदान मला तर वाटत नाहीं. मग तुमचें मत काय असेल तें असो.

बा०—अहो गोविंदभट, तुह्मी ह्मणतां तसें असेल! आपणांस कशाला उगीच त्याविषयीं वितंडवाद हवा!

गो०—वितंडवाद का! खरंच आहे–तुमच्या सारख्यांनां असलें मत पसंत

होणें नाहींच ! बरें तें असो, पण बाळंभट, कसं काय खुब लग्नाबिग्नांची चंगळ ना ? यंदा तुमच्या यजमानांत कोठें लग्नें आहेत का ?

बा०—अहो लग्नाला काय वाण आहे, पण शिन्चं कोठें जमत नाहीं.

गो०—होय बाळंभटजी, हीच शिन्ची पंचाईत. या परभांत तर बुवा अलीकडेस फार दंगा माजला आहे. हुंडा ! त्याशिवाय गोष्टच नाहीं ! ज्यांच्या पोटीं मुली असतील त्या बिचाऱ्या गरीबांनीं काय करावें ! ते आमचे दिनकरराव. त्यांच्या मुलीस यंदा विसावं वर्ष लागलं, तरी अजून तिला कुठें नवरा मिळत नाहीं. तसाच तो विनायकराव, त्याचीही मुलगी केवढी वाढली आहे. जिकडे जावें तिकडे कोणी मागतो दोन शेर सोनें, कोणी मागतो अडीच शेर सोनें, येऊन जाऊन सोन्याची गोष्ट. हा मी सकाळीं नवेवाडींतल्या शामरावाकडे गेलों होतों.

बा०—शामराव कोण, आमचे यजमान ?

गो०—होय तेच. त्यांच्या दुसऱ्या मुलाला एकाची मुलगी सांगावयाची होती.

बा०—कोणाची हो मुलगी ?

गो०—मुलगी का ? कांदेवाडींतल्या वकिलाची ?

बा०—अं. तें जमेल तर. अहो तीं दोन्हीं पडलीं धेंडें. त्यांनां काय कमी !

गो०—कांहो बाळंभट, त्या तुमच्या सुंदररावाच्या मुलीला नवरा मिळाला का ?

बा०—छेहो. आज तीन वर्षें झालीं माझी सतत खटपट चालली आहे, पण कोठें जमत नाहीं. अहो पैशाशिवाय कसचं जमतं.

गो०—खरोखरच. अहो बाळंभट या पोरी वाढून पुढें होणार तरी काय ?

बा०—तुह्मी तर गोविंदभट अगदीं परभांचे हितचिंतक बनलेत. त्यांची तुह्मांला फारच कींव येते ह्मणावयाची, जणों काय तुह्मी त्यांच्यापैकींच एक. आपण ब्राम्हण आहांत हें विसरलेत काय ?

गो०—तसें नव्हे हो. परंतु आपण ज्यांच्या जिवावर आपला चरितार्थ चालवितों त्यांचें हित चिंतणें यांत वावगें तें काय झालें ? बाळंभट, तुह्मी लक्षांत ठेवा कीं हा गोविंदभट खाल्ल्या घरचे वांसे मोजणारा नव्हे बरें. कसेंही असो, ते आपले अन्नदाते झाले तेव्हां त्यांचें हित चिंतणें हेंच आपलें कर्तव्यकर्म होय.

बा०—काय म्हणतां तुह्मी गोविंदभट ! हे हो कसले आपले अन्नदाते ! ईश्वर आमचा अन्नदाता ! आणि आपणांस त्यांजपासून जी प्राप्ति आहे ती

आपल्या मेहनतीबद्दल. उद्यां तुह्मी त्यांचें काम करूं नका आणि मग पहा. गोविंदभट माझ्या समोर हें ह्मटलेंत ह्मणून चिंता नाहीं पण असें दुसऱ्या कोणा-समोर ह्मणालेत तर ते तुह्मांस वेड्यांत काढतील. आणखी गोविंदभट, मी तुह्मांस खरेंच सांगतों या परभांसारखे अधर्मी व कर्मभ्रष्ट लोक इतरांत कोठेंही सांपडावयाचे नाहींत.

गो०—छेः छेः हें काय ह्मणतां बाळंभट. अहो, जेथें गांव तेथें महारवाडा असावयाचाच. परभांत ह्मणजे पापाचरण करणारे अधिक आणि ब्राह्मणांत म्हणजे कमी असें कांहीं नाहीं. घरोघरीं मातीच्याच चुली आहेत. यांतच शहाण्यांनीं समजून घ्यावें ह्मणजे झालें.

बा०—पुरे झाला आपला उपदेश. वरं आतां पुष्कळ वेळ झाला. नरहरीची भेट होत नाहीं. पुन्हा कधीं येऊं. मला जरूरीच्या कामास जावयाचें आहे.

गो०—या तर. बोलल्या चालल्याचा राग नकाहो मानूं! (बा. जातो.)

गो०—चला आपणही थोरल्या ठाकुरद्वारीं जाऊं. शास्त्रीबुवांचें पुराण अजून आटोपलें नसेल. (जातो.)

प्रवेश ४ था.

(स्थल—रस्ता.)

[गोविंदभट.]

गो०—(स्वगत) या बाळंभटाच्या बोलण्यांत किती निमकहरामी तरी! खाल्ल्या घरचे वांसे मोजणें हें महत्पाप होय. आह्मां उपाध्यांस इतर कोणत्याही स्थलीं थारा नाहीं. परंतु परभु जातीमध्यें आह्मांस केवढा मान मिळतो वरें! आह्मां लोकांचीं त्यांच्या जिवावरच पोटें भरतांत–त्यांनीं जर आह्मांस आज जा ह्मणून सांगितलें तर आमची वाट काय? इतर जातींप्रमाणें त्यांनीं आपल्या जातीं-तलेच ब्राह्मण बनविले तर आह्मांस थारा कोठें मिळेल! खरोखर आमचें सगळें जीवन या लोकांवर सर्वथैव अवलंबून राहिलें आहे. असें असून आह्मांपैकीं शें-कडा नव्वद असामी या लोकांची नेहमीं खोटी नालस्त करितात. हें त्यांस ल-

ज्जास्पद नव्हे काय! बरें, आह्मांस जो एवढा या लोकांत मान मिळतो त्याप्रमाणें आमचें वर्तन तरी असावें तसें निर्मळ आहे का! यजमानास कडकडीत उपोषण असलें तरी आह्मी घरीं यथेच्छ पोटपूजा आटपून मग पूजा सांगण्यास जातों. यजमान बिचारा भावार्थानें आह्मांस योग्य मान देऊन आमची संभावना करतो पण त्याचा मोबदला काय–तोंडापुरते आशीर्वाद पण मागाहून निंदा व शिव्या! हर! हर! हा त्यांच्या चांगुलपणाचा व धार्मिक बुद्धीचा आह्मी असा गैरवाजवी लाभ घेतों. बिचारी यजमानीणबाई मोठ्या भावार्थानें उपाध्यास भुलेश्वरास तांदुळ पैसा अथवा पूजा घेऊन जाण्यास सांगते, पण हरामखोर देवळांत पाय ठेवील तर शपथ! बरें पूजा इत्यादि कर्में तरी आह्मी यथाशास्त्र चालवितों? छः नांव नको! लेकानें पाठांतर केलें असेल तर ना! बाप उपाध्या–पोरही उपाध्या बनला. मंत्र नाहीं आठवला तर दे पंचतंत्रांतला एखादा श्लोक ह्मणून! हल्लींच्या यजमानास तरी त्यांतला भेद कोठें समजतोय! अलिकडे लग्नादि कार्यांत चांगले, मोठी आढ्यता मिरविणारे उपाध्येही गडबडगुंडा करून जेमतेम सावधान करून टाकतात झालें! फार काय सांगू! अगदीं सुवेर सुतकांत लग्नें लावून देणारे असेही कुलांगार आमच्यांत कांहीं उपजले आहेत! शिव! शिव! माझ्या हातून अशी गोष्ट कधींही घडली नाहीं व पुढेंही घडून येणार नाहीं! त्यांनां योग्य वाटेल तसें ते करोत! ज्याला त्याला स्वकर्मांचीं फळें भोगणें आहेच! तें कांहीं चुकत नाहीं. आणखी तेंही इथल्या इथेंच, व तो वेळही समीपच आला आहे. आमच्या यजमानांत जुने व ह्मातारे जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत हीं आमचीं थोतांडें चालतील. मग नव्या पल्लवीच्या राज्यांत आमच्या लोकांनीं एक तर दुसरा धंदा पतकरला पाहिजे अथवा दारोदार झोळी घेऊन भीक मागत फिरलें पाहिजे. असो. त्याची आपणांस पंचाईत कशास हवी. माझीं काय दहा गेलीं पांच राहिलीं! चला, वेळ बराच झाला! बोलण्याच्या नादांत वेळाचें भान राहिलें नाहीं. आतां पाय उचलला पाहिजे!

(ठाकुरद्वाराकडे जातात.)

प्रवेश ९ वा.

(स्थल—विठ्ठलवाडी–खंडेरावाचें घर.)

[खंडेराव व सोनाबाई.]

(खंडेराव खोलींत गुडगुडी ओढीत बसले आहेत.)

खं०—(मोठ्यानें) अग ऐकलस कां? अग–इकडे ये–अग–अग–आयकाला येते कनांय?

सो०—(आंतूनच)–हो–हो–आयकलंनं. (बाहेर येऊन) ही मी आलं. का माझे वगर अडलंय?

खं०—अग बस तर खरी. मगशी मी सांगतय.

सो०—ही मी बसलं. (बसते) बोला का हाय ते यकदाचं.

खं०—हे बग. आपले शामाला का नाय एक सोकरी सांगून आलय.

सो०—आलंशेल, त्यांन ते का मोठं नवल झालं. अवढच नं! का वा तुमाला घाती घालाची सवय–कोणाला खबर. अवढसं असेल त्याचं अवढसं कराच.

खं०—अग नवल का मी सांगतय! अशा शेपन्नास सांगून आल्या! पण हिची आई क नाय मोठी गब्बर हाय. तिच घरदार सगळ काय हाय ते ती सोकरीचे नांवावर करणार. खरच, बग हा लाट साधला कनाय तर आपल सगळ जन्माच दळिदर नायस होयल.

सो०—जळ्ळा मेला तो लोभ. मेलं दळिदर ते पायजे तरी कणाला!

खं०—तस नायग. मी अस बोलतय का आपुण दळिद्री हांव ह्मगुण. पण तूंच बग. पांच हजार लानी सानी रकम हाय का! अग या काळान् अवडा पैसा देते कोण! तुमाला बायकांनां का! तुमची सगळी हऊस दागिने न कपडे लत्ते यामदी. तुमाला तवडं मिळालं ह्मणजे झालं. पण हे सगळं पैशावगर येत नाय, समजलीस!

सो०—बर बर ते समजलं. पण ती सोकरी तरी कोणाची?

खं०—सोकरी का? सोकरी लोवारचाळीनचा तो रामभाऊ होता न त्याची.

सो०—ती का सोकरी? हो, सगळेकडे यादवन फिरल, कोटे नवरा नाय मिळे–तंव इकडे आले वाटते विचाराला. नको बा. ती सोन्याभरली नको.

खं०—का? का? तिला अवढ का झाल? का नकटी हाय? का थोटी हाय? अशी ते का गोम हाय?

सो०—सांगीन मगशी. आत का त्याची घाय नाय गेली.

खं०—अग पण सांग ते खरी.

सो०—सांगुच का? पण नको. मेले भितीला पण कान असतान.

खं०—अग पण माजे कानांन सांग–मग ते हरकत नाय?

सो०—ऐका ते–(कानांत कांहीं सांगते.) आल, आतं ध्यानांन आल?

खं०—पण गोष्ट खरी का? नायते असेल एकादी थाप. आपले लोकांन् असे निंदक लोक पुष्कळ हान. बग, अशा गोष्टीवर भरंवसा ठेऊन आपुण मातर पांच हजारांला आंचवूं.

सो०—जळ्ळे ते पांच हजार. अहो ती गोष्ट खरी हाय–खरी हाय. खोटी नाय. (इतक्यांत बाळंभट येतात.)

खं०—कसं काय बाळंभट?

बा०—ठीक आहे आपणासारख्यांच्या मेहेरबानीनें.

खं०—कां आज इकडे कोठें?

सो०—(हंसत हंसत) ते कामाशिवाय वरें येतील. असेल काय तरी काम म्हणून आलसतील.

बा०—दादीबाई, तुह्मीं ह्मटलंत त्यांत कांहीं खोटें नाहीं. ज्यांच्या येथें मुलगे आहेत त्यांच्या येथें पायमळणी केल्याखेरीज आमच्या यजमानांचीं कार्यें तीं कशीं होणार! कांहो दादीबाई, यंदा शामरावचें लग्न करीत नाहीं का?

सो०—असा विचार हाय खरा; पण यांचे मनासारखी सोकरी कोठें मिळत नाय न!

बा०—(मनांत) यांच्या मनासारखी मुलगी ह्मणजे जी मोठ्यांत मोठा हुंडा घेऊन येईल ती. मग मुलगी कोणाची व कशीही असली तरी चालेल! (उघड) दादीबाई, माझ्या पहाण्यांतली एक मुलगी आहे. मुलगी स्वभावानें गरीब, व दिसण्यांत चांगली असून कुलीन घराण्यांतली आहे.

सो०—कोणाची हो बाळंभट ?

बा०—पोपटवाडींतील सुंदरराव–त्यांची.

सो०—हं ! हं ! समजलं. त्या दारकाबायमावशीची नात. काशीबायची सोकरी. तीच न ?

बा०—होय तीच. आणि काशीबाईनें तुह्मांला सांगायला सांगितलंय कीं रीतबीत हौसेसारखी करूं.

सो०—सोकरी ते वा वरी हाय.

बा०—(मनांत) एक अडचण पार पडली. आतां हुंड्याची गोष्ट आली तेवढी संभाळली पाहिजे, ह्मणजे झालें. (उघड) मग ठेवतां का तिचें याद्वन ?

खं०—पण रीत वीत कशी का ? सोनं कवडं देणार ?


बा०—(मनांत) आणीबाणीचा तर प्रसंग हाच ! (उघड) दादाजी, हें पहा. सुंदरराव खाऊनपिऊन संसार संभाळून आहेत. त्यांना श्रीमंतांत गणवत नाहीं आणि केवळ गरीबांतही ते मोडत नाहींत. तथापि ते मोठे हौसी असून यथाशक्ति जांवयास देतील. त्यांची ही पहिली मुलगी आहे तेव्हां तें आपल्याकडून कमी पडूं देणार नाहींत.

सो०—मला ते वाटते का हें यादवन ठेवावं. कसं का तुमचे मनास येते का ?

खं०—नाय ! नाय ! ते काय कामाच नाय. तूं हायस वेडी. तुला नाय अक्कल, तुमा वायकांना या गोष्टीच ज्ञान मुळीच नाय. बाळंभट, सुंदरराव किती शेर सोनं देणार त्याची नीट चौकशी करून या. अन भातक–रुखवत–बगाचे न समजवणीचे कपडे, गौरवाची पातळ न वरसाचे सगळे सण करतील का नाय याची पण चौकशी करून या. अवढ होत असेल तर मगशी यादवन ठेवाचा विचार. माझा हाय सोकरा–अजून दोन वरसं वाढला तरी हरकत नाय–समजलेत.

सो०— हो ! ! आणखी दोन वरसांनीं हुंड्याची किंमत पण वाढेल ! तीन शेरांचे चार पांच शेर होतील !

खं०—वस ! वस ! फार शहाणी हायस ! असेल तुझे सोयऱ्यांची सोकरी ह्मणून भाळलीस अवढी तिचेवर ! पण मी कोठें ऐकणार हाय. पैशाचे कामांत वायकांनीं मन नाय घालाव. ते काम आमचे सारखे पुरुषाचं. बाळंभट, तुह्मी इचे बो-



खं० * * तीन शेरांमदी एक वाल पण कमी केला नसता—एक वाल! (पृष्ठ १३).

KUNTALINE PRESS, CALCUTTA

लण्यावरती लक्ष देव नका. हे बगा. मी सांगितलय त्या परमाणे होत अशेल तर माझेकडून हरकत नाय, मी होबासा देन. सोनं पण पुष्कळ सांगितलं नाय हो! ती सोकरी इचे सोयऱ्यांनची नसती अथवा सुंदरराव माझे फ्रेंड नसते तर तीन शेरांमदी एक वाल पण कमी केला नसता–एक वाल! बोला, बाळंभट तुमीच बोला–बोला–बोला–तुमीच बोला–गरजवंत कोण? सोकरीचा बाप का सोकऱ्याचा बाप? खर बोला. उगीच तोंडापुरतं बोलूं नका. माझी शपथ हाय तुमाला.

बा०—तें मी काय सांगूं!

खं०—अन हे बगा. बाळंभट, तुमाला दुसरं सांगतय. शामाला आज एक सोकरी सांगून आलय. तिची आई पांच हजार रुपये देवाला कबूल हाय, पांच हजार. काय समजलेत तुमी! क्याश हार्ड क्याश!

बा०—असेल. मुलींना आजकाल काय कमताई आहे? एक सोडून पांचशें सांगून येतील. पण हें बघा दादाजी, अमळ सुंदररावाच्या स्थितीकडे लक्ष देऊन आपला निर्णय सांगाल तर ठीक.

खं०—(रागावून) हें बगा बाळंभट. मी इकडे काय धरम कराला बसलुं नाय. माजे हान सोकरे, तसेच वराडल्याशिवाय रायले तरी बेहत्तर. पण मी कधीं एक वाल सोन्यामदी कमी करणार नाय. असेल ज्यांनां गरज ते देतील सोकरी. पाठीला लागून देतील–अवो पाठीला लागून. असे बगता का माजे तोंडाकडे?

बा०—जसी आपली मर्जी. मी आपला निरोप सुंदररावांनां कळवितों. येतों तर आतां. दादीबाई, येतों मी आतां.

सो०—या.

खं०—बाळंभटजी, माजा निरोप नीट सांगा हं. (बाळंभट जातात.)

खं०—(हंसत–हंसत) कां. उडवली का नाय गंमत!

सो०—वा! मोठीच गंमत! लोकांचे वरती जुलूम करावा न त्याला बोलावी गंमत! म्हणतांत न उंदराचा जीव जाते न मांजर ओव्या गाते!

खं०— अरेच्चा! येरे माझ्या मागल्या! तुझं तेचन तेच! याला जुलूम का बोलतांन? अग हा देवाघेवाचा वेवार!

सो०—जुलूम नाय जुलमाचा बाप. तुमीच सुंदररावचे ठिकाणीं असतेत तर मगशी तुमाला हें कस वाटल असत?

खं०—बस बस ! तूं शहाणी हायस. मी इकडे काय परोपकार कराला बसलुं नाय.

सो०—केलेत तुमीं परोपकार. तुमाला माणुसपण हाय कोठें. तुमाला पैसा तेवढा दिसते. अन पैशासाठीं तुमी एकाद झोड पण सोकऱ्याचे गळ्यान वांधाला चुकणार नाय !

खं०—हं ! हं ! असँ तू का तरी बोलतेस ! वेडी कोठची. सोकरीच कुळशील पण बगाला पायजे हो ! अन पैशाकडे पण जरा नजर फेकाला पायजेते ! या कांमान अगदींच भोळेपणा नाय कामाचा !

सो०—आहा हा ! काय हीं मानभावाचीं बोलणीं ! तुमचे बरोबर बोलाला लोखंडाचं तोंड पायजे. चला बाई. इकडे गोष्टी करून पोट नाय भराच. राम्या अरे–राम्या–

रा०—(आंतून) जे—

सो०—अरे बाजारान जावाच नाय का ! सांज झाली न ! चला बाई त्याचे पाठीस लागेन तंव मेला जायल. (जाते.)

खं०—अजून जेवणाला बराच वखत हाय–चला, जरा दर्यावरून फिरून येवं. (जातो.)

प्रवेश ६ वा.

(स्थल—चिऱ्याचे बाजाराचा रस्ता.)

[रामा व गोविंदा.]

(एका बाजूनें रामा गडी हातांत बाजाराची टोपली घेऊन जात आहे. इतक्यांत समोरून गोविंदा गडीही हातांत टोपली घेऊन येतो.)

रा०—राम राम हो ! मामा रामराम !

गो०—रामराम ! रामराम !

रा०—कसं काय ? ठीक हाय नं ?

गो०—व्हंय, आपलं चाललंय.

रा०—पन आज तुमी यकटे कसे बाजारामंदी आलंव? श्येठ कां पाठसान येतांत वाटतं? नाय तर तुमासनी येकट्यासनी बाजारामंदी कंदीच बा बगतलं नाय. जंवं बगावं तंवं श्येठ आपले संगाती हैतच. आपनाला बा असं कंदी नाय चालनार.

गो०—काय करतांवं. आमचे हतं चाकराकडनं काइंच का आनत नाय; संमद श्येठ संवतां घेऊनश्यान येतांन.

रा०—हां बोवा आपनासनी कंदी नाय पतकरनार. संमदंच श्येठ आनायासनी बसल तर मंग पानसुपारीसनी अरदी दुगानी खुटनं मिलनार?

गो०—व्हंय बोवा. आपनासनी असा अरदी दुगानीचा लाभ कंदीच कां मिलत न्हाई.

रा०—त्याइर्षी ह्मनाल तर आमची कां लईच चंगाल. बाजार आननार कां मी. शाक भाजी आननार कां मी. तुप त्येल आननार कां मी. संमदंच कां आननार मी! आमच्या श्येटनां या गोसटीचा लईच तरास. थोरले श्येट झालॅ म्हातारॅ त्यांच्यांनं काय पोरावानी उठवस भाइर जावंतं. अन धाकट श्येट कां असतान सदा मंजेमदी. नेमीच कां नाच टिपनी होतातच हाईत. घरांमंदी अगदींच कां धीयान न्हाय–शनवार तर टिपनी बगर गेलांच न्हाय. अनी दररोज रांतचां कलप हाईच. जेवलं कां चाललं बंगलीवर. घरामंदी काय हाय नी काय नाय त्येची परवा कोनासनी हाय. घरामंदी काय का व्हयना.

गो०—तसं नव्हं. त्याचं कारन येगलंच हांय. श्येठ लोक पडले तंव घाणीमंदी कोण जातंयं. बाजारामंदी थोडी कां घाण परमाळ्ये.

रा०—काय तुमी तरी सांगतां मामा! अवो बाजार आनायासनी घान अन गटगटा बोमिल नी सरंगे नी करंदी खांयासनी घान नाय वाटत. अव तसं नव्हं. मोठे श्येठ लोक पडले नी हं हलकं काम कोन करतांय.

गो०—मंग काय तुमचे शेठ कंवंच वाजारामदी नाय जात वाटतं?

रा०—छेः नांव नकां काढूं त्यांचं. अन कंदी गेलंच तर मंग काय दोन दिडक्याचं मालाला दे दोन आने. अवं ते कशाला. तुमाला काय सांगुं मामा–अवं काल कां परवांचे रोज बाजारामंदी कां आलते एक भले थोरले श्येठ-पन बगाल तर बटाटी दोन दिडक्या शेर कां दोन आने शेर मिलतांन–तं दिखी

म्हाइत नाय. मंग काय रुपयान रुपयांचा फडशा उडाला. अन माल बगाल तर कवडी मोलांचा नांय. संमदा हलका माल. अव आमी तसां माल नेलां असतां तर आमासनी बोलून बोलून घेतलसतं. पन सोनारांन नांक टोंवलं–मंग बोलतांन काय!

गो०—बराबर हाय. कंदी बाजारामंदी आलसतील तंव कां नाय. अव पन ते द्या सोडून. अव तुमी संमदं आनतांव तर दर मइन्यांसनीं एक दोन रुपये पगारा पक्षां पडतांतच हांयत. खरं कां नाय?

रा०—दर मइन्यासनी कां? अव पडतांत कंदी दोन कंदी तीन. चाललयं· अव तळं राखायासनी बसलं तर पानी चाखल्या बगर राहातंय कां मानूस?

गो०—लाट हाय बुवा तुमचा. अव पन येवढं रुपये कसं मिलतांन तं सांगाल तर खरं.

रा०—अव ते काय पुसतांव. अव सकाल सांज बाजार आनन्यांत काय मिलनार? लई झालं तर दोन तीन दिडक्या अन् काय. पन दाना आनी तूप त्येल यामंदी खुब मिलतं. अव, दानेवाल्याच हतनं दाना आनायांसनी गेलांव झंजे थतनं मेजाचा घेऊनशी तेच्यातल्या पांच सा टिपऱ्या दिहीसरे दुकांनांवर इकायाच्या–तेल मनभर आनायासनी सांगितलं कां दोन तीन शेर कमी आनायच. असं हतनं थतनं मिलविलन झंजे होतं आपलं काम नी काय.

गो०—तुमी लईच कां नशीबवान! असं आनन्या नेन्यांत आमासनी कांय पन मिलत नाय. इक्तंच नाय, पन घरांमंदी बी चोरी मारी करायासनी सोय नाय. संमदं टाल्याकुलपांत.

रा०—त्या इषी झनाल तर आमच्या घरांत पर तसंच. पन चोरी करनारासनी हजार डोळे. त्यांतून बी डोल्यांत तेल घालूनशनी आमी आमचं काम करतांव. हं. समजलांव.

गो०—(रामाच्या टोपलींत पाहून) अहो पण, हां काय तुमच्या टोपलीमंदी चकाकतंय?

रा०—(टोपली बगलेंत मारून) काय नायवो मामा· उंगीच—आपलं.

गो०—पन दावाल तर खरां. आमी घेऊनशेनीं थोडंच जातांव.

रा०—(टोपलींतून एक ब्रांडीची बाटली काढून) हां बगातर· बिगिबिगीशी

बगा. न्हाय तर कुनी पाइल. हां कां नाय आमचे श्येमराव श्येटचा रोजचा का उकडा. त्ये बेजमजी फारश्याच्या दुकानामंदशी आनलीन! (आंत ठेवतो.)

गो०—काय ह्मनतां? रोजची असगी बाटली!

रा०—हांत्याच्या. अव येवढीन काय होतांय. चार पांच जणां जमले कीं मग बाटल्यांवर बाटल्यां न काय. अव हां त्यांचा एक घोट. काय मामा, अव तुमी आमी सणावारांला पितांव. पण यांना त्याबगर एक दीस नाय चालायचं. अव ही अवदसा–अवदसा–अन काय.

गो०—चला. एळ लई झाला. ते आमचे श्येट पन आले.

रा०—व्हय. लई एळ झाला. चला–आपन संगाती जांवया. (जातात.)

प्रवेश ७ वा.

(स्थल–सुंदररावाचें घर.)

[सुंदरराव व काशीबाई.]

सुं०—मग येतो का खंडेरावचा मुलगा तुझ्या पसंतीला?

का०—न येऊन काय करायचं. बिजवर तर बिजवर आणि अशा ढंगाचा.

सुं०—तशांत त्याची पहिली बायको त्याच्याच त्रासानें मेली असें ऐकतों.

का०—हो, पण करतां काय! पोरीचं तेवढं कुवारपण तें नाहींसं होईल. मग तिचं नशीब आणि ती.

सुं०—छे! छे! आपण होऊन आपल्या मुलीस अशा दुःखांत टाकण्यापेक्षां ती आपल्या इथेंच राहिलेली बरी.

का०—पण आणखी तिला किती दिवस संभाळणार! मेलं या पोरीच्या पायीं कोठें जाणं होत नाहीं येणं होत नाहीं.

सुं०—तूं ह्मणतेस हेंच खरें! आपली बेनु आतां वयांत आली. तिला सांभाळणें आतां कठीण. खरें, पण जाणूनबुजून अशा ढंगाच्या नवऱ्यास द्यावी तरी कशी?

का०—याच्यापेक्षां वाईट नवरे नसतात का? आणि समजा लगीन झाल्यावर नवरा वाईट निघाला तर त्याला काय करतात? तसंच समजावं ह्मणजे झालं.

सुं०—ठीक आहे तर–तुझ्या पसंतीस पडलें ह्मणजे झालें. मग पुढें त्रास नको. पण आतां पैशाची तजवीज कशी होते? दोन शेर सोन्यापुरते पैसे कोठून आणूं? एवढी रकम मिळणार कशी?

का०—दोन शेर कसं? फुलं भरायाचा बारा तोळ्यांचा गोप विसरलेत वाटतं?

सुं०—घे तर. अडीच शेर झालं. नशीब तीन शेरांचा आग्रह धरून बसलें नाहीं. पण एवढे पैसे कोठून आणूं?

का०—तें मी काय सांगूं?

सुं०—(विचार करून) सर्व मिळून कमींतकमी तीन साडेतीन हजार रुपये लागतील. तेराशें चवदाशें रुपये नुसते सोन्यांत गेले. दोन तीनशांचें रुपें होईल. मग एक हजारांत इतर सर्व खर्च आटपला पाहिजे.

का०—एक हजारांत तो बाकीचा खर्च कसा आटपणार! कपडेबिपडे त्यांतच कसे येतील? मेलं हौसेसारखं तरी कांहीं केलं पाहिजेना?

सुं०—हें पहा, तूं या वेळीं तुझी हौस विऊस एकीकडे ठेव. एकच मुलगी नाहीं. दुसरी आणखी आहे. शिवाय बाळ आहे. त्यांच्या लग्नांत तुझी हौस पुरवीन. त्या वेळेस पगारही वाढेल. हल्लीं आपल्या शक्तीपलीकडे खर्च करण्याची जरूरी नाहीं. अगत्याचें तेवढेंच करूं म्हणजे झालें. कां, तुझें तोंड कां उतरलें? मी ह्मणत होतों तुझ्यासारखी शहाणी बायको विरळा. हेंच कां तें तुझें शहाणपण! मुलाबाळांच्या लग्नकार्यादि प्रसंगीं आईबापांची, व विशेषता आईची हौस खरीः परंतु हें पहा, आपल्या शक्तीपलीकडे खर्च करून मग दुःख भोगणें हें बरें, किंवा आतांच शक्तीप्रमाणें खर्च बेताबातानें करून मग पंचाइतींत न पडणें हें बरें? बोल. तूं शहाणी आहेस. तुला सर्व कांहीं समजतें—तूं इतर बायकांसारखी उतावळी व असमंजस नाहींस.

का०—हो खरंच. आपण काय, आपली हौस आज पुरवून घेऊं. पण पुढें निस्तरावं लागेल आपल्यालाच ना!

सुं०—शाबास! कशी बोललीस बरं. बायको असावी तर अशी शहाणी

असावी. नाहींतर कित्येक बायका अशा असतात कीं नवऱ्याच्या मनांत दहा रुपये खर्चावे असें असलें तर त्या शंभर रुपये खर्चा ह्मणून सांगणार. आपल्या लोकांतील बायकांचा उधळा स्वभाव फार आहे व त्या जर नीट काटकसर करून संसार चालवित्या व आपल्या नवऱ्यांस वेळोवेळीं मन वळविणाऱ्या शब्दांनीं ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करत्या तर आमच्या लोकांत लॉ घेण्याचा जो प्रकार वारंवार दृष्टीस पडतो तो पडताना. असो. हिच्यासारखी स्त्री माझ्या वांट्यास आली हें मी माझें मोठें भाग्यच समजतों. (विचार करून) पण तीन हजार रुपये मिळतील कसे? इतके पैसे कोण देईल?

का०—तुमचे जिवाचे सोबती आहेत. त्यांजजवळ कां गोष्ट काढीत नाहीं?

सुं०—(हंसून) ठीक! ठीक! तुला या जगाचा अनुभव नाहीं ह्मणून तूं हें ह्मटलेंस तें ठीक केलेंस! परंतु मला तुझ्यापेक्षां या जगाचा अधिक अनुभव आहे! तुला सांगतों सोयरे मित्र हे चालत्या काळाचे आहेत! आणि पैशाची गोष्ट आली ह्मणजे मग मैत्री हा शब्दच विसरावा. मित्रांपासून कवडीचीही आशा करूं नये! त्यापेक्षां एकाद्या सावकाराकडून उसने काढलेले पतकरले. तो आपल्या सहीवर पैसे देईल. परंतु मित्रांकडे जाऊन पैसे मागितले असतां मग एकेकाचें जें तोंड सुटतें तें काय विचारावें! ते त्यांचे हृदयास टोंचणारे शब्द ऐकण्यापेक्षां मरणही पत्करतें! असो. यावरून तुझी खात्री होईल कीं मित्रांकडून कवडीचीही आशा करणें ह्मणजे व्यर्थ आहे.

का०—पण कोणाजवळ गोष्ट काढली होती का?

सुं०—तूं कीं नाहीं जितकी शहाणी आहेस तितकीच वेडी आहेस. मित्रांजवळ गोष्ट काढून माझा स्वतांचा अपमान करून घेऊं कां?

का०—जशी आपली मर्जी! मी आपला एक उपाय सुचविला.

सुं०—त्याबद्दल मी तुला दोष देतों आहे का? असो. पैशाच्या तजविजीकडे लागलं पाहिजे. (आंतून) आई–आई–

का०—कोणरे? बाळा कांरे?

बा०—आई, विश्वासराव आलय तो तुला बोलावतय.

का०—चल मी आलें. (जाते. ती गेल्यावर).

सुं०—(विचार करून) आतां कोणा सावकाराकडून पैसे काढल्याखेरीज

उपाय नाहीं! काय करतां! निरुपायास्तव तसें केलें पाहिजे! ह्मणतात ना, प्रत्यक्ष अनुभवावांचून कोणतीही गोष्ट समजत नाहीं. मीच इतके दिवस ह्मणत होतों हे आमचे परभु लोक कर्ज कशाला काढतात? मला वाटत असे कीं जर मनुष्यानें दृढ निश्चय केला कीं कवडीचें कर्ज म्हणून करावयाचें नाहीं तर तो कर्जबाजारी कधींही व्हावयाचा नाहीं. पण हे सर्व विचार जोंपर्यंत इंगा फिरला नाहीं तोंपर्यंत! माझाही असाच दृढ निश्चय! व त्याप्रमाणें मीं आजपर्यंत एका कवडीचेंही कर्ज काढलें नाहीं. परंतु आतां कर्ज काढल्याशिवाय उपाय आहे का? येथें माझा दृढनिश्चय काय करील? कर्ज न काढलें तर पैसे मिळणार नाहींत! पैसे न मिळाले तर मुलीचें लग्न होत नाहीं! झालं, इकडे सर्व अडतें! मुलीचें लग्न तर केलें पाहिजे! इतके दिवस तिला तशीच ठेविली. पण आतां आणखी किती दिवस ठेवणार? मुलगी उपवर झाली. उपवर मुलगीला संभाळणें किती कठीण आहे हें ज्यांच्या पदरीं उपवर झालेल्या मुली असतील त्यांच्या माहितींतलें असेलच. बरें, हिला तशीच सांभाळीन ह्मणेन तर तिच्या पाठोपाठ उपवर झालेली पुतु आहेच. बेनु समाधानवृत्तीची मुलगी आहे, परंतु पुतूस आपल्या स्थितीविषयीं वाईट वाटत असतें. आतांशा तिचें खाणेंपिणेंही नीट चालत नाहीं असें परवांच ती ह्मणाली. बेनूचें लग्न झालें नाहीं तों पुतूच्या लग्नाच्या तजविजीस लागलें पाहिजे. एकूण कटकट व चिंता यांतून सुटका नाहीं! असो! परमेश्वराची मर्जी! आपण काय करणार! कपाळीं लिहिलें असेल तें कांहीं केल्या चुकतें काय? चला, अंमळ विनायकरावाकडे जाऊं. पुष्कळ दिवस भेटलों नाहीं त्याला. कोण आहे रे तिकडे? रामा—अरे रामा—

बाळा०—(आंतून येऊन) दादाजी काय पाहिजे तुह्मांला? रामाला आईनें बाहेर पाठविलं आहे.

सुं०—तिला सांग–चहा झाला असेल तर काढून ठेव ह्मणून. मी आंतच येतों. विश्वासरावाला ह्मणावं जाऊं नकोस. (जातात.)

प्रवेश ८ वा.

(स्थल—रस्ता.)

[शामराव.]

शा०—(स्वगत.) फ्रेन्ड्स्[1] तर पार्टी[2] मागतात. जवळ एक पाईस्[3] नाहीं. पे-डे[4] लांब राहिला. पार्टीसाठीं पैसे आणावे कोठून ? नाहीं नाहीं ह्मणत असतांही त्यांनीं हें लचांड गळ्यांत घातलेंच, व मी भिडेनें त्यांनां प्रॉमिस्[5]ही देऊन चुकलों. तें सगळं ठीक झालं पण पैशाचं सोंग कसं येतं! कांहीं दिवस थांबा ह्मणालों तर ऐकत नाहींत. नेक्स्ट् स्याटरडेचा[6] दिवस ठरविला आहे. दीडशें रुपये मिळतात कसे ? (विचार करून) पण मी वेडा तर नाहींना! इतक्या विचारांत कशाला पडलों! आमचे ब्यांकर्स[7] मेसर्स नगा भगा अँड् को[8] तर कोठें गेले नाहींत ना! वा! असे उदार सावकार पाहिजे तेव्हां पैसे द्यावयास तयार असतांना मला का पैशाची वाण! हं! हं! कॆम् ऑन्. लेट् अस् गो टु देम्[9]— (जातो.)

प्रवेश ९ वा.

(स्थल—रस्ता.)

(एक मारवाडी चालला आहे. त्याच्या पाठीमागें कांहीं पारशांचीं पोरें लागलीं आहेत.)

पोरें—अरे ए हेटाजी! तीनशेंड्या–(हातांतली चोपडी हिसकावून घेऊं पहातात.)

मा०—(चोपडी गच्च धरून) चल साला. जावोछो के नहीं के बोलावुं सीपाइने ? (ओरडून) सीपाई!

पोरें—हुर्यो–हुर्यो–(चेष्टा करीत जातात.)

---

१ मित्रमंडळी. २ टिफिण. ३ दिडकीदेखील. ४ पगाराचा दिवस. ५ वचन. ६ येता शनिवार. ७ सावकार. ८ आणि कंपनी. ९ चला त्यांच्याकडे जाऊंया.

मा०—साला पोरियाओ अमथा हेराण करेछे! (जाऊं लागतो इतक्यांत शामराव समोरून येतो त्यास पाहून) अरे ए शामराव. अवज्या धांदलमदी कोठें चालला?

शा०—कोण? नगा? वाः फार चांगलें झालें. मी तुझ्या दुकानावरच येत होतों.

मा०—हसा चडला ते देवाला के? आण आण इकडेच दे पैसा (हात पुढें करतो).

शा०—नाहींरे बाबा. माझ्याच गरजेसाठीं तुझ्या दुकानावर येत होतों.

मा०—अरे तुला तो सदाची गरज हाय! तुला दर महिन्याला काय तरी घेतल्या वगर चेन नाय पडते–टेव पडून गेला. खरा के नाय?

शा०—(काकुळतेनें) नगा, हें बघ मला दोनशें रुपयांची गरज आहे. फार गरज आहे.

मा०—(रागानें) ती वारता मे नही सांभळेल. अगोदर पाछलचा रुपया देशेल तो पछी ते वारता.

शा०—पाठीमागील रुपये द्यावयाची शक्ति असती तर मग आज मला येथें यावयाची काय गरज असती! हें पहा, मला पैशांची फार नड आहे. आई फार आजारी पडली आहे. तिला मोठा डाक्टर आणावयाचा आहे.

मा०—अरे ज्या. ते मे समदा समजते. उगीच आयेसला मांद्यामदी कसाला पाडते? तुला मोज मारायला पायजे, नायते जुगारामंदी गमावाला पायजे! वात खरी के नाय? बोल!

शा०—(लाजून) अरे तुला त्याचें काय! तुला पैसे परत दिले म्हणजे झालें कीं नाहीं?

मा०—अरे तू दर वखताला असाच बोलते. पण पैसा देवाला रडवते. आमच्या घरामंदी रुपयाची टांकसाळ हाय वाटते? आमच्या घरामंदी पैसा पिकते वाटते? तुमचे परभु लोक पैसा घेवाला हुषार पण देवाला रडवते–रडवते.

शा०—(त्याच्या दाढीस हात लावून) अरे पण नगा, गरजेच्या वेळेस असा अडवून धरतोस हें चांगलं काय? मला खरोखर दोनशें रुपयांची मोठी गरज आहे.

मा०—असेल. मी कंव नाय म्हणते. पण माजा अगोदरचा पैसा टाक. त्या-वगर मी तुजी गोष्ट नाय ऐकेल.

शा०—(विशेष काकुळतीनें) नगा, आपली किती वर्षांची देवघेव आणि आतां तूं असें करतोसना?

मा०—असा नाय तर कसा करेल? तुमाला पैसा देत जायेल! आणि तुमची तर देवाची वारता नाय! आमचे घरीं पैसाचा झाड हाय वाटते! हालवला के पडला हजारो रुपया. काय शाण्यावानी गोष्टी सांगते! तुज्यावर सात हप्ता चढला. अवडे दिवस थांबला पण उद्यां फिर्याद करेल. नायते पगारावर टांच काढेल.

शा०—(पुन्हां त्याच्या दाढीस हात लावतो व लीनतेनें) नगा! असं काय करतोस! या वेळेस माझी लाज राख. आईची शपथ पुढल्या मोस्तराला तुझे सगळे हप्ते चुकवीन!

मा०—अरे जा. पुढल्या मोस्तराला चीनचा तारवा येणार हाय वाटते! मला फसवाला पाते का? पण मी पक्का हाय समजलास!

शा०—अरे पुढल्या महिन्यांत माझें लगीन होणार आहे. तेव्हां सासऱ्याकडून जो हुंडा येईल त्यांतून तुझी सर्व रक्कम फेडून टाकीन. आतां तर खातरी झालीना?

मा०—(विचार करून) बर! पायेल! पायेल! आज तर माजे जवळ पैसा नाय. सकाळचा ये. मग तिनशेची चिठ्ठी लिवून दे ने तुझा दोनशे रुपया घेऊन जा. पण आवते मोस्तराला समदा रुपया दिला पायजे हो! नायतर लागली फिर्याद करेल! हं!

शा०—अरे होयरे खचीत देईन. हें घे वचन. (वचन देऊन) मग राहूंना तुझ्या विश्वासावर? नाहींतर अगदीं ऐन वेळेवर घात करशील!

मा०—अरे नाय. मे एक वखत बोलला बस्स. उद्या रातचा ये. पण आवते मोस्तरावर समदा पैसा देल ने?

शा०—अरे हो. आईची शपथ देईन. मग झालेंना?. मी येतो आतां! उद्या रात्रीं नऊ वाजतां येईन. पैसे तयार करून ठेव बरं.

मा०—बरा बरा आतां जा.

शा०—(जातां जातां) आतां पार्टी देण्याला कोणाच्या बापाची भीति आहे?

(जातो.)

मा०—(स्वगत) ए शामराव ने शुं कहीए ? एने सुमार बिलकुल नथी. बस करज काढ्याज करेछे. पण ए सालो आपशे क्यांथी ? मारा हजारएक रुपीया निकलसे. (विचार करून) पण ए सालानुं लगन थवानुं छे. त्यारे आवशे खरूं तेनी पासे-कंइ बेत्रण शेर सोनुं तो आवशे. तेवखते गडबड सडबड करीने तेने पासेथी बधुं काढी लेशुं. ते पछी पण हातमाने हातमांज रेहेशे. ज्यायछे कां ? निकाल करे तो पण आडनी चिठी तो मारी पासे छेज ने. चालो. (जातो.)

प्रवेश १० वा.

(स्थल—मुगभाट गल्लीचा नाका.)

[सुंदरराव व दलाल भगवानदास.]

सुं०—(उसासा टाकून) कां भगवानदास, आपलें काम होण्यापूर्वीं आणखी किती ठिकाणीं तरी हिंडावें लागणार ?

भ०—सूं कहूं शेट ! आज पंदर वरस थयां हूं दलालीनो धंदो करू छुं पण तमारा काममां जेटली मेहनत पडी तेटली कोई बिजाना काममां पडी नहीं हशे. शुं कहीये ! सवारथी तो अत्यारसुधी हुं तमोने पांच छ सावकार पासे लई गयो पण एके ठेकाणे काम थयुं नही. आतो मने वणी अचरतनी वात लागे छे.

सुं०—नवल कसचें ! माझें दुर्भाग्य ! पण भगवानदास, इतकी मेहनत करून काम पार पडेलना ?

भ०—ते विशे तमे बेफिकर रेहेजो. आ भगवानदासे जे काम हातमां लिधुं ते न थाय तो पछी हुं दलाल सा कामनो ! हवे एटलुं खरू के तमोने आ काममां थोडुंघणुं पण नुकसान खमवूं पडशे.

सुं०—तें कसं काय ?

भ०—जुवो शेठ. हुं हमणा तमोने एक मारवाडीनी दुकान पर लई जाऊंछ. तमोतो ये लोकोनो वेवार जाणता हसो. कदाच तमोने अनुभव नही हशे तो पण तमे सांभळ्यूं हशे के ए लोको व्याजमां मारी नाखे छे. अने कोई कोई वखते

एकनूं बमणूं पण लखी आपवूं पडे छे. ते वगर ए मारवाडी लोको पासेथी पैसो मलवो घणो मुशकेल छे.

सुं०—तें मला सर्व ऐकून माहित आहे. या मारवाडी लोकांच्या जबरदस्त व्याजानें आमच्या शेंकडों लोकांचा सत्यानास होऊन गेला आहे. तेव्हां अशा लोकांच्या हातीं आपण होऊन आपली शेंडी देणें हें मोठें धाडसाचें कृत्य खरें. भगवानदास, मारवाड्याखेरीज इतर सावकार आज मुंबईत थोडे आहेत का?

भ०—शेटजी बीजी जातना सावकार घणाए छे. पण ते लोको पासेथी आंगउदार पैसा मळवा एतो मुशकेलनी वात छे. जुवो. सवारमां हूं तमोने त्रण वाणिया पासे लई गयो हतो पण ते लोकोये शुं कह्युं! हमो आंगउपर पैसा धीरता नथी. कांइ जनस गीरवी मुकशो तो त्रण शूं पण पांच हजार आपीशुं. तेचप्रमाणें तमारा जातभाई पासे नोतो के लई गयो ? पण तेणें केवो रोकडो जबाब आप्यो ते सांभळ्युं के नही ?

सुं०—त्याची आतां गोष्ट कशाला! पण भगवानदास, आपणांस आतां मारवाड्याकडे गेल्याखेरीज दुसरा उपाय नाहींसें दिसतें.

भ०—जोवो सुंदरराव, तमोने तो आंगउधार पैसा जोइयेछ. ते तो मारवाडी वगर कोइ बिजो सावकार आपशे येवुं मने लागतूं नथी.

सुं०—(उसासा टाकून) ज्यास मी भीत होतों तेंच कपाळीं आलें ! असो ! परमेश्वराची मर्जी ! भगवानदास चला तर. उगीच वेळ कशाला.

भ०—(आसपास पाहून) जुवो ते मारवाडीनी दुकान. त्यांहां मारी ओळखाणनो मारवाडी छे. त्यांहां वात काढीने जोइये. पछी तमारा नशीब! चालो सांभेना रस्ताथी. (जातात.)

प्रवेश ११ वा.

[**स्थल**—मुगभाटची गल्ली—एका मारवाड्याचें दुकान.]

(मारवाडी चोपडी लिहीत बसला आहे. बाजूस एकदोन गिऱ्हाइकें त्यांत एक मराठा नारायण, त्याची बायको व मुलगी उभीं आहेत.)

ना०—दादा तेवढा माझा हिशेब नक्की करून टाक कीं. आज किती दिवस

झाले तुझे पाठिशीं लागलोंय तरी ! घे तुझे पैसे व तेवढे माझे दागिने परत दे. ही बघ बायकोही बरोबर आली आहे.

ना० बा०—होयरे दादा. टाक एकदांचा हिशोब करून. या पोरीनें तिचे दागिन्यांसाठीं माझा जीव खाल्ला आहे.

ना० मु०—आई–आई–याचेपाशीं कां माझे गोट आहेत ? कशाचे ते आतां परत मिळणार ! असा हा मोठ्या दाढीमिशीचा बावा कशाचे दागिने परत देणार ! बघ–बघ–केवढाले मोठे डोळे करून मजकडे बघतोय ! बघ.

ना०—अग पोरे उगी बैस ! (मारवाड्यास)–करतोसना बाबा हिशेब ? किती वेळ अजून खोटी करणार ?

मा०—(रागानें) अरे तुमी समदा मिळून काय डोका उठवला माजा तरी ! जा–जा–आज माला फुरसद नाय. सकाळचा ये–अरे तू तरी अवडा डोल कशाचा करते रे ? पैसा देवाला तयार हाय ! दागिना सोडवते काय ? अरे अवडे पंचाइतीमदी कशाला पडते ? ते दागिना तूं आज घेऊनशी गेला तर केवडा दिवस तुजेजवळ ठेवशेल ? अरे ते दोनचार महिन्यांमदी पुना येऊन ते पेटीमदी पडलाच समज.

ना० मु०—आई–आई–असं कायग हा मारवाडी बोलतो ? खरंच कां ग ? माझे गोट पुन्हा याचे पाशीं आणून द्यावयाचे का ? अं–अं–मी नाहीं पुन्हा नेऊं देणार ! अं–अं. (रडूं लागते.)

ना० बा०—(मुलीची समजूत करून) अग वेडे तो मस्करी करतोय. एकदां त्याचे पैसे देऊन टाकल्यावर त्याचा तुझे गोटाशीं काय संबंध ! (नवऱ्यास)—अहो तुमचे बुद्धीला झालं तरी काय ? तो दमबिम सगळा घरांतच का ? हा येवढं बोलतोय पण त्याला एक शब्दही जबाब देववत नाहीं का ? अगदीं गुपचिप ऐकून घेतां ते ? मेला कसकसे बोल बोलतो. म्हणे दागिने पुन्हां पेटींत येऊन पडतील ! त्याचे बापाचा माल ! पण त्याला बोलून काय उपयोग ! आपलाच दाम खोटा ! एकदां मारवाडी घरांत शिरला व त्याची नजर घरांतले दागिन्यांवर पडली कीं लागली त्यांनां वाट ! मेल्यानं हळूहळू माझे व या पोरीचे दागिने नेले तेव्हां झाले त्याचे डोळे थंड ! यांचे तरी बुद्धीला भुरळ पाडली आहे कशी ! पाहिजे त्या कागदावर सह्या करून देतात ! सगळं कमावतात ते घालतात

मेल्याच्या उरावर–व तेवढंही करून कर्ज आहे तें आहेच ! व घरांतलं सगळं अगदीं बारिक सारिक वस्तूपर्यंत गेलं ते गेलंच ! कशी सळसळीत पार्वती करून टाकली ! (रडूं लागते).

ना० मु०—आई, कां ग तूं रडतेस ? माझे गोटासाठीं होय ? नको आई ! नसतील मिळत तर जाऊं दे. चल–बाबा दुसरे करून देतील–पण तूं रडूं नकोस. तुला रडतांनां पाहिलें ह्मणजे मला रडूं येतें. (रडूं लागते.)

मा०—अरे ए नाराण–या तुजे बायकोन कवडा ढोंग मांडलाय ! असा रडूनशी हा मारवाडी घाबरेल नाय ! कसाला तूं या लोकाला माजे पेढीवरती घेऊन आला ? लोकाला मजा दावाला ? अने आमचेसारखे अब्रुदार माणसाची अब्रु घेवाला काय ?

ना०—जाऊं दे रे, त्यांचेकडे तूं लक्ष देऊं नकोस. तुला त्यांच्याशीं काय करावयाचं आहे–चल–कर आपला हिशेब कर. (त्याच्या दाढीस हात लावून)–कर दादा हिशेब कर.

मा०—बर ! बर ! करते हिशाब (चोपडी काढून पाटीवर हिशेब करून कांहीं वेळानें)–हे बग–मुदील दिडशे रुपया–ने आठ महिन्यांचा व्याज—

ना०—काय ह्मणतोस–इतक्यांत आठ महिने कसे ते झाले ?

मा०—काय ह्मणते ? आठ महिना कसा झाला ? तुला दिवाळीला पैसा दिला ने ? मोज बगु. कारतक एक. मगसीर–दोन. पोस–तीन. माग–च्यार. फागण–पांच. शिमगा–सा. होळी–सात. ने गेला मास चेतर. झाला के नाय आठ महिना ?

ना०—वरं. ते व्याजाचे किती झाले ?

ना० बा०—अहो पण तुमची अक्कल कोठें गेली ? त्याला विचारा फाल्गुन–शिमगा न होळी हे तीन निरनिराळे महिने आहेत का ?

ना०—अग हो ! खरंच–माझे ध्यानांत नाहीं आलं. कायरे, ही बघ काय सांगते ती.

मा०—अरे बायको माणसाला हिसावाची वारता काय समजते ? आमचे लोकाचा शिरस्ता हाय तसा हिसाब करेल.

ना० बा०—आग लागली तुझे शिरस्त्याला ! तुह्मी तरी काय असे वावळटा-

सारखे करतां? काय रे, तूं नीट हिशेब करणार कीं बोलवूं पोलीसचे शिपायाला? तूं समजूं नकोस–मी बायको आहें म्हणून तुला भिऊन जाईन. चल बाळे, आपण शिपायाला घेऊन येऊं–(जाऊं लागते).

मा०—(धावरून) अरे कोठे जाते? सबूर. ते माझी भूल झाली. अरे–भूल झाली. तू सांगते ते खरा! सा महिन्याचा व्याज झाला. माणूसला भूल होते! बरा तर मुदील दिडशे रुपया ने सा महिन्याचा व्याज झाला अठरा रुपया–आण एकशे अठसट रुपया—(रुपये घेऊन दागिने काढून देतो.)

ना०—(जातांनां) सुटलों एकदाचा याच्या हातून! देवा! नको पुन्हां देऊं यांच्या हातीं माझी शेंडी. (दागिने बायकोस देऊन) घे बाई तुझे दागिने! झालीस आतां खुषी! बघ पाहूं माझेकडे एकदां हंसल्या तोंडानें! (जातात).

(सुंदरराव व भगवानदास येतात.)

मा०—आवो–शेठीया आवो–बेसो. (सुंदरराव व भगवानदास बसल्यावर जवळ बसलेल्या पोरास) अल्या, आ पैसो ले ने बे पैनी पानसुपारी झट लइ आव. ने एक पै पाछी लाव. जो, एलाची भुलतो ना हो. (पोर जाऊं लागतो त्यास) पांच सात एलाची लावजे हो.

पोर—एटलुं बधुं कोण आपसे बे पैमां?

मा०—अरे जा. जेटलुं आपे तेटलुं लई आवने. (पोर जाऊं लागतो त्यास) अरे भुली गयो. जरा तामाकु पण लई आवजे हो! जो पइ पाछी लावबा भुली जशे! (पोर जातो.)

मा०—केम शेठीआ तमारो शो हुकम छे?

सुं०—माझा मित्र भगवानदास तुला सर्व सांगेल! भगवानदास सांगा सर्व गोष्ट याला.

भ०—आ बाजुपर आवो. वात जरा नाजुक छे. कोय सांभळसे ते सारूं आपणे एक बाजुपर वातो करीए.

मा०—वारूं त्यारे चालो पेली कोर. (मारवाडी व दलाल एका बाजूस जातात व कांहीं मसलत केल्यासारखें करून येतात. पोर पानसुपारी घेऊन येतो–ती खाऊन).

मा०—सुंदरराव सेठ, भगवानदासनी माला संमदा समजवला. तुमाला तीन हजार रुपया पायजे. पण ए वखतामदी फकत आंगावर अवडा पैसा कोण कसा धिरेल? काय दागिना बिगीना–नाय ते पॉलिसी गहाण ठेवेल तर मग बगेल.

सुं०—(मनांत) अरे देवा मजजवळ दागिने असते तर याच्या दुकानीं कां आलों असतों! (उघड) हें पहा, माझ्याजवळ दागिने वगैरे कांहीं नाहीं. पॉलिसीही काढलेली नाहीं. मला केवळ अंगावर पैसा पाहिजे.

मा०—बरा, दागिना नाय ते नाय–पण तुमाला पांच हजारांची पॉलिसी तो काढाला पायजे–अने तेबी आमचे नांवावर करून देवावा लागेल.

सुं०—आतां या वयांत पॉलिसी कसी मिळणार? व मिळाली तरी पैसे फारच भरावे लागतील. ते भरून तुझा हपता कसा पोहोंचणार?

मा०—ते समदा खरा! पण तसा कराला तो पायजे. त्याचे शिवाय पैसा कोण देल?

सुं०—कां भगवानदास–तुह्मी तर अगदीं खातरी दिली होतीत व हा तर असं सांगतो!

भ०—हुं सुं कहुं सेठ? मे एने घणुं समजाव्युं पण ये नथी सांभळतो. जुवो सुंदरराव. तमारे तो पॉलिसी लेवी पडसेज. तेनी फकर ना करता. मारी ओळखाणनी आफीस छे. त्यांथी हुं तमोने किफायतथी कढावी अपावीश.

सुं०—ठीक तर–(मारवाड्यास) बरं आहे–तुमच्या ह्मणण्याप्रमाणें पॉलिसी काढून देतों. आतां तर हरकत नाहीं. पण पैसे लवकर पाहिजेत. पांचसात दिवसांत पाहिजेत.

मा०—भगवानदास–तमे पॉलिसीनुं काम जलदी करावजो. अमारा पैसा तयार छे. (सुंदररावास) पण सेठ व्याज हपता वगैरे समदा खबर हायने?

सुं०—तें सर्व भगवानदास तुमचे बरोबर नक्की करील. माझे ठिकाणीं तो आहे असें समजून त्याचे बरोबर सगळं कांहीं नक्की करा! कसं काय भगवानदास खरं कीं नाहीं?

भ०—अरे हा! ते विशे तमे बेफिकर रहो. चालो—(जातात.)

प्रवेश १२ वा.

(स्थल—कांदेवाडीचा रस्ता.)

[रामराव व विश्वासराव.]

रा०—(स्वगत) आनंदरावानें सांगितल्याप्रमाणें सरस्वतीकडे काल गेलों होतों

पण ती पुण्यास गेली आहे अशी खबर मिळाली. बरं आज इकडे आलों तों तिला सॅटरडेचेंच[1] एंगेजमेन्ट् आहे. काय करावं—आतां कोणाचे इकडे जावं ? आपल्या ओळखीपैकीं आतां एक श्यामी काय ती राहिली. पण ती आपल्या काय उपयोगाची ! छः आतां आनंदरावलाच सांगावं कीं तूं पहा बुवा नायकिणीबद्दल. आपलं कांहीं जमत नाहीं. चला आतां त्याच्याच घरीं जावं. (समोर पाहून) अरेच्चा ! हा आणखी इकडे कोठें आला ? छः त्यानें जर कां मला इकडे पाहिलं तर मग मी इकडे कोठें आलों हें विचारल्याशिवाय तो कध्धीं रहावयाचा नाहीं–व जर कां त्याला खरं सांगितलं तर मग काय, इकडेच भररस्त्यावर लेक्चर सुरू व्हावयाचं. ह्मणून त्यानें मला पाहिलें नाहीं तोंच त्याची नजर चुकवून आपण त्या बाजूनें निघून जावं हेंच वरं. (जाऊं लागतो इतक्यांत विश्वासराव पुढें येतो व दोघांची नजरानजर होते.)

वि०—कसं काय रामराव, तूं इकडे कोठें ?

रा०—(मनांत) पकडलं बुवा एकदाचं. चाणाक्ष खरा ! त्याची सगळेकडे दृष्टी. मी ह्मणत होतों सुटलों एकदांचा. पण तो कसला जबरा ! (उघड) नाहीं रे, इकडे एकाला भेटण्यास आलों होतों.

वि०—(हंसत) अरे एकाला ह्मणण्यापेक्षां एकीला कां ह्मणेसना ? रामराव, तूं मला फसविण्यास पहातोस काय ? अरे मी त्या नाक्यावरून तुला त्या समोरच्या घरांतून उतरतांनां पाहिलें; समजलास.

रा०—(मनांत) अरेच्चा मुद्देमालासुद्धां पकडला गेलों ! शर्थ आहे याची. आतां याजपासून खरी गोष्ट लपवून ठेवणें ह्मणजे स्वतांची जास्ती फजिती करून घेण्यासारखें होय. सांगावं ह्मणजे झालं. (उघड) विश्वासराव, खरंच सांगूं का तुला ? मी तानीला विडा देण्यास आलों होतों.

वि०—हं असं काय ? पण कायरे, तूं हा संभावित धंदा केव्हांपासून करूं लागलास ? सगळी लाजलज्जा गुंडाळून—

रा०—अरे जाऊंदेरे ! यांत धंदा कशाचा ? आमची नेक्स्ट् सॅटरडेला[2] पार्टी आहे, तेव्हां नायकीण एंगेज्[3] करावयाची होती. आणखी काय ? अरे दुसऱ्याला सांगितल्यापेक्षां स्वतांच विडा दिला ह्मणजे सगळ्या रीतीनें फायदा होतो.

---

१ शनवार गुंतला आहे. २ येत्या शनवारीं पार्टी. ३ ठरवायाची.

वि०—ओयेंस्[1]! त्याशिवाय इकडच्या तिकडच्या मिळून दहा पांच पट्टया तोंडांत पडतात हा लाभ निराळाच! व तानीसारख्या संभावित स्त्रियांबरोबर गोड गोड भाषण करण्यास संधी सांपडते हाही अलभ्य लाभ पदरीं पडतो ह्मणावयाचा. खरंच कीं नाहीं?

रा०—तूं ह्मणतोस तसं कां होईना! बरं तर मी येतों आतां. (जाऊं लागतो.)

वि०—(त्यास अडवून) अरे पण या पार्टीस नायकीण येणार तेव्हां स्पेशि-[2]अल पार्टी आहे ह्मणावयाची. कोणी दिलीबिली आहे कीं काय?

रा०—अरे येस्[3]! शामरावानें दिली आहे. त्याचं आतां म्यारेज्[4] व्हावयाचं आहे कीं नाहीं ह्मणून. समजलास आतां? चल जाऊं दे–एॅक्सक्यूज मी. आय् ह्याव् नो टाइम् नाऊ.[5]

वि०—बरं तर जा. (रामराव जातो.) अरे या शामरावनें मांडलं आहे तरी काय? फारच फास्ट्[6] चालला आहे! त्याची ऐपत ती काय? सारी वीस पंचवीस रुपड्यांची चाकरी! व तो अशा प्लेझरपार्टीज देतो! हें आहे तरी काय? व हा एवढा पैसा आणतो तरी कोठून? छः त्याचं चिन्ह आपल्याला बरं दिसत नाहीं. मी त्याचा स्कूलफ्रेन्ड्[7]. आमची स्कूलमध्यें[8] इतकी फ्रेन्डशिप्[9] होती कीं आह्मांस एकमेकांशिवाय एक घटकाभर चैन कसें तें पडत नव्हतें. त्याचा अभ्यास पण त्या वेळीं कसा चालला होता. पण त्याचें तें फर्स्ट म्यारेज्[10] झालं त्या वेळेपासून पडलं अभ्यासावर पाणी. पुढें मग लहानपणींच संसारांत पडल्यामुळें शाळा वगैरे सुटून तो वाईट संगतीस लागला. तरी पण त्याची वाइफ्[11] जिवंत होती तोंपर्यंत कसा तरी रीतींत होता. पण त्याची ती वाइफ्[11] वारल्यापासून अगदींच बिघडला! आतां तर त्याचे ते फ्रेन्ड्स्[12], क्लब, प्लेझरपार्टीज्, नाचतमाशे यांत सदा निमग्न! काय चमत्कार आहे. हा शामराव असा निघेल असें माझ्या स्वप्नीं पण नव्हतें! असो. जरी तो माझी फ्रेन्डशिप्[9] सोडून अशा वाईट संगतीस लागला आहे तरी त्यास दोन गोष्टी सांगून ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करणें ही माझी ड्युटी[13] आहे असें मी समजतों. पहावं तर खरं. आपल्या हातून होईल तितकें करावें. पुढें त्याचें नशीब. चला— (जातो.)

---

१ तें खरेंच. २ खास. ३ होय. ४ लग्न. ५ जाऊंदे मला आतां वेळ नाहीं. ६ अयोग्य रीतीनें वर्तत आहे. ७ शाळेंतील मित्र. ८ शाळेमध्यें. ९ मैत्री. १० पहिलें लग्न. ११ बायको. १२ मित्र. १३ कर्तव्यकर्म.

प्रवेश १३ वा.

(स्थल—खंडेरावाचें घर.)

(खंडेराव घरखर्चाचा हिशेब लिहित बसले आहेत.)

खंडेराव—(स्वतांशीं) हं! अनं दोन आणे बाजाराचे. अवडे पैसे बाजाराला! इजून कनाय उधळा खरच चालवलय अगदीं! तिला सांगाला पायजे. स दिडक्याचे वरती एक अरदी नाय खरचाची. थोडा झाला स दिडक्याचा बाजार एक वखताला? बराबर हाय! चाकराचे जवळशीं आणाचा. तवं थोडक्यामंदी कसा येते? पण या पोरांनां आपुण जाऊन आणाला का होते? सगळं चाकरावरती टाकतांन ते! बरं! बाजाराचे दोन आणे. अन का? स आणे वखंदाचे. कोणाचं हें वखंद? हं. तिचंच. का बोलावं तरी! पि–पि–पितान वखंद. पिवाला का होते! पैसे भरावे लागतांन माला. सांगतय तिला, दवाखान्यांनशी वखंद आणूं नको म्हगुण. यांनां पडशा खोकल्याला घरगुती वखंद नाय का करवे! एक अरदीचा ओला च्या आणला ह्मणजे बस्स! सगळाच बाजीरावी डौल—

(इतक्यांत सोनाबाई येते.)

सो०—एक पावली हाय का जवळ?

खं०—(खिसा चाचपून) नाय. माजेजवळ नोट हाय ती मोडाची नाय. कां? कशाला पायजे?

सो०—नाय. ती वेयीणबाय आलय न. तिचेसाठीं काय आणवतय–बरफी बिरफी नाय तें का फळं बिळं.

खं०—कवडा डौल! अग अवडा डौल कराला आपले जवळ पैसा नाय ओतून चालला. घरांन काय असेल ते द्या. नायते च्या ते कोठे गेला नायन?

सो०—अहो पण ती वेयीण न? तिचेसारखा तिला मान नको का कराला?

खं०—केलात मान! अशे डौल करून भीक मागाल भीक–अन अवडच करून कसं पुरेल! एकतबक बिबक नाय का पाठवाचं? पाठवा–पाठवा–वेयीणबाय आलय नं! मोठं बोलून घेवाला पायजे क नाय?

सो०—(रागानें) जळळं तें मोठेपण. मोठं बोलून घेवासारखं ते तुमी का करून देता. पण शोभेल तसं केलं पायजे न? मी का आजच जनामदशीं उठलू नाय.

खं०—वरं. बरं. (पैसे काढून) या घे चार दिडक्या. अन आणव काय तरी, जा.

सो०—असा कसा तरी तुमचा जीव पैशाला चोमडा कोणाला बा खबर. एक चवली पण नाय का देववे?

खं०—अग, अथ माजेजवळ चवली नाय. जा, तवड्यामदीच आटपा! (सोनाबाई जाऊं लागते.) अग पण सबूर, ही बग एक दिडकी हाय. ही तपकिरीसाठीं ठेवलती. ती घे. आजचा दिवस चालवीन तसंच. घे. झालं आतं? (सोनाबाई जाते.)

खं०—(पुन्हा हिशेव करीत असतां) हं. पांच दिडक्या वेयीणबाई आली तिचेसाठीं खरचाला. सगळे मिळून कवडे झाले? ते-तीन नं ते—दोन. नं ते-स. तीन नं दोन पांच-नं स अकरा-नं या पांच दिडक्या. सवाबारा आणे-अ-ब-ब-ब-!

(सोनाबाई व काशीबाई येतात.)

सो०—या वेयीणबाय का बोलतांन ते ऐकलं का?

खं०—या, वेयीणबाय या. या, काशीबाय या.

का०—आलूंनं.

खं०—अग वा! अग दुदामदी साकर पडली! अग आमी न हे शेजारी रात होतूं! इचे बापासचा न माजा ह्मोट्टा घरोबा होता. हिला अवडी धाकलीशी पायलय. अनं आतं ते अगदी वळखवे नाय. अग, इला मी हातावर घेऊन खेळवलय, समजलीस. बरं ते, तुमी बसा. मी जरा जातय भायेर.

सो०—भायेर कणाला जाता. तुमचंच काम हाय. रीतवीत कशी का कराची ते विचाराला आल्यांन.

खं०—ह्मणजे? आतं विचाराचं का रायलय? बाळंभटांन नायका सांगितल? त्याचे जवळ टीप लिवून दिलय. मी माजे हाती लिवली—मी—

सो०—हो. पण त्यांच असं सांगणं हाय का सोकरा सोकरी म्होटी हांन तवं

भातक, रुखवत, समजवणी कणाला पायजे. त्यांन पैसा घालाचा त्याचंच दुसरं काय करतींन ते.

खं०—ते दुसरं विसरं मगशी कोण करीनाय. उगीच बोलाला मातर. ते काय नाय. सोकरा ह्मोटा झाला ह्मणून त्याचं लगीन निगडवण कराचं का–का? मग अवडं तरी कशाला? देवळांन नेऊन सायबासारखं लावून टाकावं लगीन ह्मणजे झालं.

सो०—तस नाय. त्यांचे इकडे या वेड्या वेड्या चाली नाय भावत. ह्मणून सांगून धाडलय.

खं०—त्यांनां नसतीन भावत तर त्यांनां सांग तुमचे सोकऱ्याचं लगीन कराल तवं नको घेव भातकबितक. मी नाय कबूल करणार कदी. कदी नाय कबूल करणार!

सो०—अहो पण शामाच लगीन झालं नाय का? आतं भातकबितक कणाला पायजे! का कराच हाय! एक येऊन पडलय तेच धूळ खातय. उगीच त्यांनां खरच अनं आपल्याला ते कामाच नाय. अन ते दोन दोन रुखवताचे ठाय का कराचे? माळ्यावरती धूळ खात ठेवाचे क नाय? जागा मातर अडून जाते. दुसर का!

खं०—(रागानें) अग वेडी हायस तूं–वेडी. (काशीबाईस) हें बगा, वेयीण वाय. तुमीं माला हासा का पायजे ते करा. शाणा बोला का वेडा बोला. माझे शामाचं लगीन मी अगदी पैलवरा सारखं करणार. त्यांन अवड पण कमी नाय कराचं. बीजवर झाला ह्मगुण का पाप केलं त्याजून?

का०—तसं नाहीं. त्यांचं ह्मणणं असं कीं उगीच हा निरर्थक खर्च करण्यांत हांशील नाहीं. त्या कांचेच्ने सामानांत उगीच पैसा कशाला टाकायचा! तशीच रुखवताचे लाडवाची गोष्ट. निरर्थक तूपसाखरेचा नाश. एवढे पैसे खर्चून लाडू करायचे. पण ते कोणाचे तोंडांत तरी जातात का?

सो०—हो खरंच. ते बासे बिशे झाल्यावरती मगशी वाटाचे! अन तो पण अवडा अवडा तुकडा. कोण तो खाते? करणाराला मातर खरच होते!

खं०—(सोनाबाईस एकीकडे नेऊन) अग हे जिकल्याचे सोळे हो! ऐकलंस? मला नाय वाटे का हे आपले शामाला हौशेसारखं करतीन. या भिकारी

डोळ्या वरशींच सोकरीची परिक्षा झाली. बग हो! नाय ते मग पंचाईत! मला अगोदरशीच वाटत होतं, पण तूं भुललीसन!

सो०—तुमी कनाय लाज आणलीत माला. अगदींचवा माणुसपण नाय तुमाला.

खं०—अग माणुसपण माणुसपण कशाचं घेऊन बसलयस? आपले पोराची आपुण नाय हौस करणार ते मग कोण करील?

सो०—पोराची हौस नाय. तुमचे ह्मातारड्यांचीच हौस अगोदर!

खं०—बरं बरं. तूं जा वेयीणीजवळ. मी जातंय भायेर. (जातां जातां) ऐकलंतका काशीबाय? सुंदररावनां सांगा का मी आपला जुना म्हातारा हाय· तुमी नवे मताचे, तंवं तुमाला आमच्या जुन्या चाली वेड्या वाटत असतील. पण तुमची सोकरी हाय तंवं आमी सांगूं तसं केलंच पायजे. भातक, रुखवत, समजवणी–सगळं केलं पायजे. समजल? त्यांन काय पण न्युन नाय पडलं पायजे-नायते मग या खंडेरावाशीं गांठ हाय हं? (जातो.)

सो०—(काशीबाईस) बगितलनं हा असा सभाव? का माझं त्यांचे पुढं चालतंय? बसा तरी. माझे पाय दुखतान.

का०—आतां बसायला वेळ नाहीं. उशीर झाला. बरं तर. त्यांचीच जर मर्जी आहे तर तेथें आमचं काय चालणार? सांगाल तसं केलं पाहिजे.

सो०—हो, का करता! यांचं सगळे गोष्टीन असंच. चला. तो च्या थंड होतयन!

का०—आतां चहावी कांहीं नको.

सो०—आ. असं कसं! थोडासा पण घेतला पायजेहो. चला वरती.

(जातात).

प्रवेश १४ वा.

(स्थल–सुंदररावाचें घर.)

(बेनाबाई व तिच्या मैत्रिणी–कमळाबाई–पिरोजबाई–शिरीनबाई–हिराबाई–चंपुबाई इ०.)

बे०—तुह्मी बाई सगळ्या आल्यात परंतु अजून कमळु कां आली नाहीं हें

समजत नाहीं ! गडी पाठविला तेव्हां तुझ्या पाठीमागें मी येतें म्हणून सांगून धाडलं. बारा वाजायला झाले तरी कां बरं अजून येत नाहीं ?

पि०—ती तशीच आहे. भारीच बाई तिचा कारभार थंडा.

शि०-तसं नाहींग. आदितवारचा दिवस. सगळे पुरुष घरांमध्यें आले पाहिजेत ! कारभार तर आटोपला पाहिजेना ? तिच्या जवळ रांधप आहे. तो टाकून तर यावयाचं नाहीं !

पि०—तें पण खरंच. मीच पहाना–किती लवकर यावयाचा बेत केला होता पण आटपतां आटपतां अकरा वाजून गेले. आदितवार असला ह्मणजे आमचे घरांतल्या पुरुषांनां काय वाटतं कोणाला ठाऊक ? लवकर आटोपतं घ्यावयाचंच नाहीं.

हि०—खरंच बाई ! आदितवारच्या दिवशीं जेवायला दोन तीन न वाजले तर आदितवार गाजवला नाहीं–असंच त्यांनां वाटतं.

चं०—त्यांत त्यांचा तरी वांक काय ! आठा दिवसांत एक दिवस मिळणार. दररोज धांदल आहेच. एक दिवस तर निसुराईनें घ्यावा. असं, दुसरं काय !

हि०—तूं कांहीं ह्मण, पण मला बाई या गोष्टीची मोठी चीड येते. आमचे येथें तर या आदितवारचं मोठं बंड आहे. सगळे वाहेर भटकून भटकून बारा एक वाजल्याशिवाय घरांत यावयाचेच नाहींत. आणि त्यांत आमचे मोठे दिरोजी तर बोलूंच नका. सगळे गांवभर भीक मागायची–आणि घरांतील दुसऱ्या मंडळीला उगीच तिष्ठत ठेवायचं ! त्यापेक्षां जेवण आटपून मग पाहिजे तर भटकावं. सगळा दिवस आहे तुमचा. पण तें नाहीं. एक दोन वाजतां यायचं–मग आंघोळी नी हें न तें–आमचा कारभार आटपतां आटपतां चार वाजतात. बरं, हा कारभार आटपला नाहीं तों झाली सांज ! पुन्हां संध्याकाळच्या तयारीस लागलं पाहिजे. मला बाई ती दररोजची धांदल पतकरते पण तो आदितवार नको नकोसा होतो.

वे०—पण कांग ? हे दोनतीन वाजेपर्यंत जेवीत नाहींत तर काय तोंपर्यंत उपाशींच असतात ?

हि०—त्यांनां कशाला उपाशीं राह्याला पाहिजे ? दोन चार ठिकाणीं काफीचे कप मारले म्हणजे झालं. नाहींतर इराण्याचीं दुकानं तर कोटें गेलीं नाहींतना ?

(काशीबाई येते.)

का०—कांग बेनु-आल्या का सगळ्या सवाशिणी?

बे०—आई, एक कमळुशिवाय बाकी साऱ्या आल्या. तिला बोलवायाला पुन्हां गज्याला पाठवूं का?

का०—नको. येईल ती. ते पण कोठें अजून बाहेरून आले आहेत. बरं तर तुह्मी इकडेच बसा. मला त्या भटाजवळ बसलं पाहिजे-दीड रुपया रोजीचा कबूल करूनही मेला भट असा मिळाला आहे कीं त्याला सगळं सांगेन तेव्हां तो करणार!

(जाते).

शि०—बेनु, जातांनां तुझी आई काय बोलली तें तूं ऐकलंसना भटाविषयीं तें? खरंच. या रांधपी भटांचं कीं नाहीं अलीकडे फार बंड माजलं आहे!

हि०—हो, पण त्याला कारण आपणच!

शि०—तें कसं ग?

हि०—कसं तें सांगूं का? अग आपल्या बायका दिवसेंदिवस होत चालल्या पोस्ती-त्यांनां चुलीजवळ नको काम करायला! चांगले चांगले इष्कीचे पोशाग घालून मिरवायला मिळालं ह्मणजे झालं. ते मोतीरामचेकडले लेसीचे पोलके घालून मिरवायाला कसं मिळणार चुलीजवळ गेलं तर! आपल्या बायकांनीं हें काम सोडून दिलं ही कांहीं सुधारणा झाली असं समजूं नये. बायकांच्या खऱ्या भूषणांपैकीं-स्वयंपाक चांगला करतां येणें हें एक भूषण आहे. अलीकडे लग्नकारणांत निवशी जेवणं होतात त्याचं खरं कारण पहायला गेलं तर हें कीं आपल्या बायकांत आतां चांगल्या स्वयंपाक करणाऱ्या फारच थोड्या आढळतात. हें आपल्या स्त्रीजातीस एक लांछन आहे.

बे०—हिरु ह्मणते हें खरंच आहे. आपल्या बायकांस स्वयंपाक करणें हें हलकें काम आहे असें वाटूं लागलें आहे. पण त्यांत हलकेपणा कांहींच नाहीं. या भटांस आपल्याच जातीनें फार लाडावलें आहे. दहा रुपये खाऊन पिऊन पगार-शिवाय रोज्या करण्याची सूट-अशा सुटी देऊन आपण त्यांनां फारच पेजविलें आहे.

चं०—व खरं पाहिलं असतां त्यांच्यापासून फायदा न होतां उलटें सर्व तऱ्हेनें नुकसानच होतें.

हि०—व ह्मणूनच आमचे एथें आम्हीं पाळीपाळीनें स्वयंपाक करायचं बांधून घेतलं आहे. व भट ह्मणून कध्धीं ठेवायचा नाहीं असा निश्चय करून टाकला

आहे. आह्मी चौघीजणी धडधाकट जावा असून भटाचा उगीच वीस रुपयांचा खर्च कशाला पाहिजे!

बे०—व असा सगळ्यांनीं निश्चय केल्यावर हें एक मोठें बंड मोडून जाईल यांत संशय नाहीं. (इतक्यांत कमळाबाई घाईघाईनें येते.)

क०—(शाल काढून ठेऊन) कां ग बेनू, माझी खोटी झाली का? मला वाटत होतं कीं तुमचं आटपून पण गेलं असेल.

बे०—नाहीं ग! अजून बराच वेळ आहे. पण तुला एवढा ग वेळ कां झाला?

क०—काय करूं! सासुबाईच्या हातांतून सुटेन तेव्हां ना?

पि०—सासुबाईचं उगीच नांव आपलं. ते सोडतील तेव्हां ना? आज आदितवारचे घरीं असतील ना?

क०—हं! हं! ठीकच आहे. तुझ्या स्वतांच्या अनुभवावरून तूं ह्मणतेस!

पि०—हो बाई आमचे इथें मी घटकाभर जवळ नसलें ह्मणजे चैन पडत नाहीं. दोन दिवसांवर माहेरीं राहिलें कीं आला गडी बोलवायाला.

चं०—अं! त्यांत काय मोठें नवल! आमचेकडे पण तसंच. परंतु माहेरीं रहाण्यासंबंधानें मी नाहीं ऐकायची हो! साफ सांगून ठेवलंय कीं तुह्मांला चैन नाहीं पडलं तर खुशाल या तेथें.


हि०—हो न येतील तर काय करतील. सासूचं डबोलं मिळायचं आहेना! तेव्हां मर्जी संभाळली पाहिजेच.

पि०—बरं तें असो. पण कांग कमळु तुझी सासू इतकी का द्वाड आहे?

क०—तें बाई बोलूंच नको. काय तें त्यांचं सोवळं नी ओवळं! त्यांनां बुकं वाचलेलीं नाहीं चालायचीं. त्यांचे समोर परक्या माणसांबरोबर बोलेल कोण?. मेलं माळ्याला बोलवायाचं असलं तें देखील आम्हीं बोलावलेलं खपत नाहीं.

पि०—अग इतकी जर ती कडक आहे तर मग तुझे नणंदेचे ग चाळे कसे आवडतात तिला?

क०—तीच तर गंमत. माझे माहेरीं कधीं त्यांचं येणं झालं तर 'चालले म्हैसी पाठी टोणगे' असं म्हणायचं. न स्वतांचे जांवई दररोज दोन दोन तास येऊन बसतात तें सगळं चालतं. मग त्यांनां चांगलं चांगलं खायाचं करून देतील, चहा काफ्या देतील. बरोबरच आहे. तें पडलं आपलं.



वे० * * सासवा ह्मणजे झाडून द्वाड व सुना तेवढ्या सालस असें मी कधीं मानणार नाहीं. (पृष्ठ ३९).

पि०—खरंच. मी कीं नाहीं केव्हां केव्हां माहेरीं जातें–पण कधीं माहेरीं रहायाला गेलें कीं सुटलं आमचे सासूचं तोंड. यांनां माहेरींच रहायाला पाहिजे. घराची परवाच नाहीं. पण स्वतांच्या मुली महिनेनमहिने राहतात त्याच कांहीं नाहीं.

क०—आमचेकडे तसला कांहीं त्रास नाहीं. परंतु आमच्या सासूबाई भारीच बाई टिकाखोर. कशाला ह्मणजे नांव ठेवलं नाहीं असं नाहीं. या काय पायघोळच नेसतात. कुंकूं काय टिकलीसारखंच लावतात. शेंडा वरतीच काय घेतला. चोळी तोकडीच काय घातली. भांग आडवाच काय केला! अशी सारा दिवस टिका चालायची. पण अती झालं ह्मणजे मग कोण जुमानीत नाहीं. ठेवतों आम्हीं तशाच बोलत. मीं कांहींतरी ऐकतें पण आमच्या मोठ्या जाऊबाई मुद्दाम त्यांनां आवडत नाहीं तसंच करतात.

शि०—अग बेनु तूं संभाळ बरं. तुझे सासूचीं पण गाऱ्हाणीं ऐकण्यांत येतात हं! तुझी मोठी जाऊ आहे कीं नाहीं तिच्याशीं एक घडीभरही तिचं जमत नाहीं ह्मणून ऐकतों.

बे०—असेल. त्याचं आपल्याला काय? सासूचीं गाऱ्हाणीं ऐका किंवा सुनेचीं गाऱ्हाणीं ऐका, मला एवढं समजतं कीं दोन हातांशिवाय टाळी काय वाजत नाहीं. सासवा ह्मणजे झाडून द्वाड व सुना तेवढ्या सालस असें मी कधीं मानणार नाहीं.

शि०—बरं बरं समजेल आतां. हातच्या कांकणाला आरसा नको. मात्र तूंच आम्हांला सासूचीं गाऱ्हाणीं सांगूं नको ह्मणजे झालें!

(इतक्यांत आंतून जेवणाची तयारी झाल्याची वर्दी येते. बेनाबाई व तिच्या मैत्रिणी आंत जातात).

प्रवेश १९ वा.

(स्थल—सुंदररावाचें घर.)

(सुंदररावाचे मुलीचें लग्न होऊन कन्यादानाचा विधि उरकून घरासमोरील मंडपांत बाळंभट व नरहरीभट उपाध्ये बसले आहेत. मंडपांत व घरांत लग्नाचे दिवसाची सगळी गडबड वगैरे चालली आहे.)

बा०—झालं एकदांच लग्न उरकलं. हें लग्न जुळविण्याच्या कामांत फार

बुवा त्रास पडला! असो! नीट पार पडलं हाच आनंद! पण नरहरभटजी काय चमत्कार आहे पहा! या लोकांनीं नाचतमाशांत व डामडौलांत सारे शेकडों रुपयांचा फडशा उडविला पण सुवर्णाभिषेकाच्या दक्षणेच्या वेळीं पाहिलीतना मजा! म्हणे पाणी सोडा दक्षणेबद्दल! आतां ही दक्षणा कसची मिळते! ही अशी आमची मेहनत फुकट घालविली ह्मणजे यजमानाचं कल्याण तें कसं होणार!

न०—तुह्मांला कीं नाहीं बाळंभट ही अगदीं वाईट खोड लागून गेली आहे! लग्नासारख्या प्रसंगीं आणखी हे अपशब्द! जाऊं द्या! हें जरी त्यांनीं ठीक केलं नाहीं तरी आपण होऊन असं कशाला बोलावं!

(इतक्यांत सुंदरराव येतात.)

सुं०—काय हो नरहरभटजी, तुमचे यजमान कोठें गेले?

न०—दादाजी घरीं फराळाला गेले आहेत. आतां येतों ह्मणाले.

सुं०—साडे विडे आजच उरकायचे ना?

न०—काय समजत नाहीं बरोबर. दादीबाईचा तसा विचार दिसतो खरा! पण दादाजी काय ह्मणतात तें पहावं.

सुं०—बरं तर मी आंत जातों. दादाजी आले कीं मला बोलवा—

(सुंदरराव जातात.)

न०—कायहो बाळंभट! भूयसी दक्षणेचं कसं काय? आमच्या यजमानांनीं तर सगळाएक रुपया दिला आहे. तेव्हां अर्थातच तुमच्याकडून अर्धा रुपया येणार. मिळून दीड रुपया होणार. आणि ब्राह्मणांची गर्दी तर फार दिसते. आज कोठें गांवांत लग्नं नाहींत फारसीं तेव्हां सारेच येथें लोटले.

बा०—हो असं तर खरंच! अहो पैसा पैसा दिला तरी चटणीसारखा दीड रुपया केव्हांच उडून जाईल! नरहरभटजी, तुह्मीं सर्वांनां दक्षणा वांटण्याच्या भानगडींत पडतां कशाला! तुमच्या आमच्या ओळखीच्या अशा दोघां चौघांच्या हातास दोन दोन पैसे लावून 'दक्षणा झाली-झाली' ह्मणून बाकीच्यांस वाटेस लावूं व राहिलेले पैसे आपण दोघेजण निम्मेनिम वांटून घेऊं ह्मणजे झालं—त्यांत तुमचेंही काम होईल व माझेंही काम होईल.

न०—ठीक! ठीक! युक्ती तर नामी काढलीत! असंच तर! अहो त्यांनां दिली तरी ब्राह्मणांस जाणार व आपण ठेविली तरी ब्राह्मणांसच मिळणार. एकून एकच; कोठें अनाठायीं जात नाहीं! हं, हाच बेत उत्तम! (खंडेराव येतात.)

खं०—(धांदलीनें) काय भटजी तुह्मी इकडे गोष्टी करीत बसलेतका? वा! अहो मदी जाऊन सगळी आटपाआटप करा! वरात किती वाजतां काढाची! अन कांहो त्या भटांनां भायेर जमवून ठेवलेत कशाला? त्यांनां अजून दक्षणा दिली नाय?

बा०—(गडबडीनें) हो–नाहीं–देतों—

खं०—आणा पाहूं इकडे कोठें पैसे हायत ते. नरहरभटजी, तुह्मी आंतमदी घाय करा–मी न बाळंभटजी वांटतों दक्षणा. (नरहरभटजी आंत जातात.)

बा०—(मनांत) हें पहा लचांड! मी समजत होतों कीं दक्षणेचे पैसे जिरले. पण ह्मातारा कसचे जिरूं देतो!

खं०—हं बाळंभट इकडे उभे का रायलेत? चला पुढें व्हा–वांटाला लागा दक्षणा–हं. चला पाय उचला. (बाळंभट जातात.)

(सुंदरराव येतात.)

सुं०—कां दादाजी साडे आजच उरकायचे ना?

खं०—का बावा तुमाला सगळे गोष्टीची घाय! काय नाय, घाय नको कराला. होतील सावकास समजवणीनंतर. पण तुमी नवरानवरीला शिणगाराची वाय करा! नायते सभापूजनाला उगीच खोटी होयल. का रात होते का का! चला मी पण येतय— (जातात.)

(सभापूजनाचा थाट. मंडळी बसली आहे. नाच सुरू आहे.)

खं०—(सुंदररावास एके बाजूस नेऊन रागानें) कायहो, ही कोटचे गांवची रीत?

सुं०—कां? काय झालं?

खं०—(सभेकडे बोट करून) तीं बगा सगळीं पोरं तक्यासी टेंकून बसल्यान! न आमचे सारखे म्हाताऱ्यांनीं कोठें बसाच? हं? इकडे जोड्याजवळ? नायते का नायकिणीचे पायाशी? हं?

(सुंदरराव मुलांस बाजूस करितात. खंडेराव मध्यें जाऊन बसतात व तेथूनच)

खं०—अरे धाकलाबाय-तूं जा त्या नवरानवरीला शिणगारल का नाय त बग-जा. उगीच वेळ होते. रात झाली-बारा वाजाची पास हाय न!

(धाकलाभाई जातो.)

खं०—अरे वामन, हिलालवाल्यांनां हिलाली पेटवाला सांग—कसेरे-सगळं तुमांला सांगाला पायजे! आंगची अक्कल बिलकूल नाय! अन त्या ताशेवाल्यांन-ताशे शेकाला सांगा-चला घाय करा.

(नवरानवरीस घेऊन येतात. व सभापूजन झाल्यावर नवरानवरीस गाडींत ब-सावयास घेऊन जातात.)

[अंक १ ला समाप्त.]

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

(स्थल—खंडेरावाचें घर. शामरावाची खोली.)

(बेनाबाई खोलींत पुस्तक वाचीत बसली आहे.)

बेनाबाई—(कांहींवेळ वाचल्यानंतर) काय मेलं करावं! दररोज दोन दोन तीन तीन वाजेपर्यंत बाहेर भटकायचं होत असतं. घरांत म्हणजे चित्तच नाहीं! हातावर पाणी पडलं कीं चढले कपडे! आज काय साहेबाच्या बंगल्यावर जायचं आहे. उद्यां काय हपिसाच्या कामाला जायचं आहे. याप्रमाणें दररोज कांहीं ना कांहीं सबब आहेच. पण मेला त्यांत एवढासा खरेपणा असेल तर शपथ. जुगाराच्या अड्ड्यांत व त्या मेल्यांच्या–नको त्या मेल्यांचें नांव! आग लागो त्यांच्या नांवांना! त्यांच्यांत रात्री घालायच्या असतात! लग्न नांवाला मात्र करावयाचं. एकदां लग्न झालं म्हणजे मग बायकोचें कांहीं का होईना! मेलं घरांत मरमर काम करावं आणि पडावं! असो, मेला बायकांचा धर्मच आहे काम करण्याचा. पण त्याप्रमाणें धन्याचं सुख तरी? तेंही नाहीं! बरं, धन्याचं सुख नाहीं तर नाहीं; पण घरांतल्या माणसांपासून तरी सुख? सासुबाई व दादाजी हेही तसेच! अहो फळावरून झाडाची परीक्षा! चांगल्या झाडास असलीं घाणेरडीं फळें येतील काय? मेलं मरेपावेतों काम करावं पण एक चांगला शब्द तरी आहे का? पण तेंच कुठेंसं दुपारचं कामबिम आटपून पुस्तक घेऊन बसलं कीं आला तडाका! सध्यांच्या पोरींनां कामं करायाला नको! पुस्तकं वाचायाला पाहिजेत. जरा कोठेंसं आंग टेकलं कीं आल्या उठवायला. मी खरं सांगतें सासुरवास बरा असला तर चांगला, नाहीं तर नसलेला पतकरला! असें जर थोड्या दिवसांच्या अनुभवावरून मला वाटतें, तर भांडखोर व द्वाड सासवांच्या हाताखालीं नांदण्याचें ज्यांच्या दैवीं आलें असेल त्यांच्या मनाची स्थिति काय होत असेल बरं? असो, पण अशांचे नवरे तरी चांगले असतील व त्यामुळें त्यांनां एवढें दुःख नसेल होत; पण माझ्या कपाळीं तें देखील नाहीं. हो, सासू द्वाड

असली तरी धन्याचं पाठबळ असलं ह्मणजे तेवढा त्रास होत नाहीं ! अहा! मला तर धन्याचं पाठबळ ह्मणजे केवढं ? पाठबळ नाहीं तर नाहीं, प्रीतीचे दोन शब्द तरी. छेः ते बोलण्यास फुरसद कोठें आहे ? झाले, आतां तीन वाजायला झाले. आतां येतील आणि तसेच निजतील ! मग काय गोड शब्दांचा सुकाळ ! आणि जर कां स्वारी रंगून आली असली तर मग काय विचारायला पाहिजे! मजान् मजा ! (इतक्यांत बाहेरून शामराव दार ठोकतो.)

शा०—अग ए. अग दार उघड. दार–उ–घड.

बे०—झालं यायचं. मला वाटतं आज स्वारी रंगली आहे! हर! हर! देवा! (दार उघडावयास जाते.)

शा०—(आंत येऊन) कां आज तुला दार उघडायाला उ–उ–उशीर कां लागला?

बे०—उशीर तो कसचा झाला ! तुह्मी एक हांक मारलीत न् मीं दार उघडलें.

शा०—लबाड आहेस तूं ! लुच्ची कोठची ! मला दोन तास बाहेर उभा ठेऊन दुसरी अधिक लाहेरी करतेस ! लाथ मारीन, तो–तों–तोंड फोडीन--तुला शरम नाहीं वाटत ! तूं आंत गरम गरम नरम नरम विछान्यावर लोळावंस आणि मी बाहेर थंडींत कुडकुडावं हं.

बे०—अग बाई. एवढी थंडी ती कोठें आहे तरी? गर्मीनें तर जिवाची लाही लाही होत आहे. बरं पण तें असो, आतां झोंप घ्यायाची ना ?

शा०—काय ? झोंप ! छः इकडे बघ माझ्या मनांत कीं नाहीं आज मोठी मजा करायची आहे. व त्यासाठीं इकडे बघ मी सकाळींच बाटल्या आणून ठेवल्या आहेत. या पहा तुला दाखवितों. (कपाटांतून एक बाटली व दोन ग्लासें काढतो.) ये आपण आज मोठी मजा करूं हं ! समजलीस ना ?

बे०—कां घेतलीत तेवढी पुरी झाली नाहीं वाटतें ? चला, निजा आतां—

शा०—मी...मी...कध्धीं निजणार...ना...नाहीं. तुला दारू पाजीन. म...मग निजेन...बोल बोल तूं बऱ्या बो–बोलानें पिणार का—

बे०—मी साफ सांगतें कीं हें असलं मला कधीं चालणार नाहीं. काय मेला चमत्कार ! आपण पितां तर पितां आणखी मला पिण्यास सांगतां !

शा०—मग त्यांत चमत्कार तो क–क–शाचा ? पुरुषांनींच दारू प्यावी आणि बा–बा–यकांनीं पिऊं नये असें कोणत्या शा–शा–शास्त्रांत सा–सा–सांगितलें आहे ?

बो–बोल. नाहीं तुला प्यालीच पाहिजे. मा–मा–झा निश्चय झाला आहे. तुला ती पाजल्या शिवाय मी रहाणार नाहीं. बेअक्कल कुठची. दारू प्याल्यानें किती नफा होतो हें तुला ठाऊक कोठें आहे ! साहेबलोकांच्या बायका दा–दा–दारू पितात तेव्हां त्यांच्या गालांतोंडावर इतकी ला-ली ला–ली अस ते. आणि हे बघ तुझे गाल. कसे फि–फि–फिक्के पडले आहेत ते ! म्हणून सांगतों. चल घे–घे–घे जराशी. (ग्लास तिला देऊं लागतो ती ग्लास उडवून टाकते.)

शा०—हं–हं–हें का–का–य–के–लेंस तूं? अं–माझी दारू हो–हो–ळलीस...

बे०—(रागानें)हेंच काय पण यापेक्षां ही जास्ती करीन. छाकट कोठले! मेली लाज तर एकीकडेसच गेली आणखी ही अरेरावी! मला नाहीं हें असं चालवयाचं. मी आपली माहेरीं निघून जातें. आतां स्वस्थ निजतां का उठवूं दादाजींनां?

शा०—अं–नको. नको–तसें नको ग करूं. हा ! हा ! (हंसतो.) दादाजींनां सा–सां–गतेस? हा ! हा ! एक वेळ सोड्न श–श–शंभर वेळ सांग न–भितय कोण ! पण थांब. नको–आणखी दोन दिवस थांब. मी तुझे–पा–पा–पायां पडतों–नाहीं–तर जा–जा–सांग–मी काय केलंय? मी काय छा–छा–छा–कटा नाहीं. बस–छाकटा आहें मी. सांग–पण नको–जरा थांब ! असं का–का–काय करतेस ग?

बे०—बरं बरं तोंड संभाळा. निजा आतां—

शा०—हं निजूं तर ? तूं ना–नाहीं निजत? बरं नको निजूं तूं. मी आपला निजतों. पण नाहीं, तूं पण निज.

बे०—कां आतां मुकाट्यानें निजतां कीं हांक मारूं दादाजींनां?

शा०—हं नको–नको–मी आपला निजतों. (बिछान्यावर पडतो.) आहा हा ! दारूकी क्या मजा है! मैं तो अस्मानमें जाता हुं. (निजतो.)

बे०—(उसासा टाकून.) आहे कीं नाहीं मजा ! कुंवारपण मात्र गेलं पण संसारसुख केवढं पदरीं पडलं हें ! असो, ईश्वराची मर्जी. चला, आतां आपणही येथें हाथरीवर अमळ पडावें. सकाळीं पुन्हा पांच वाजतां उठायाचं आहेच ! नाहींतर सासुबाई म्हणतील, झाल्या उठवळ, लवकर उठवत दिखील नाहीं. त्यांनां हे आंतले प्रकार कोठून माहित असणार !

(पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

(स्थल—खंडेरावाचें घर–धाकलाभाईची खोली.)

(धाकलाभाई खोलींत वाचीत बसला आहे.)

धा०—(पुस्तक बंद करून) पुरे ! आज पुष्कळ झालें. उद्यां हॉलिडे[1] आहे. कांहीं हरकत नाहीं. (पुस्तक एका बाजूस ठेऊन) पण या गोष्टीचा काय बरें विचार करावा ? दादाजींनीं तर अगदींच पाठ पुरविली आहे. दादीचाही तसाच तगादा लागला आहे. काय करावं हें समजत नाहीं. या लोकांनां अगदीं अक्कल नाहीं. त्यांनां वाटतं कीं लग्न झालं ह्मणजे जन्माचं सार्थक झालं. लग्न ह्मणजे त्यांनां बाहुलाबाहुलीचा खेळ वाटतो. बरं तें असो. त्यांच्या आयडियाज्[2]-प्रमाणें त्यांनां तसें वाटो. परंतु व्हाट्[3] इु दे मीन् बाय् फोरसिंग ए वाइफ् अपऑन् मी ? आतां मी कांहीं लहान नाहीं. मला बरं वाईट सगळं समजतं. व्हाय्[4] डोंट् दे लीव्ह मी टु च्यूझ् माय् ओन् वाइफ्. हं ? खरोखर आपल्या लोकांत ही एक अगदीं वाईट चाल पडली आहे. आपल्या जन्माची जी पार्टनर[5] व्हावयाची ती आपण न पसंत करतां चमत्कारिक विचार ज्यांचे डोक्यांत भरून गेले आहेत असे ओल्ड्[6] पिपल् आपल्याकरितां पसंत करणार व जिचें आह्मीं कधीं तोंडही पाहिलें नसेल तिची व आमची जन्माची गांठ बांधून टाकणार ! मग ती आपणांस लाइक्[7] होवो किंवा न होवो ! आपणांस ॲक्सेप्ट्[8] केलीच पाहिजे. नो ![9] नो ! मला ही गोष्ट कधींच कबूल व्हावयाची नाहीं. दोझ्[10] ओल्ड् टाईम्स् आर् गॉन्. आम्ही जें एवढें एज्युकेशन्[11] घेतलें त्याचा खरा उपयोग करण्याची वेळ हीच आहे. नाहींतर मग त्या एज्युकेशन्चा काय उपयोग ! (समोर पाहून) ही पहा दादी येथेंच येत आहे. त्याचबद्दल विचारायला येत असेल. हं येऊं द्या.

(सोनाबाई येते.)

---

१ सुटीचा दिवस. २ विचाराप्रमाणें. ३ जुलुमानें मला बायको करून देतात ह्मणजे काय ? ४ मला माझी बायको स्वतां पसंत कां करूं देत नाहींत ? ५ भागिदारीण. ६ जुने लोक. ७ आवडो. ८ कबूल. ९ नाहीं ! नाहीं ! १० ते जुने वेळ गेले. ११ शिक्षण.

सो०—धाकलाभाय मग तें यादवन ठेवाचं न ? ते उपाध्ये विचाराला आल्यान त्यानां काय सांगाच ?

धा०—दादी, हें पहा मी आतां त्याच गोष्टीचा विचार करीत होतों.

सो०—मग झाला का तुझा विचार यादवन ठेवाचा ?

धा०—पण हें पहा दादी तुम्हांला या गोष्टीची इतकी ती घाई कशाची झाली आहे ? मी कांहीं म्हातारा नाहीं झालों–यंदा नाहीं पुढचे वर्षी–लग्न करणें तर आहेच.

सो०—तसं नायरे. त्यांचा जीव हाय तंवं तुझं एकदाच लगीन झालं ह्मणजे मग आमचा जीव निसूर झाला. त्यांचा का नेम हाय ?

धा०—काय ह्मणतेस दादी ! तूं देखील दादाजीसारखीच झालीस ? मला वाटत होतं तुला जास्त समज असेल म्हणून. पण तुह्मीं दोघींही सारखींच.

सो०—अरे आमी तुझे वाईटाची का गोष्ट सांगतों ? (रागानें) आमांला तुझ बरं नायका समजे ?

धा०—दादी तूं अशी उगीच कां बरं माझ्यावर रागावतेस? हें पाहा, तुमच्या मनांत माझं बरं व्हावं हेंच आहे. व तुझी ही सर्व खटपट त्याचसाठीं चालली आहे याविषयीं माझे मनांत तिळमात्रही संशय नाहीं. परंतु तूंच पहा. जी गोष्ट तुम्हीं माझ्या सुखाकरितां ह्मणून करणार त्या गोष्टीनें मला खरोखरीच सुख न होतां जर दुःख होत असेल तर अशी गोष्ट करण्यांत तुम्हांला फायदा तो कोणता सांग बरं ?

सो०—अरे पण यापासून तुला दुख तें कस होणार ?

धा०—हं, अशी शहाण्यासारखी मला विचार. मी त्याचा तुला जबाब देतों. (मनांत) आतां इच्याशीं जरा वकिली लढविली पाहिजे. (उघड) बघ, लग्नाचा उद्देश कोणता ?

सो०—मला बा नाय समजे उद्देश विद्देश काते. तू आपला साध बोल. मी कोठे शिकाला गेलतुं तुजेसारखी.

धा०—(हंसत) हं ! हं ! तसं होऊं दे–अगदीं साधं बोलतों. लग्न करायचं कशाला ?

सो०—संसारासाठीं ! दुसरं कशाला ? ह्मातारपणीं बायको पोरं हातापायाला पायजेत न ?

धा०—ठीक. असं खरंना? सध्यां तर माझे हातपाय मोडले नाहींत ना? त्यांत तुम्ही जोंपर्यंत माझ्या माथ्यावर आहांत तोंपर्यंत या गोष्टीची मला काळजी कशाला पाहिजे? पुढचं पुढें-पाहतच आहों.

सो०—अरे पण आमी तुझे जनमाला पुरणार का?

धा०—जन्माला जरी नाहीं तरी पांच दहा वर्षें तर हरकत नाहीं. आणि हें पहा दादी, लोकांचे मुलगे कोणी ब्यारिस्टर होतात, कोणी एम्. ए. होतात, तसं काहीं मी व्हायला नको का? झालं, पुढल्या वर्षी बी. ए. झालों म्हणजे झालं? एकादा स्वतंत्र धंदा नको का करायला? एवढी विद्या शिकून वीस पंचवीस रुपड्यांची एकाद्या शाळेच्या मास्तरची किंवा दुसरी हलकी चाकरी करायची काय? आणखी मी जर ब्यारिस्टर झालों किंवा एम्. डी. झालों किंवा मला एखादा मोठा हुद्दा मिळाला तर त्याचें भूषण मला एकट्यालाच का? तुला नाहीं का? अग तुमच्या बायकांत तुझ्याकडे बोट करून कोणी असं म्हणणार नाहीं का–ही पहा ती अमक्याची आई? मग तो मान कोणाला? बोल–बोल पाहूं?

सो०—हो, मान नाय कसा? माला त्या दोघांनीं खालीं बगाला लावलय–पण तुजेमुळें हाय नाक वरती थोडसं!

धा०—(मनांत.) [1]धाट्स् राइट्. धाट्स् हर् उइक् पाइंट्. (उघड) तर मग हें माझें लग्न करून त्यांत अडचण कां आणतां? मी लग्न नाहीं करायचं का म्हणतों? करायचं. पण माझं एवढंच म्हणणं आहे कीं माझा अभ्यास पुरा होऊं द्या. मग लग्नाची गोष्ट. लग्न एकदाचं झालं म्हणजे मग–हें–सगळं अर्धवटच राहणार. तशांतून तुमची म्हणजे लग्नाची हौस पुरली नाहीं असें नाहीं. दादाचं झालं–शामाचं एक नाहीं तर दोन लग्नें झालीं–शांतेचं झालं–थोडीं कां लग्नं झालीं? पहा, दादी मी सांगतों त्याचा नीट विचार कर. तूं शहाणी आहेस. आज तुझ्यासारखी आई मिळणं कठीण! तूं घाल दादाजींची समजूत कशी तरी—

सो०—ते नाय बा माला कबूल. ते ते अगोदरच बोलतांन का मी तुला फुस देतय. त्यांना तूच का ते सांग. मी इकडे पण नाय बोलाची न तिकडे पण नाय बोलाची!

---

१. वाः नामी! हेंच तिचें मर्म स्थल! अथवा व्यंग. याचा लाभ हिला घेऊन आपलीसी करतां येईल.

धा०—(मनांत) एवढंच आपल्याला पुरे आहे. (उघड) बरं तर. तूं माझ्या विचाराला मिळती असलीस तरी पुष्कळ झालं.

सो०—हो, पण ते कोठें ऐकाचे हान. ते तुला बांधून तुझं लगीन लावून देतील. एकदां का त्यांचे मनांन भरलं मगशी ते का केल्याशिवाय रावाचे हान?

धा०—हं. हं. त्यांची करूं कशी तरी समजूत. बरं तर आतां जा. मला वाचायचं आहे. (सो० जाते.)

धा०—चला आपणही जावं.

(धा० जातो.)

प्रवेश ३ रा.

(स्थल—सुंदररावाचें घर.)

[सुंदरराव व काशीबाई.]

का०—ऐकलं का?

सुं०—काय ह्मणत्येस?

का० —काल बेनू आली होती–ती सांगते नवऱ्याचं कर्ज फेडा ह्मणून.

सुं०—(आश्चर्यानें) काय? मी तिच्या नवऱ्याचं कर्ज फेडूं? अरेच्चा, माझें मला कर्ज फेडावयाची शक्ति नाहीं तर हें आणखी कोठून फेडूं?

का०—पण चौकशी तर करून पहा. थोडंसं असलं तर करा कांहीं खटपट. न करून तरी कसं चालतं! तिला जेवण देखील गोड कसें तें लागत नाहीं. रात्रंदिवस चिंतेंत असते. तुह्मांला दिसत नाहीं, अलीकडे ती किती सुकली आहे ती?

सुं०—मला सगळें कांहीं दिसतें. पण मी तरी काय करूं? माझा संसार संभाळूं कीं यांची काळजी करीत बसूं! खरोखर, एवढी जिवाची यातायात करून व स्वताची खराबी करून तिचं लग्न करून दिलं पण तिला बिचारीला घटकाभर कसें तें सुख नाहीं. पण कायग तिच्या हातांत कोठें बांगड्या दिसत नाहींत त्या?

का०—बांगड्या का? तिनें दिल्यात माझे जवळ काढून. आंगावर असल्या तर येतील एकादे वेळीं डोळयांत.

सुं०—डोळ्यांत यावयाला काय झालें ! वालभर करायची तर आशा नाहीं पण असेल नसेल तें वाटेस लावायाचें. अग पण याला कर्ज झालं तरी कशाचें ? काय मुलांबाळांचीं लग्न कारणं केलीं कीं काय केलें—

का०—पण त्याचा इलाज नको का करायाला ? मेलं पोरीकडे तरी पाहून कांहीं केलं पाहिजे नको का ? आणि लोक तरी नाहीं का आपल्याला हंसणार !

सुं०—काय ! लोक आपल्याला हंसतील ! ते कां बरं ? कां त्यांचे आईबाप नाहींत ? फेडतील पाहिजे तर. बरं, तशांत आपण कोठें श्रीमंत लागून गेलों आहोंत! आपलंच आपल्याला संभाळणं कठीण. माझं तर रात्रंदिवस देवापाशीं हेंच मागणें आहे कीं अन्नमध्यें दिवस जाऊं दे ह्मणजे झालं. त्या मारवाड्याचे तीन हप्ते चढले–तो दररोज माझा जीव खातो–मला अन्न कसें तें गोड लागत नाहीं. रात्रंदिवस काळजी. एका मुलीसाठीं एवढी विवंचना ! आणि तेवढीही सोसून जांवईबुवा मिळाले ते असे बत्तीसलक्षणी ! आपलं नशीबच खोटं.

का०—पण त्या पोरीचा काय त्यांत वांक ? तिच्या सुखाकडे आपण न पाहिलें तर दुसरें कोण पहाणार ?

सुं०—(मनांत) हिनें तर माझा जीव खाल्ला. आज महिना झाला हीच टकटक (उघड)–अग पण तुझं ह्मणणं तरी काय ? सांग तरी एकदाचं स्पष्टपणें.

का०—माझं कपाळ ! ह्मणणं कशाचं. एकदां त्यांना बोलावून सर्व कांहीं विचारायचं तर होतं. ती मेली पोरी सदा रडते माझ्या नांवानें.

सुं०—न रडेल तर काय करील ! बिचाऱ्या गाईला कसाबाच्या हातीं नेऊन दिली तर तिनें तरी काय करावें ? बरं, पण काग, तिची सासू तरी कशी आहे ? ती तरी तिला नीट वागवते ना ?

का०—अग बाई! ती त्या काळूबाईची मुलगी ! तुमच्या ध्यानांत नाहीं वाटतं ? तिच्या आईनें तर आपल्या सुनेला नको नकोसं करून शेवटीं नवऱ्यासुद्धां घरांतून काढून लावलं. तिची ही मुलगी! कशी अगदीं जिवंत आग ! मग काय विचारायला पाहिजे !

सुं०—वा ! मी समजत होतों कीं जरी तिला नवऱ्याचें सुख नाहीं तरी सासूसासऱ्यांचें तरी सुख असेल–पण तेंही नाहीं. (उसासा टाकून) हर ! हर ! बेने, तुला केवळ दुःखसागरांत लोटून दिलें ! (काशीबाईस) बरं तर, पाठीव त्यांनां बोलवायाला. पाहूं तर खरं काय ह्मणतात तें.

का०—त्यांनां मी सकाळींच बोलवायाला पाठविलं होतं. रात्रीं येईन ह्मणून जबाब आला होता. अजून कां आले नाहींत कोण जाणे !

सुं०—अग त्यांनां कोठचा वेळ मिळणार! असेल कांहीं टिफीण बिफीण.

का०—ते पहा! मला वाटतं तेच आले. (शामराव येतो.)

सुं०—या जांवयजी या. (खुर्ची पुढें करून) बसा. कसं काय ठीक आहेना?

(काशीबाई आंत जाते.)

शा०—हो बरं आहे.

सुं०—मी तुह्मांला बोलवायाला पाठविलें होतें तें अशासाठीं कीं—ती ह्मणत होती अलीकडे जरा तुमचा हात अडचणींत आला आहे—तसें जर असेल तर—

शा०—छः छः तुम्हांला कोणीं सांगितलं? अजिबात खोटं—सगळं खोटं.

सुं०—खोटें असेल तर सोन्याहून पिवळें! पण माझें ह्मणणें एवढेंच आहे. मनुष्य आहे, होतो एखादे वेळीं अविचार. कधीं कधीं शहाण्या माणसाच्या हातून देखील तसें घडून येतें. परंतु जोंपर्यंत आटोक्यांत आहे तोंपर्यंत कांहीं उपाय करून पहावा. मग एकदां कां अनिवार झालें ह्मणजे आवरणें कठीण!

शा०—तुह्मी काय ह्मणतां तें मला बिलकूल समजत नाहीं. शहाण्या माणसाच्या हातून घडून येतं काय? व आटोक्यांतलें काय? व अनिवार काय? व मग आवरणं कठीण तें काय? आहे तरी काय?

सुं०—हें पहा, निजलेल्यास जागें करतां येतं. पण जाग्या मनुष्यास तें जागें कसें करायचं! तुह्मी वेड पांघरूं लागलेत तर मग माझा निरुपाय आहे. हें पहा, तुम्ही शरमेनें खरी गोष्ट सांगण्यास कांकूं करीत असाल. पण मी तुह्मांला सांगतों—काय असेल तें सगळं सांगा—इलाज करण्यासारखं असेल तर पाहूं.

(काशीबाई आंतून चहा घेऊन येते व खुर्चीजवळ प्याला ठेऊन आंत जाते.)

शा०—ह्मणण्यासारखं कांहीं नाहीं. अगोदरचं कांहीं देणें आहे. पण त्याचं काय! फिटेल हं हं ह्मणतां.

सुं०—पण मीं ऐकलं त्या दिवशीं केसा निघाला होता ह्मणून.

शा०—(गोंधळून) अं—अं—(रागानें) मग त्यांत काय झालं? एकाचा हप्ता द्यावयाचा राहिला होता. त्यानें केसा काढला. फेंकून दिले त्याचे ताबडतोब रुपये—हात्याच्या!

का०—(आंतून) चहा थंड होत आहे हं. जांवयजींनां घ्यावयाला सांगायचं होतं.

सुं०—अरे हो. गोष्टीच्या नादांत विसरून गेलों (प्याला शामरावास देऊन) घ्या. टाका पिऊन. पहा सासूबाईला तुमची केवढी काळजी आहे ती ! (मनांत) ह्मणतात ना गांवचा लांड्या तो सासूचा देशपांड्या !

(शामराव चहा पितो.)

शा०—(उठून) बरं तर मी येतों आतां.

सुं०—बसा हो. जाल. आतांशा तुम्ही येतां कोठें. पण कायहो कांहीं मारवाड्याचं देणं विणं आहे का ?

शा०—ओ[1] नो ! अगदीं नाहीं !

सुं०—तर फार चांगलं. पण हें पहा या मारवाडी लोकांशीं बिलकूल व्यवहार ठेवूं नका बरं. एकदां कां त्यांच्या हातांत कोणी सांपडला मग त्याच्या शरीरांतील रक्ताचा शेवटचा बिंदु राहीपर्यंत ते त्याला सोडीत नाहींत.

शा०—(हंसून) यस् ! खरंच. (मनांत) हें काय नवीनसें मला कळलें नाहीं !

सुं०—बरं पण तुह्मांला सगळं मिळून देणं किती आहे ?

शा०—अंः आहे. कांहीं विशेष नाहीं. (रागावून) आणि याला देणं का ह्मणावयाचं ! अहो तसं ह्मणाल तर कर्ज नाहीं कोणाला ?

सुं०—अहो पण कर्जाकर्जाम-यें देखील फरक असतो. कोणाला संसारामुळें कर्ज होतें–पगार लहान कुटुंब मोठें–सिकनेस[2] आहे–त्याला कर्ज झालें तर त्यांत त्याचा काय दोष ? दुसरं–मुलांचीं कारणें वगैरे केलीं तर त्यासाठींही कर्ज होतें. पण चैनीसाठीं कर्ज करणाऱ्याची सिंपथी[3] कोणालाही नसावयाची.

शा०—हें बोलणं मला लावून आहे वाटतं ? तसं असेल तर माझं येवढंच ह्मणणं आहे कीं माझें कर्ज मीच फेडणार. दुसरें कोणी फेडायला येत नाहीं. (रागानें) उगीच वर वर सिंपथी दाखविणारे परंतु वेळ आला असतां बिलकूल उपयोगीं न पडणारे असे पुष्कळ सो कॉल्ड्[4] वेल् उइशर्स असतात !

सुं०—हो तसेही असतील ! पण कांहो ते बेनूचे तोडे घेतलेत ह्मणून ऐकलें ?

शा०—(रागानें) हें तुह्मांला कोणीं सांगितलं ? आणि घेतले ह्मणून काय झालं ? तिच्या दागिन्यांवर माझा हक्क नाहीं का ?

---

१ नाहीं. २ दुखणें. ३ कळकळ. ४ शुभेच्छु म्हणविणारे.

सुं०—नाहीं कोण ह्मणतो—पण हें पहा. हल्लींच्या काळांत नवीन सोनें घेणें ह्मणजे मुष्किलीची गोष्ट-ह्मणून जवळ असलेलें थोडेंबहुत संभाळून असलं ह्मणजे झालं. अहो आपण यांनां दुसरं काय सुख देणार ! त्यांची दागदागिन्यांत मनस्वी हौस. तेव्हां होईल तोंपर्यंत त्या बाबतींत त्यांचें मन न दुखविणें हें उत्तम. पण अलीकडे मी पुष्कळ लोक असे पहातों कीं आपण मागें पुढें न पाहतां हवी तशी चैन मारतात व मग कर्ज वगैरे फेडण्यासाठीं घरांतील दागदागिने फुंकून टाकून बायकांस तळमळत ठेवतात ?

शा०—येस[1]. असतील तसे ते करीत असतील त्याप्रमाणें. व्हाट् ह्याव् आय् टु डु उइथ् द्याट्[2] !

सुं०—पण कांहो ते तोडे विकलेत कीं गहाण ठेवलेत ?

शा०—विकूं कां ह्मणून ! थोड्या दिवसांत सोडून आणीन.

सुं०—ही एक आपल्या लोकांची मोठीच चूक आहे. अहो, एकादी वस्तु गहाण ठेवण्यापेक्षां ती विकून टाकलेली पतकरली. गहाण ठेवण्यांत सर्व प्रकारें नुकसानच होतें. गहाण ठेवलेली वस्तु परत तर यावयाची नाहींच पण दुसरा हा तोटा होतो कीं ती जिन्नस तर जिन्नस जाऊन कर्ज माथ्यावर रहातेंच. त्यापेक्षां सुरुवातींतच विकून टाकणें बरें. एकतर पुरा पैसा मिळतो व व्याज वांचतें आणि तशांत परमेश्वरानें मग हात दिला तर नव्यानें नाहीं का जिन्नस करतां येत ? अहो मी अशीं प्रत्यक्ष उदाहरणें पाहिलीं आहेत कीं मिळकत विकून टाकून सर्व कर्ज फेडून—आणखी एकादें लहानसें घरदार करून जो गृहस्थ सुखांत राहिला असता त्यानें ती मिळकत गहाण ठेवल्यामुळें—मिळकती परी मिळकत जाऊन—राहिलेली कर्जाची बाकी फेडण्यांतच त्या बिचाऱ्याचा जन्म गेला !

शा०—(उठून) हं ! हं ! बरं तर मी येतों आतां ! तुह्माला खोटं सांगून उगीच कोणीं घाबरवून टाकिलें. कांहीं भ्यावयाचें कारण नाहीं—माझ्या आटोक्यां-तलें आहे.

सुं०—तसें असलें तर ठीकच. पण हें पहा आमची बेनू आहे गरीब स्वभा-वाची व तिचं मन देखील कोवळं आहे. तेव्हां होईल तोंपर्यंत तिचं मन दुखवूं नका ह्मणजे झालं ! तुह्मी शहाणेच आहां तेव्हां तुम्हांला जास्ती तें काय सांगावें.

---

१ होय. २ मला त्याच्याशीं काय करायचें आहे !

शा०—(मनांत) वा ! सांगितलें तें थोडेंच झालें वाटतं. (उघड) अं, त्यावि-षयीं तुह्मी निर्धास्त रहा. बरं तर मी येतों.

सुं०—येतांच तर मग. (काशीबाईस) अग, तुझे जांवयजी जातात हं—

(काशीबाई येते.)

का०—त्यांनां ह्मणावं बेनूला उद्यां पाठवून द्या. रामाला पाठवीन सकाळीं. चार दिवस राह्याला पाठवा. तिला जरा बरं वाटत नाहीं—घेईल औषध बिवषध चार दिवस.

शा०—(मान डोलवून) बरं—बरं—पाहूं. मी येतों आतां.

सुं०—या— (शामराव जातो.)

का०—कां, काय सांगत होते ?

सुं०—कसचं काय ! सगळी उडवाउडवीची गोष्ट ! बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अग हे निसंग, यांनां कशाची चाड नाहीं. सुरुवातीपासून तो अखेरपर्यंत टाळाटाळी ! हे कधीं खरें बोलणार होते ! त्याला आपण काय करणार ! आपल्या-कडून सांगून पाहिलें—पुढें त्यांची मर्जी. असेल बायकोचं नशीब चांगलं तर चालतील अजून तरी विचारानें—नाहींतर ईश्वराची मर्जी—जी सर्वांची गोष्ट ती त्यांची ! बरं चल जेवण झालं का ?

का०—हो. थाळी पिडं मांडून ठेवलं आहे केव्हांच—चला—(जातात.)

प्रवेश ४ था.

(स्थल—खंडेरावाचें घर.)

(शामरावाची खोली.)

(शामराव व त्याची मित्रमंडळी चैनींत बसली आहे. थोडा वेळ गाणें बजावणें झाल्यानंतर,)

शा०—मग गजानन, आज रात्रीं रंगीचे येथें खचीत येशीलना ? नाहीं तर आयत्या वेळीं फसवशील—

गजा०—वेड तर लागलें नाहींना तुला ? अरे येईन–खचीत येईन.

शा०—आणि तूंरे रामराव ?

रा०—माझी बाबा शूअरटी[1] नाहीं. मी यावयाला एका पायावर तयार आहें. पण तो ओल्ड् फूल्[2] रात्रीं बाहेर जाऊं देईल तेव्हां ना !

शा०—हात्याच्या ! तूं आतां उपज्या चाटतोस वाटतं ! अरे अशा फूल्स्नां[3] तसेच बोलत ठेऊन आपण आपलें काम करावें; दुसरें काय !

रा०—वः बुवा– तूं त्या ओल्ड् फूल्च्या[4] तडाका पाहिलास नाहीं अजून ! अरे ही इझ् अ् रेग्युलर् डेव्हिल्[5] !

शा०—बरं. जशी तुझी मर्जी. बरोबर आहे. तूं त्याच्या मर्जीविरुद्ध अगदीं उघडपणें वागावयास लागलास तर ही इज् शुअर् टु कट् यू ऑफ् उइथ् अ शिलिंग्[6] !

रा०—ओ. आय् डोन्ट् केअर् फॉर् द्याट्[7]. पण कशाला उगीच. आपलं लिमिट्[8]मध्यें असलं ह्मणजे बरं. (इतक्यांत शामराव ह्मणून कोणी हांक मारल्याचें ऐकूं येतें.)

शा०—कोण बरें हांक मारीत आहे ?

गजा०—तूं आवाज नाहीं का ओळखलास ? अरे तो आपला दुढ्ढाचार्य विश्वासराव.

शा०—कोण विश्वासराव ! तर मग ती बाटली विटली लपवून ठेवा !

रा०—व्हाट् नॉन्सेन्स्[9] ! हू इज् ही ?

शा०—अरे तसं नाहींरे ! असा कांहीं प्रकार त्याच्या नजरेस पडला ह्मणजे मग त्याचें जें लेक्चर सुरू होईल तें कांहीं केल्या आटपणार नाहीं.

रा०—अरे चल. अशांची रे भीती कशाला ! येऊं देना आंत !

शा०—कोण विश्वासराव ! या–या. आंत या. दार उघडेंच आहे. (विश्वासराव आंत येतो.)

वि०—कां शामराव ? अरे तूं असतोस तरी कोठें ? तुला भेटण्यास आज

---

१ खात्री. २ म्हातारडा. ३ मूर्खांनां. ४ म्हातारड्याचा. ५ अरे तो जिवंत खवीस आहे. ६ तो तुला अरदीही देणार नाहीं. ७ अंः मी त्याची पर्वा करीत नाहीं. ८ हद्दीमध्यें. ९ भलतंच नाहीं तर. तो कोण असा आहे ?

पंधरा दिवस पहातों आहें परंतु तुझी भेट होत नाहीं. अशा कोणत्या कामांत गुंतला आहेस तरी ?

शा०—अरे काम कशाचें ! तुझी माझी भेट ती कशी होणार ! तुझी लाईन्[१] निराळी ! आमची लाईन् निराळी !

वि०—अरे तुझा मार्ग निराळा, माझा मार्ग निराळा असें कां ह्मणेनास ! ठीकच आहे. (बाटली वगैरे पाहून) पण कायरे शामराव ? सुरादेवतेच्या पूजेचें हें साहित्य वाटतें ! ठीक ठीक ! आपण त्या देवतेचे निस्सीम भक्त बनलां आहांत असें आजपावेतों माझ्या ऐकिवांत होतें. परंतु हा पूजेचा थाट मात्र मीं खुद्द नजरेनें पाहिला नव्हता. अरे रात्रंदिवस हाच ध्यास ! शिव शिव ! शामराव काय तूं आरंभिलेंस हें ! अरे–ही गोष्ट वाईट–अगदींच रे वाईट ! या व्यसनानें कोणा एकाचें तरी कल्याण झालें आहे का ! अरेरे–हा नाद तुला लागला तरी कसा ! अरे ही अवदसा तुला आठवली तरी कशी ! तुझे आईबाप कोण आणि तूं त्यांचा मुलगा–अशा फंदांत पडावास ! शामराव माझें ऐक ! अरे या व्यसनांत एकदां का गर्क झालास कीं मग त्यांतून मोकळा होण्याची आशा नकोच. पहा. विचार कर !


रा० व ग०—वन्स मोअर ! वन्स मोअर[२] ! हं होऊं द्या आपला उपदेश. आपल्या शिष्यावर आपण केलेल्या उपदेशाचा इतका जबर परिणाम झाला आहे कीं दारु पिणें सोडून देण्याविषयीं शपथ घेण्यास तो अगदीं तयार झाला आहे. आपण संकल्प मात्र सांगण्यास तयार व्हा ह्मणजे झालें.

वि०—रामराव, मघां केलेला उपदेश ह्मणजे शामरावासच उद्देशून केला असें समजूं नकोस. हा उपदेश तुम्हां सर्वांसच लागू आहे. ज्याप्रमाणें शामराव माझा स्नेही त्याप्रमाणें तुह्मीही माझे स्नेहीच आहांत. पहा, या व्यसनाच्या पायीं शेकडों निरपराधी मुलें पोरकीं झालीं ! हजारों मौल्यवान् प्राणी नाहींसे झाले ! लाखों लोक रसातळास गेले. अरे या व्यसनाचे भयंकर परिणाम किती ह्मणून तुह्मांला सांगूं ! पहा विचार करा ! अरेरे ! हे भयंकर अनर्थ तुह्मी आपल्या नजरेसमोर दररोज पहात असतांनाही तुमच्या सारखे विचारी तरुण व होतकरू माणसांनीं या व्यसनाधीन व्हावें हें लज्जास्पद नव्हे काय !

ग०—(हंसून) हळू–हळू–शास्त्रीबुवा ! एकदमच सगळें नको. कांहीं उद्यां

---

१ धंद्याचा मार्ग. २ पुन्हां एकदां होऊं द्या.



वि० * * अरे या व्यसनाचे भयंकर परिणाम किती ह्मणून तुह्माला सांगूं ! (पृष्ठ ५६).

करितां शिल्लक ठेवा ! विश्वासराव, बहार केलीत बुवा ! खुब पोयेटिक आय्डिआज् आफ्टर आय्डिआज् ! तुह्मी कीं नाहीं आतां मनिस्कूलचे समोर संध्याकाळीं लेक्चर द्यावयास उभे रहात जा. खुब लोक जमतील तुमचीं लेक्चर्स ऐकावयाला !

वि०—बस्स ! उपड्या घड्यावर पाणी ! अरे तुह्मी माझे बाळपणाचे स्नेही म्हणून ही तुमची स्थिति पाहून माझें काळीज चरचरां चिरतें, व मला बोलल्याशिवाय रहाववत नाहीं—पहा ! मी सांगतों तें ऐका—व द्या हा नाद सोडून, नाहीं तर मग पस्तावाल !

ग०—ऑल राइट्-ऑल राइट्[२]—आम्ही या गोष्टीचा नीट विचार करूं आणि तुम्हांला कळवूं—थँक् यू फॉर् यूअर्[३] काइंड् ॲड्व्हाईस् !

वि०—कर तूं थट्टा ! मला त्याचा राग बिलकूल नाहीं. व तूं जरी मला शिव्या दिल्यास तरी मी माझें कर्तव्यकर्म करण्यास चुकणार नाहीं. पहा अति झालें नाहीं तोंपर्यंत आवरा. पुढें मग अनावर झालें कीं बोंबलत बसावं लागणार. ठीक आहे शामराव. येतों मी-पण मीं सांगितल्याची आठवण ठेव ह्मणजे झालें.

ग०—अरे पण जातां—जातां—एक ग्लास तर—(ग्लासांत दारु ओतण्यास लागतो इतक्यांत आठवण होऊन ग्लास तसेंच ठेवून) ओ आॅय्[४] बेग युअर् पार्डन् !

वि०—(जातां जातां) नफ्फट ! अगदींच निःसंग ! शामराव मी येतों बरँ-येईन पुन्हां कधीं दोन चार दिवसांनीं !

शा०—(मान हालवितो.) (विश्वासराव जातो.)

शा०—गेली एकदाची पीडा ! पण काय असेल तें असो. या विश्वासरावाचा मला एका प्रकारचा असा कांहीं दरारा वाटतो कीं त्याच्या पुढें एक शब्द देखील मला बोलतां येत नाहीं ! मग काय त्याच्यांत मोहनी असेल ती असो ! पण कायरे रामराव, त्यानें दारूच्या ब्याड इफेक्टस्चें[५] असे कांहीं हुबेहूब पिक्चर काढलं कीं दारु पिणें हें अति निंद्य आहे असें मला वाटूं लागलें आहे.

रा०—ओ ! व्हॉट[६] ए सॉफ्ट् हेडेड् फेलो यू आर्. अरे त्याला दारूची मजा

१ कवित्वाच्या विचारांवर विचार. २ बरं बरं. ३ या तुमच्या सदुपदेशाबद्दल आम्ही तुमचे आभार मानतों. ४ नाहीं, माफ करा. ५ वाईट परिणामाचें. ६ काय तुझी ही अक्कल.

काय माहित ! कोठें एकाद्या इंग्रजी बुकामध्यें वाचलें असलें ते रिपीट्[1] केलं दुसरं काय ? अरे पुराणांतलीं वांगीं पुराणांत ! यानांच एकदां चट लागू दे कीं मग बघ मजा !

शा०—खरंच दारूचा डोझ् घेतला ह्मणजे जी एका प्रकारची प्लेझर् वाटते ती दारू न पिणारांस काय माहीत !

ग०—आतां कसँ बोललास. व हें मनापासून बोललास असें प्रूव्ह्[2] करण्याकरितां भर हें ग्लास अॅन्ड् क्वॉफ् इट्[3] ऑफ्.

रा०—कॅम् ऑन्[4].

शा०—ऑल्[5] राइट्–ऑल् राइट्–कम् ऑन् ! ब्रेव्हो ! ब्रेव्हो ! (दारू पीत असतां पडदा पडतो.)

प्रवेश ९ वा.

(स्थल—पालवरस्ता.)

(**खंडेराव** चालले आहेत—समोरून **विश्वासराव** येतो.)

खं०—कोण विश्वासराव ? अरे तूं आतसा असतेस तरी कोठें ? फारसा दिसेस नाय तो? अरे आमचेकडे दररोजचे दररोज आल्याबगर तू रावाचा नाय पण अथं ते महिना न महिना तुजी भेट नाय ! हे हाय तरी का ?

वि०—(हंसत) कांहीं विशेष नाहीं दादाजी ! अलीकडे कामकाजामुळें फुरसत कसी ती बिलकूल मिळत नाहीं.

खं—वारे वा ! तु माला ह्यातार्‍याला फसवाला पातेस का ? पण मी फसाच्या नाय वो ! अरे अगदीं परिक्षेचे दिवसान पण तुजा फेरा चुकत नवता. अथं ते परिक्षा नाय–काय नाय; माला वाटते तुजा न शामाचा तंटा बिंटा कायतरी झालय ! का कास्[6] बिस झालय का ? हं ?

वि०—नाही हो दादाजी ! तंटा कशाचा ? पूर्वीं शामराव चाहून बोलावीत

---

१ बोलून दाखविलें. २ सिद्ध करण्याकरितां. ३ टाक पिऊन सारें. ४ अलबत दे चल. ५ ठीक ठीक शाबास. ६ वांकडें.

असे–आतां त्याला नवीन नवीन सोबती मिळाल्यात तेव्हां उगीच त्यांच्यांत आपण कशाला पडावं–एवढ्याचसाठीं–दुसरं काय? पुन्हां आतांशा जेव्हां यावं तेव्हां शामराव घरांत ह्मणून मिळत नाहीं. नेहमीं कोठेंना कोठें तरी बाहेर गेलेला असतोच!

खं०—खरच–आतशी त्याचकनाय घरान चित ह्मणजे अगदीच नाय! हातावर पाणी पडाची खोटी–का चढली टोपी–चालला भायेर–कोठे जाते न करते ते अगदी समजे नाय. पण विश्वासराव खरच सांग. तुजा यावद्दल तरक का धावते?

वि०—माझा तर्क का? मला असं वाटतं कीं, शामरावास हल्लीं वाईट कोणता तरी नाद लागला आहे. व त्याची सध्याची कंपनीही चांगली दिसत नाहीं. मग खरं काय असेल तें असो.

खं०—तूं खर बोलतेस विश्वासराव. माला पण तसच वाटतय. कारण का म्हणशील तर बग आथशी टिफिणीवर टिफिणी चालल्यान. एक शनवार पण खाली जात नाय.

वि०—पण दादाजी, शामरावला हा खर्च झेंपतो तरी कसा? वीस पंचवीस रुपयांत तो तुह्मांला काय देतो—स्वतांचा खर्च तो काय करतो व ही अशी मजा तो कशी मारतो?

खं०—माला पण तेच नवल वाटते! (हळूच) विश्वासराव, तूं शामाचा जिवाचा सोबती हायस व मी पण तुला तुजे लानपणापासून ओळखतय ह्मणूनच तुला माजे पोटानची गोष्ट सांगतय का आज पांच स महिने झाले त्या पोराजुन घरान एक अरदी पण दिली नाय. अरे अवढच नाय पण बायकोचे एक दोन दागिने पण फुकून टाकले अस कालच ती सांगतती. का सांगू विश्वासराव तुला, माजा जीव जळते–अगदीं जळते!

वि०—काय ह्मणतां दादाजी! इतक्या थरास गोष्ट येऊन पोहोंचली ह्मणतां?

खं०—हो! अस ते खरच.

वि०—मला वाटत नव्हतें कीं ही गोष्ट इतक्या थरास येऊन पोहोंचली असेल. शामराव वाईट संगतीस लागून त्यास एकादा वाईट नाद लागला असावा असें मला वाटत होतें, परतुं हें तुह्मीं सांगितलेलं ऐकून मला मोठें आश्चर्य वाटतें. पण दादाजी, शामरावच्या चेहऱ्यांत तुम्हांला कांहीं फरक दृष्टीस पडतो का?

खं०—हो नाय कसा. आतशी कसा अगदीं सुजट फुगट दिसते ! मला वाटते तो पीत असेल. हं ?

वि०—मला असा संशय आज बरेच दिवस येत होता. व त्या दिवशीं कांहीं प्रकार माझ्या दृष्टीस पडला त्यावरून तर खातरी झाली. पीत असेल याविषयीं शंका नाहींच. पण पुष्कळ पितो असें मला वाटतें.

खं—का ! ए तूं का बोलतेस ? पुष्कळ पिते ?

वि०—असं तर खरंच. व तें तुमच्याकडून लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. व ही गोष्ट तुमच्या कानावर घालण्याचा माझा विचार होताच. इतक्यांत तुह्मींच होऊन गोष्ट काढलीत. कांहीं दिवसांवर शामरावाला भेटावयास घरीं गेलों होतों. तो आंत एक दोन सोबत्यांस घेऊन बसला होता. मी तसाच आंत गेलों तों तेथें ह्या स्वाऱ्या हातांत ग्लासें घेऊन पिण्याच्या बेतांत होत्या असं दृष्टीस पडलं. मीं त्यास खूब घेतलं. शामरावानें सर्व निमूटपणें ऐकून घेतलं पण त्याचे सोबती बेशरमपणें चावटपणा करूं लागले तेव्हां मग मी निघून गेलों.

खं०—का ? माझे घरान ? अन हें असं ? अरे पोरांनो तुह्मी भायेर पायजे तसे नाचा पण घरांन हे चाळे ! देवा ! देवा ! हे मी का ऐकतय ! पण कारे विश्वासराव, या गोष्टीला आतं उपाय का करावा ?

वि०—दादाजी अंमळ धीर धरा ! शामराव तुमच्या पोटचा मुलगा तेव्हां त्याची कळकळ तुह्मांस यावी हें साहजिकच आहे, पण माझें व त्याचें बाळपणापासून संघट्टण असल्यामुळें व आह्मी लहानाचे मोठे एकमेकांच्या संगतींत झाल्यामुळें मलाही त्याचेविषयीं बरीच कळकळ आहे. व होईल तोंपर्यंत त्याला ताळ्यावर आणण्याचा मी प्रयत्न करीनच !

खं०—शाबास ! विश्वासराव शाबास ! सोबती असावा ते तुजे सारखा ! तुजे या बोलण्यानं माला कवडा तरी धीर आला सांगूं ! अन हे काम होयल ते तुजेच हातून. आजचे काळान आमचे सारखे म्हाताऱ्यांच कोण ऐकते ! आमी झालुं वेडे ! अवडी वरसं काडली तीं गेली चुलीन ! बरं ते, मी आतं जातंय. कर बाबा तुला बर दिसेल तसं-माजे ह्माताऱ्याचे साठीं. देव तुजं कल्याण करील.

वि०—बरं या-भेटेन'तुम्हाला दोन चार दिवसांनीं. (खंडेराव जातो.)

वि०—मला या म्हाताऱ्याची खरोखर दया येते ! काय चमत्कार आहे पहा. पैसा आहे, घरदार आहे सर्व कांहीं ठीक आहे-पण पोरांचा हा त्रास ! तीन मोठ-

मोठाले मुलगे आहेत पण तीनही तीन तऱ्हेचे. थोरले वामनराव ते वामनरावच बायकोच्या ओंजळींत पाणी पिणारे! ऊठ म्हणेल तर उठ! बस म्हणेल तर बस! शामराव तर हे असे! धाकलाबाय अजून लहान आहे पण त्याच्या आयडियाज्[1] फार हाय्[2] व जरा रिफॉर्मच्या[3] साईड्चा आहे. अशा मुलांपासून आईबापांस सुख तें कोठून मिळणार? बिचारा म्हातारा तोंडास खीळ घालून आंतचे आंत जळत आहे. असो. पण आतां शामरावचा काय विचार? मला तर वाटतें कीं दारु व नाचतमाशे याच्या पुढेंही शामरावानें भरारी मारली आहे! असा संशय तर येतो—पाहूं. चवकशी तर करूं? मग एकदांचं खरं काय तें समजलं म्हणजे मग पुढें त्याचा विचार. चला पाय उचलला पाहिजे-वेळ फार झाला. (जातो.)

प्रवेश ६ वा.

[स्थल–खंडेरावाचें घर–शामरावाची खोली.]

(शामराव व बेनाबाई.)

शा०—तेवढी ती वाळी मला दे. मी फार दिवस ठेवणार नाहीं. पांच सहा दिवसांत तुला परत देईन.

बे०—तुह्मांला एकदां सांगितलेंना कीं ती गोष्ट मजकडून व्हावयाची नाहीं ह्मणून? मेला काय हा जुलूम तरी! ही वाळी तुमची आहे का? ती माझ्या आईची. तिनें मला चार दिवस वापरण्यासाठीं दिली आहे. तुमचे दागिने होते ते बहुतेक सर्व घेऊन गेलेत. हे दोन मात्र राहिले आहेत. तेही पाहिजे असल्यास घेऊन जा. आग लावा त्यांनां! पण त्या माझ्या वाळीवर कां तुमचा डोळा?

शा०—अग पण ती तुला परत मिळाली ह्मणजे झालेंना? मग तुला तिची कां इतकी काळजी? मला अगदीं जरूर आहे ह्मणून. नाहीं तर तुजजवळ कधीं मागितली तरी असती का?

बे०—तुह्मांला काय जरूर दररोज आहे! जुगार खेळावा, दारवा प्याव्या, नाचतमाशास जावं आणि घरांतल्या दागिन्यांनां आग लावावी! मेली शरम

१ विचार. २ मोठे. ३ सुधारणेच्या बाजूचा.

ह्मणजे कवडीची नाहीं. तेच तुमचे भाऊ पहा. त्यांनीं आपल्या बायकोला कशी सोन्यानें मढवून ठेविली आहे.

शा०–बरोबरच आहे. गुणा पाडी पूजा! जशी वहिनी दादांच्या अर्ध्या वचनांत असते त्याप्रमाणें तूं राहिलीस तर तुलाही तसें होईल.

बे०—अहाहा! कोणी ह्मणेल जसें कांहीं खरंच! ठीक ठीक, आपल्या मनाप्रमाणें बायकोनें नवऱ्याच्या अर्ध्या वचनांत राहणें ह्मणजे त्यानें जें मागावें तें तिनें त्यास द्यावें. दागिने द्यावेत. मग ते कोणाचेही असोत. स्वतांचे असोत, लोकांचे असोत, त्याला हरकत नाहीं. असेंचना?

शा०—यांत काय संशय! नवऱ्याला काडीइतकें दुःख देऊं नये, त्याची मर्जी सदा राखावी, हाच चांगल्या स्त्रियेचा धर्म.

बे०—बरँ बरँ. हा बायकोचा धर्म सांगितला. आतां नवऱ्याचा धर्म कोणता? त्यानें बायकोच्या दागिन्यांस आग लावावी, तिच्या माहेरचे देखील दागिने असतील ते घेऊन जावें व न दिल्यास बायकोस मारावें, रात्रीच्या रात्री बाहेर काढाव्या, बायकोस घरीं तळमळत ठेवावें, दारवा प्याव्या, जुगार खेळावा, रात्रीं छाकट होऊन घरीं यावें. हाच का नवऱ्याचा धर्म?

शा०—(अंमळ ओशाळून) हा जरी नवऱ्याचा धर्म नाहीं तरी पण—

बे०—पण काय माती–द्या माझ्या प्रश्नाचा जबाब. कां आतां तोंड कां बंद राहिलँ?

शा०—तसं नाहीं ग. नवऱ्यानें पण त्याप्रमाणें बायकोशीं वागलं पाहिजे—

बे०—ही गोष्ट खरीना? मग आहे कां आपलं तसं वर्तन?

शा०—(गोंधळून) नाहीं खरें. पण अजून सुधारण्याचा संभव नाहीं काय?

बे०—मनुष्यानें एकदां मनावर घेतलें तर अशक्य तें काय आहे? पण आपणांसारख्या सर्व व्यसनांत रावलेल्या माणसाची सुधारण्याची आशा व्यर्थ!

शा०—(लाडानें) तूं असं म्हणावेंसना? तर तुला असं वाटतं कीं मी आतां कध्धीं सुधरायाचा नाहीं? असेंचना? पण समज मीं आजपासून आपलें वर्तन सुधरायाचा निश्चय केला तर कसें?

बे०—तर कसें हें काय विचारतां? सोन्याहून पिवळें! (आशेनें) द्या शपथ कीं आजपासून तुम्ही रात्रीं बाहेर भटकणार नाहीं, जुगार खेळण्याचें टाकून द्याल, व दारू पिण्याचें सोडून द्याल. द्या शपथ पाहूं!

शा०—पण अशी शपथ घेऊन मला लाभ कोणता? माझी आजची गरज सारशील?

वे०—जर तुह्मीं मीं सांगितल्याप्रमाणें शपथ घेणार मग तुमची गरज ती आणखी कोणती राहिली? (विचार करून) पण अगोदर सांगा, तुह्मांला वाळी कशाला पाहिजे?

शा०—वाळी का? दुसरी कशाला नको. ती गहाण ठेऊन तिजवर तीनशें रुपये काढायाचे आणि त्यांतून दोनशें एका मारवाड्यास भरायाचे आणि शंभर राहिले ते काल जुगारांत एकाचे हातउसने घेतले आहेत त्याला द्यावयाचे!

वे०—वरं त्या वाळीवर एवढे रुपये काढून मग ती वाळी सोडविणार कशी?

शा०—सोडवावयाची का? तिचें तुला काय? आठ दिवसांत परत आणून दिली ह्मणजे झालं कीं नाहीं? (तिला जवळ घेऊन) बघ. खरंच मी ती तुला लवकर परत आणून देईन! या वेळेस तूं नाहीं ह्मणूं नकोस. मी आजपासून तुझ्या वचनाबाहेर एक पाऊलही टाकणार नाहीं. तूं सांगशील त्याची शपथ!—देदे—तेवढी वाळी दे—

वे०—तुह्मांला काम काढून घ्यावयाचं असलं म्हणजे नेहंमीं असंच बोलतां. पण मग एकदां वेळ निघून गेली ह्मणजे तुमचं येरे माझ्या मागल्या आहेच! हा काय पहिला प्रसंग नाहीं!

शा०—(मनांत) काम फिसकटतं वाटतं. अगदीं कसं जमण्याच्या बेतावर आलं होतं. पण जरा आणखी साखर पसरून तर पहावी! नाहींतर मग नेहमींचा उपाय आहेच. (उघड) अग वेडे, तूं तशी शंका बिलकूल मनांत आणूं नकोस. मी खरंच सांगतों मला या सर्व गोष्टींचा अगदीं वीट येऊन गेला आहे!

वे०—(मनांत) देवा! तुला माझी करुणा तर आली नाहींना? पहावं, नव्याण्णव तेथें पुरे शंभर! हे ह्मणतात तें तरी खरं कशावरून नसेल? व त्यांत मोठंसं नवलही नाहीं. अशा गोष्टी आपण पुष्कळ ऐकतों! (उघड) बरं. समजा मीं तुह्मांला वाळी दिली आणि मग तुह्मीं मला फसविलेंत तर—

शा०—(मनांत) आतां बाणी संभाळली पाहिजे—नाहींतर सगळा व्यूह ढांसळेल—अगदींच भोळी बिचारी! पण तशी आहे ह्मणूनच माझें फावतें.

(उघड)--हर! हर! आतां तसला संशय बिलकुल मनांत आणूं नकोस! तूं माझी अब्रू संभाळणार! आणि मी तुला फसवीन असं तुला वाटतं? छः छः असं स्वप्नींही आणूं नकोस! चल-दे सोडून सारा संशय व आण पाहूं वाळी कोठें आहे ती! नाहीं तर मलाच सांग कोठें आहे ती. मी काढून घेतों-तुला कशाला त्रास-(चाव्या घेऊं पाहातो.)

बे०—नको-नको मीच काढून देतें-तुह्मांला ती सांपडावयाची नाहीं—

शा०—(रागावल्यासारखें करून) इतका देखील माझा तुला विश्वास नाहींना! नको तर मला तुझी वाळी नको! कांहीं नको-जाऊंदे अब्रू गेली तरी हरकत नाहीं-मी चोर-मी लफंग्गा-ह्मणूनच कीं नाहीं तूं तुझ्या चाव्या मला विश्वासीत नाहींस ती—

बे०—(मनांत) अग बाई-किती मी मूर्ख तरी! हें मीं काय केलें-अशी चांगली संधि घालविली! (जवळ जाऊन आर्जवानें) असं काय बरं करायचं! येवढा राग येण्यासारखं मी काय बोललें! ही मी आतां काढून देतें! माझ्या मनांत तसला कांही विचार नव्हता! घालवा तो राग तुमचा! माझी शपथ आहे तुह्मांला.

शा०—(मनांत) आतां जास्ती ताणून धरण्यांत फायदा नाहीं. पुरे झालं हें नाटक! (उघड). बरं, बरं, गेला माझा राग! चल-आण कोठें वाळी आहे ती—

बे०—पण तुह्मी अजून शपथ कोठें घेतली आहे!

शा०—(हंसत)-अरे हो—खरंच. शपथ घेण्याचं विसरलों-बरं तुझे गळ्याची शपथ! झालं आतां—

(बेनाबाई वाळी पेटींतून काढून शामरावास देते.)

शा०—(वाळी घेऊन) अहा! बायको असावी तर अशी! (तिला आलिंगन देतो व कपडे चढवूं लागतो.)

बे०—कां-कपडे कां आतां चढवायचे झाले! एवढ्या रात्रीं बाहेर का जावयाचें?

शा०—हो. जरा जरूरीचें काम आहे तेवढं आटपून येतों-हा आतांच आलों समज!

बे०—राहूंद्या तुमचें जरूरीचें काम. राहील सकाळपर्यंत. माझं एवढं ऐका. आतां बाहेर जाऊं नकाच! आणखी मघां घेतलेली शपथ इतक्यांतच विसरलेत काय?

शा०—शपथ कसा विसरेन वरें? (आपणाशीं) इनें मला तर अगदीं अडविलें. आतां कांहीं तरी युक्ती लढवली पाहिजे. (उघड) हें पहा, मला आतांचे वेळीं जाऊं दे. ही वाळी जी तूं मला दिली आहेस ती आतांच नेऊन गहाण ठेवतों—व ज्यांचे पैसे द्यावयाचे आहेत ते तावडतोब देऊन टाकतों म्हणजे एकाच खेपेस सर्व कामांचा निकाल लागेल. मग पुन्हा त्यांच्यांत जाणें नको व त्या गोष्टीचें नांवही नको !

बे०—वरँ तर जा, व एकदांचा त्या लोकांचा संबंध तोडून टाका कसा तो. पण परत लौकर याल ना ?

शा०—माझें काम झालें कीं त्यावर एक मिनिट जास्ती राहिलों तर शपथ. (जातो.)

बे०—वाळी गेली तरी पतकरली. आईची व बाबांची कशी तरी समजूत करतां येईल. पण हे ताळ्यावर येऊन सर्व व्यसनें एकदांचीं सुटतील तर त्यापासून जो लाभ होईल तो असल्या शंभर वाळ्या मजजवळ असल्यापासून होणार आहे काय ? खरोखरच नाहीं. शपथ तर घेवविली आहे. आतां पहावें काय होतें तें. देवा ! तूं त्यांनां चांगली बुद्धि देऊन त्यांच्याकडून सर्व व्यसनें सोडीव. आई कुलस्वामिणी, त्यांचीं सर्व व्यसनें एकदांचीं सुटून ते ठिकाणावर आले ह्मणजे तुझ्या नांवानें पांच सवासणी जेऊं घालीन ! देवा ! एवढी या अबलेवर कृपा कर ! तुझ्याशिवाय माझा त्राता कोणी रे नाहीं !

(पडदा पडतो.)

प्रवेश ७ वा.

(स्थळ—रस्ता.)

(शामराव.)

शा०—वाळी तर मोठ्या युक्तीनें तिच्या जवळून उपटली ! ती तरी बिचारी भोळी पोर ! म्हणे शपथ घ्या ! माझ्या सारख्यास आतां शपथेची चाड राहिली

आहे काय ? एक सोडून शंभर शपथा घेण्यास मागें पहाणारा हा गृहस्थ नव्हे. मात्र त्यामुळें माझें काम झालें ह्मणजे पुरे ! जुगाराचें व्यसन सोडण्याबद्दल शपथ घेवविली ! जुगार खेळण्यांत काय मजा आहे ती तिला काय माहीत ! एका क्षणांत रावाचा रंक–अरे चुकलों–रंकाचा राव ज्या खेळांत होतो तसला खेळ सोडण्याचा ती मला उपदेश करिते ! पण मी कोठें इतका वेडा आहें कीं तिच्या ह्मणण्याप्रमाणें चालेन ! जुगार खेळणें, दारू पिणें, यांत जी काय मजा आहे ती त्यांचा अनुभव ज्यांस असेल त्यांसच माहीत ! इतरांस काय ? असो, आतां किती वाजले असतील बरें ? (घड्याळ काढून) सव्वादहा ! आतां कोठें बरें जावें ? पहिल्यानें रंगीच्या इथें जावें ! नको ! तिच्या दृष्टीस एकदां कां ही वाळी पडली म्हणजे मग ती परत कसची देते! तर आतां अड्ड्यांत जावें मग तिथें कसा काय रंग होईल त्याप्रमाणें रंगीच्या घरीं जाण्याचा विचार. चला तर तिथेंच जावें.

(शामराव जातो.)

प्रवेश ८ वा.

(स्थल—रस्ता.)

(डिटेक्टीव्ह पोलिसचा एक मनुष्य येतो.)

डि० पो०—हाच तो अड्डा. (पॉकिटबुक काढून) नंबर ७२७ गिरगांव—पानवाल्याच्या दुकानासमोर. हें समोरल्या बाजूस पानवाल्याचें दुकान ! ठीक—आतां कोठें जातात माझ्या हातांतून तें पाहतों ! (विचार करून) पण आतां आंत कसं जायाचं–एकदम आंत जाण्याचा प्रयत्न केला तर ते लोक सावध होऊन इकडे तिकडे पळून जातील. सर्वांस तर पकडलं पाहिजे. वाजले तरी किती पाहूं ? (वॉच काढून पहातो) साडेदहा वाजायला आले. इतक्यांत सर्व मंडळी कांहीं आली नसावी. सर्व मंडळी आल्यावर खऱ्या डावास सुरुवात होईल–(विचार करून) हं. युक्ती तर नामी. येथेंच जवळ हें धोतर आंगावर घेऊन भिकाऱ्याचा वेष घेऊन पडावं. व या लोकांचा खुणेचा शब्द असल्यास तो ऐ-

कून घेऊन आंत जावं. दुसरे शिपाई वगैरे आजूबाजूस ठेवलेले आहेतच. शीळ वाजविली कीं आलेच. मग काय! मुसक्या बांधून घेऊन जाऊं सर्वांस.

(धोतर आंगावर घेऊन पडतो.)

(शामराव येतो. समोरून विश्वासराव येतो त्यास पाहून.)

शा०—कोणरे विश्वासराव तूं रे इकडे कोठें ?

वि०—तुझ्याच भेटीस. (शामरावास एकीकडे नेऊन) हें पहा शामराव, खरंच सांग तूं कोणीकडे जात आहेस ?

शा०—कोठें नाहीं रे. इकडे माझ्या एक फ्रेंडचें घर आहे. त्याजवळ कांहीं अगत्याच्या कामासाठीं जात आहें. पण तूं कां बरें मला भेटावयास आलास ? व मी इकडे जातों हें कोणीं तुला सांगितलें ?

वि०—त्याची तुला कशाला पंचाईत. माझी तुझी भेट झाली इतकेंच पुरे आहे. हें पहा शामराव तूं मजजवळून कितीही लपविलेंस तरी मला सर्व कांहीं माहीत आहे. हा समोरचा तुमचा जुगाराचा अड्डा व तिकडेसच तूं जात आहेस. बोल ! खरं कीं नाहीं ?

शा०—(मनांत) अरेच्चा याला रे हें कोणीं सांगितलें ! आतां लपवून काय उपयोग ! (उघड) विश्वासराव तूं ह्मणतोस तेंच खरें ! मी तिकडेसच जात आहें.

वि०—वा ! शामराव तुला असें बोलण्यास लाज देखील वाटत नाहीं! इतका का तूं निलाजरा झालास ? अरे, होतीं तीं व्यसनें थोडीं झालीं होतीं का ? त्यांत हें कमती होतें वाटतं—

शा०—विश्वासराव तूं आतां या वेळेस जा. मला फार वेळ नाहीं. पुन्हां कधीं भेटशील तेव्हां पाहिजे तितका उपदेश कर. जा आतां.

वि०—अरे पण माझं ऐकशील तर खरं. मी तुला कशासाठीं भेटावयास आलों हें तर ऐकशील.

शा०—(अंमळ रागावून) तुला जा म्हणून सांगितलँ ना ? मला कांहीं ऐकावयाचें नाहीं.

वि०—बाबा रागावूं नको. मी जातों. पण ऐक. मला अशी वातमी मिळाली

आहे कीं, आजरात्रीं अकरा वाजण्याच्या सुमारास तुमच्या अड्ड्यावर पोलिसाची धाड येणार आहे. तर संभाळ ह्मणजे झालें–जा आतां खुशाल जा. मीं माझें कर्तव्यकर्म बजावलें. पुढें खबरदारी ठेवणें तुझें काम आहे.

(विश्वासराव जातो.)

(शामराव अड्ड्याच्या दाराशीं जात आहे इतक्यांत बाजूस एक भिकारी पडलेला पाहून.)

शा०—कोणरे तो ?

भि०—नाहीं बाबा मी एक भिकारी आहें. दादा गरीबाच्या पोटांत आज चार दिवस अन्न नाहीं ! दादा एक पैसा द्याल तर मोठँ पुण लागेल !

शा०—अरे चल. लबाड़ शिनचे ! चल हो बाजूला. सुरवातीलाच ही कोठची खुणूस ! (अड्ड्याच्या दरवाज्याजवळ जाऊन दार ठोकतो.)

(आंतून) कोण आहे ?

शा०—मी शामराव.

(आंतून) खुणेचा शब्द कोणता ?

शा०—चोक. (दरवाजा उघडतो. शामराव आंत जातो.)

(पांच सात मंडळी एका पटासभोंवतीं बसली आहे. शामराव आंत गेल्यावर खेळ सुरू होतो. कांहीं वेळ खेळ झाल्यावर.)

(बाहेरून) अरे दार उघड.

(आंतून) कोण आहे ?

(बाहेरून) मी.

(आंतून) खुणेचा शब्द कोणता ?

(बाहेरून) चोक.

(दरवाजा उघडतात. त्याबरोबर पांच सात पोलीस शिपाई व एक दोन कान्स्टेबल आंत शिरतात. मंडळीची दाणादाण होते. एकदोघांखेरीज बाकीचे सर्व पकडले जातात. शामराव खिडकीवाटे पळून जातो. शिपाईलोक सर्वांचे हात बांधून त्यांच्या हातांत तेथलींच ग्लासें देऊन त्यांस पोलीसचौकीवर घेऊन जातात.)

प्रवेश ९ वा.

[स्थल—दादरावरील एक बंगला].

(सुंदरराव एका कोचावर बसले आहेत. आंतल्या बाजूस पुतळाबाई एका कोचावर निजली आहे, व बाजूस काशीबाई-सोनाबाई-नानीबाई व घारुबाई बसल्या आहेत.)

सुं०—(स्वगत) पुतूस पाण्यावर न्या असें डाक्टरानें सांगितल्यावरून तिला येथें घेऊन तर आलों. आज दोन महिने झाले, तरी तिचें दुखणें कसें तें हटत नाहीं. उलट रोग वाढतच चालला आहे. पुतूची अवस्था मला कठीण दिसते. यांतून निभावली तर पुनर्जन्मच म्हणावयाचा! असो! ईश्वरेच्छा! आज तीन रात्रीं एकसारखें जागरण झाल्यामुळें, माझीही प्रकृति अंमळ बिघडली आहे. छेः या सर्व गोष्टींमुळें मला या संसाराचा अगदीं कंटाळा आला आहे! किती ह्मणून काळजी बाळगावी! घरांत हा घोर! खर्चानें अगदीं जेरीस आणलें! दररोज नवें नवें औषध! शिवाय डाक्टराची फी ती निराळीच! हा अनिवार खर्च मला आतां झेंपत नाहीं. याखेरीज, कर्जाचा तगादा आहेच पाठीमागें. काय करावें हें मला अगदींच सुचेनासें झालें आहे. देवा! मला या सर्व कटकटींतून सोडविशील तर बरें!

(काशीबाई येते).

का०—औषध द्यावयाची वेळ झालीना? साडेसहा वाजले.

सुं०—काय इतक्यांत साडेसहा झाले! औषध का? हो! त्या मोठ्या बाटलींतलें द्यावयाचें. एक जोन दे व पुतूला ह्मणावं अंमळ स्वस्थ नीज. नाहीं-तर कालच्यासारखा खोकला त्रास देईल. बरं, मी डाक्टराकडे जातों व येत असेल तर घेऊन येतों. (सुं० जातात).

(काशीबाई औषध देऊन सोनाबाई, नानीबाई व घारुबाई यांसह बाहेर येते).

का०—बसायचं होतं येथें जरा. जाल थोड्या वेळानं. आतां घरीं जाऊन जेवा विवायचं थोडंच आहे!

सो०—जेवायचं नाय ह्मणून का झालं! रात होतेनं!

का०—एक दिवस चालेल. आहेत सुना घरीं. संभाळून घेतील एकदिवस.

सो०—नाय ते! अन, सुना तरी कोठच्या? वेनू ते दुरशी हाय. न मोटी घरान अशेल का गेलशेल माहेरी. त्यांनां दुसरा धंदा का हाय! हातावर पाणी पडाची खोटी, का चढली शाल माथ्यावरती! चालल्या माहेरीं. माहेरी नशेल गेली ते वसलशेल नवऱ्याचे तोंडाशीं. आताचे सुनांना बाय हात जोडावे!

नानी०—खरंच! आमच्या पण सुना तशाच. एकीला तरी घराची कळकळ असेल तर शपथ! जशा एखाद्या भाड्याच्या धरून आणाव्या कीं नाहीं तशा! घरातल्या कामांत चित्तच नाहीं! सासवांनीं किती ह्मणून पहावं!

का०—खरंच. सुना आणावयाच्या त्या जर कामीं न पडल्या तर काय उपयोगाच्या?

सो०—का बर? आत तुमच्या सुना काय लान नाय! आंगासारख्या होवाला आल्या तरी पोरपणा नाय जाय!

नानी०—गेला पोरपणा! पोरपणा कशाचा! आपलं तें बरं सगळं समजतं! आमचे मधलीला दुसरं कांहीं समजत नाहीं, पण तिचे समोर कांहीं बोला कीं गेला रपोट नवऱ्याला! अगदीं तारायंत्र! लावालावी करण्यांत तर पहिला नंबर! आणि कामाविषयीं ह्मणाल तर तितकंच!

घा०—सध्याच्या सुनांना कामं करायला पाहिजेत कोठें? आह्मांला काम करायची कसी हौस वाटे! मी तर आपण होऊन आईचे हाताखालीं रांधप करी! यांना चांगले-इष्कीचे कपडे घालून मिरवायला मिळालं ह्मणजे झालं! आह्मी अशा कामाच्या उठवळ असतों, तर केव्हांच झाले असते संसाराचे हालहवाल!

नानी०—अहो पण त्यांना कामं करायला सुचेल कोठून? माथीं उकलायला दोन दोन कलाक लागणार! चारचारदां साववानें तोंडं धुवायचीं! सकाळीं नवरा आफिसांत जाईपर्यंत त्याचेच तोंडाभोवतीं असायचं! पुन्हा आफिसांतून नवरा आला कीं चालली खोलींत! सारा दिवस फुस–फुस फुस–फुस! काय गड किल्ले घ्यावयाचे असतात कोणास ठाऊक? मला तर बाई हे हिजडे चाळे बघितले ह्मणजे गुदगुल्या येतात!

का०—वाः असं काय तरी तुह्मी बोलतांहो? सध्यांच्या नवरेबायकांत प्रीति जास्त असते! त्यांना एकामेकांशिवाय चैन पडत नाहीं!

घा०—खरंच! अगोदरच्या नवरेबायकांत प्रीति होती का? नवरे बायकांना टाकून देत होते वाटतं! त्यांना पोरं बाळं होत नव्हतीं! एवढं मात्र खरं कीं त्यांच्यांत असले हिजडे-पोरकट चाळे नव्हते!

नानी०—कसं बोललींत! त्यांना वडिलांची लाजमर्यादा पण जास्त होती! आतां काय, जिकडे पहावं तिकडे नवरा न बायको! नवरा फिरायला चालला—आली पाठीमागें बायको! नवरा नाटकाला गेला-गेली बायको बरोबर!

का०—पण कांहो, जर बायकोला नाटक पहावसं वाटलं, तर तिनें नवऱ्याबरोबर न जावं तर दुसऱ्या कोणावरावर जावं वाटतं?

नानी०—जाऊं नये कोण ह्मणतं. पण त्याला पण कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं? आह्मीं पण कधीं कधीं चांगलीं नाटकं पाहिलीं आहेत. पण आह्मीं कांहीं त्यांच्या आंगाला आंग लावून भरचौघांत बसत नव्हतों. असे बेशरम चाळे आमचे वेळीं बायकांत पण नव्हते व पुरुषांत पण नव्हते!

घा०—आणि नाटकाला जायाचं तें पाहिजे त्या नाटकाला नाहीं! तसंच चांगल्या बायकांनीं पहाण्यासारखं नाटक असलं तरच कधीं वर्षा सहा महिन्यांनीं जायाचं. आतांसारखं, कसेंही नाटकं असो तिकडे पडल्या उड्या असं नव्हतं!

सो०—तुमी का पण बोला-माला ते वाटते का या तरण्या पोऱ्यांना कोठचच नाटक दाखवाव नाय. नेमीं नेमीं नाटकं वगुन उद्धट न छिछोर होतान, बिजका!

का०—खरंच. मलाही तसंच वाटतं. ही चट त्यांना लावूंच नये हें बरं.

सो०—होपण, आताचे नवरे का कमी हान! आधी तेच दुवाड करतान बायकांनां! मगशी, 'अधिच वाय नाचरी न पायान बांधली घागरी', असं होते.

घा०—तें पण खोटं नाहीं· कांहीं कांहीं आतांचे नवरे बायकांना भारीच फूस देतात. त्यामुळें त्या अगदींच शेफारतात.

नानी०—खरंच. तो आमचे शेजारचा दिना. काय त्याच्या बायकोचा डौल! अगदीं मडमेचा थाट. बायकोनें शेण पोतेरं केलेलं नाहीं चालायचं!

सरदी होईल. डाळ तांदुळ निसलेलं नाहीं चालायचं ! डोळे खराब होतील ! चुलीजवळ शेक नाहीं घेतलेला चालायचा ! पित्त होईल ! मग बायको कशाला काम करते ? आहे ह्मातारडी सासू—मर मर काम करते ! ही चालली दररोज नवऱ्यावरोबर फिरायला. शनवार तर नाटकाशिवाय जातच नाहीं ! कां नाहीं मग बायको वरचढ होणार !

सो०—पुरे झाल्या आत गोष्टी ! रात होते न—चला—

का०—हो बराच वेळ गेला या गोष्टींत—थांबा—स्टेशनावर पोहोंचवायला गडी देतें.

(गड्यावरोबर सो० ना० घा० जातात).

[नंतर डाक्टर व सुंदरराव येतात, व डाक्टर पुतळाबाईस तपासून औषध देऊन जातो. डाक्टर गेल्यानंतर—].

सुं०—राम्या—अरे राम्या—टोपी घाल पाहूं—हें औषध धांवत घेऊन ये पाहूं कसा तो. (रामा टोपी घालून येतो. त्यास सुंदरराव औषधाचा कागद व पैसे देत आहेत इतक्यांत आंतून काशीबाई धावऱ्या धावऱ्या येते.)

का०—ऐकलं का. पुतू अगदीं स्वस्थ पडली आहे. हांक मारली तर हाक देत नाहीं. जरा बघून तर जावयाचं होतं.

सुं०—चल तर. (आंत जातात. आंत काशीबाई रडल्याचें ऐकूं येतें—व सुंदरराव डोळे पुसीत बाहेर येऊन.) हाय ! हाय ! माझी पुतू गेली ! हाय ! माझे लाडके पुतू ! हुंडा मागण्याच्या चालीपासून होणाऱ्या अनर्थास तूं बळी पडलीस ! हाय ! हाय ! हें दुःख पहाण्यास मला ईश्वरानें कशाला जिवंत ठेविलें !

(पडदा पडतो.)

प्रवेश १० वा.

(स्थल—खंडेरावाचें घर.)

[धाकलाभाई व विश्वासराव.]

(धाकलाभाई हॉलमध्यें फिरत आहे.)

धा०—(स्वगत) चला, एकदांची बी. ए. ची परीक्षा तर पार पडली !

आतां अभ्यासाच्या त्रासांतून थोडा वेळ तरी मोकळा झालों. या खेपेच्या इंग्लिशपेपेर[1]ची मोठी धास्ती होती. पण पडलों त्यांतून पार! नाहींतर 'पुनरपि-जननं पुनरपि मरणं' अशी स्थिति झाली असती! पण जरी एक्झ्यॉमिनेशन्[2]चा त्रास नाहींसा झाला तरी हा घरांतला त्रास कोठें सुटतो आहे! दादाजींचा व दादीचा तगादा तर आहेच पाठीमागें. त्यांच्या आयूडियाझ्[3] ह्मणजे सगळ्या ओर्ल्ड्[4]. व त्या आमच्या रिफाइन्ड आॅयडियाझ[5]शीं जुळणार तरी कशा! बरं अगदीं उघडपणें तसें त्यांस सांगणें तेंही ठीक नाहीं! असा हा दोन्हीकडून मारा! असो! पण आज ही गडबड कशाची बरें असावी? कांहीं तरी विशेष आहे यांत संशय नाहीं! विचारून पहावें. अरे पण हा वर कोण येत आहे बरं? ओ! घाट[6] सुपरस्टिशस् फूल! पाहिलं असतां ग्याजुएट आहे पण एज्युकेशन[7] घेऊन व्यर्थ! एज्युकेशन् इज् लॉस्ट अपॉन् हिम्[8]! अरे तो इकडेच येत आहे—

(विश्वासराव येतो.)

वि०—(हंसत) अलाव् मी टु[9] कॉनग्र्याच्युलेट यू ऑन युअर् सक्सेस!

ध्या०—ओ! थ्यांक्[10] यू. पण काय हो विश्वासराव, तुह्मी खालूनच आलेत तेव्हां गडवड कशाची आहे त्याचं कांहीं कारण समजलं का?

वि०—कशाची गडबड? पण मी येतां येतां आज संध्याकाळीं सत्यनारायणाची पूजा आहे असें ऐकलें खरें!

ध्या०—(हंसून) हंः हंः [11]दे आर् ॲट् देअर् गेम् अगेन्! कांहीं नवसबिवस केला असेल!

वि०—मला पण असंच वाटतं. बहुतकरून आपल्या परीक्षेबद्दलच असेल नवस.

ध्या०—काय? त्यांना ह्मणजे असं वाटतं कीं काय कीं त्यांनीं सत्यनाराय-

---

१ इंग्रजी भाषेंतील प्रश्नाचा कागद. २ परीक्षा. ३ विचार. ४ जुने. ५ सुधारलेले विचार. ६ तो धर्मवेडा मूर्ख. ७ शिक्षण. ८ इतकें शिकून व्यर्थ. ९ आपण परिक्षेंत पसार झालेत त्याबद्दल मी आनंद प्रदर्शित करितों. १० मी आपले आभार मानितों. ११ पुन्हा ते आपले वेडे चाळे करावयास लागले!

गाला नवस केला म्हणून मी परीक्षा पसार झालों ? वाः आह्मीं मेहनत केली ती सर्व व्यर्थ ! व्हाट् सुपरस्टिशन् इज् धिस् !

वि०—तसं नव्हे हो. त्यांनीं नवस केला म्हणून तुह्मी पसार झालां असें नाहीं पण त्यांच्या समजुतीप्रमाणें सत्यनारायणानें ही एक त्यांच्यावर मोठी कृपा केली असें त्यांस वाटून त्या देवतेस ते यथाशक्ति आपली कृतज्ञता दर्शवितात, दुसरें काय !

धा०—असें जर आहे तर त्यांना हें थोतांड कशाला पाहिजे ? ही पूजा वगैरे कशाला पाहिजे ? तें भटाचें व पुराणाचें थोतांड कशाला ? परमेश्वर जर सर्वज्ञ आहे व सर्वसाक्षी आहे, तर या साधनांशिवाय त्यास आपली कृतज्ञता दर्शवितां येत नाहीं काय ?

वि०—तो भाग निराळा आहे. त्याच्याविषयीं वादविवाद करणें व्यर्थ होय. मोठमोठे तपस्वी व तत्वज्ञ जेथें दमले तेथें आपणासारख्या क्षुल्लक माणसांचा पाड काय ? जो तो आपल्या समजुतीप्रमाणें करीत असतो. त्यास तुह्मी असेंच कां करतां व असेंच कां करीत नाहीं असें सांगणें केवळ मूर्खपणा होय. पण एवढें मात्र खरें कीं असलीं थोतांडें करून ईश्वरास भाविक बुद्धीनें भजणारे लोक, तुम्हांसारख्या ईश्वराची भीति न बाळगणाऱ्या व ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं मनांत विनाकारण संशय आणणाऱ्या अथवा आणण्याचा आव घालणाऱ्या लोकांपेक्षां हजारपट बरे.

धा०—तुमच्याबरोबर याविषयीं वादविवाद करण्यांत काय अर्थ आहे. तुह्मी ऑर्थोडाक्स्[२] पीपल दुराग्रही फार. नॉट्[३] ओपन् टु कनव्हिक्शन्.

वि०—तुह्मी कांहीं म्हणा. ऑर्थोडाक्स् ह्मणा किंवा सुपरस्टिशस् ह्मणा. आम्ही तसे आहोंत ह्मणून तर ईश्वराची कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें थोडी बहुत सेवा घडते. पण तुमची स्थिति धड ना इकडे ना तिकडे. त्रिशंकूसारखे मधल्यामध्येंच तुम्ही लोंबत रहातां! बरें तें असो. मी हें काय नवीन ऐकतों, "तुह्मी ह्मणें लग्न करीत नाहीं." त्याचें कारण काय ?

---

१ कितीतरी हा धर्मभोळेपणा ! २ जुन्या मताचे लोक. ३ खात्री होणें नाहीं; चूक पदरीं घेणारे नव्हत.

धा०—लग्न न करण्याचें कारण माझ्या मनांत इंग्लंडला जावयाचं आहे व तेथून ब्यारिस्टर[1] होऊन यावं असें आहे.

वि०—येथेंच अड्व्होकेट् होतां येत नाहीं काय ?

धा०—छेः कोण आतां त्रास करित बसतो. बी. ए. होण्यांत एवढीं वर्षे गेलीं. आतां पुन्हां येथें अड्व्होकेट् होण्यासाठीं हार्ड[2] स्टडी करावयाचा. छेः तसा करावयाची इच्छा नाहीं व खरंच सांगतों, ताकदही राहिली नाहीं ! खरोखर, अवर्स[3] इझ् ए किलिंग् स्टडी. तेथें एवढा कांहीं हार्ड स्टडी करावा लागत नाहीं. दुसरं, माझ्या मनांत इंग्लंड पहावयाची इच्छा फार आहे. ती देखील पुरी होईल. एकांत दोन्ही कामें साधतील.

वि०—लग्न करून इंग्लंडला जा.

धा०—तुह्मी तरी काय असं ह्मणतां! अहो, हे आतां आठ दहा वर्षांच्या मुलीशीं माझं लग्न करणार आहेत का? चांगली पंधरा सोळा वर्षांची मुलगी बांधतील गळ्यास. मग काय, लग्न झालं कीं लागला संसार पाठीमागें. मग कसचं जाणं होतं! आणि येथें अड्व्होकेट् होण्याला तीच अडचण यावयाची. एकदां संसारांत गुंतलं व तीं पोरंबाळं पाठीमागें लागलीं ह्मणजे मग झाला अभ्यास! कांहीं होईल तर एव्हांच.

वि०—यॅस्[4] यू आर् राइट्. मग अभ्यास करायाला फार कठीण पडेल. बरं पण याविषयीं दादाजींचं काय मत आहे? त्यांना विचारलंत नाहीं वाटतं?

धा०—अजून तर नाहीं. पण पुढें गोष्ट काढावी लागणारच. कारण पैशाशिवाय तर तेथें जाणं होत नाहीं. माझे जवळ आहेत चार पांच हजार स्वतांचे. ती लेगॅसी[5] आली होती ती पण तेवढ्यांत काय होणार? त्यांचे जवळून होईल तितकें करून सगळेच पैसे काढले पाहिजेत. नाहीं तरी दोन तीन हजार तरी खरे.

वि०—पण मला नाहीं वाटत कीं दादाजी तुह्मांला इतके देतील.

धा०—मला तर तीच भीति आहे.

वि०—पण त्यांना विचारून तर पहा.

धा०—बरं. आतां विश्वासराव, माझं लग्न न करण्याचें दुसरें कारण हें.

---

१ बॅरिस्टर. २ कठीण अभ्यास. ३ आमचा अभ्यास फारच कठीण. ४ हो! तुमचें ह्मणणें खरें आहे. ५ वारसा.

जरी सेल्फ्[1] सिलेक्शन्च्या फेव्हर्मध्यें मी आहें तरी पेरेन्टस्नो डिसप्लीझ[2] करूं नये म्हणून कदाचित् माझे विचार मीं तसेच गुंडाळून ठेवले असते. परंतु ही हुंडा सिस्टिम्[3] मी कधीं एँनकरेज्[4] करणार नाहीं. दादाजी ह्या संबंधानें नोटोरिअस्[5] झाले आहेत. तुम्हीच पाहिलंतना त्या शामाच्या सेकंड् म्यारेजच्या[6] वेळींपण सुंदररावांकडून कशी एकून एक रीत चोपून घेतली. आणि आम्ही तर त्यांचे लास्ट् अॅन्ड्—

वि०—बेस्ट[7] म्हणाना! लाजतां कशाला! तुमचें असंच म्हणणं कीं नाहीं कीं तुम्ही त्यांचे लास्ट् व बेस्ट् सन् असल्यामुळें जितका घेववेल तितका हुंडा घेतल्याशिवाय ते रहाणार नाहींत? [8]ही उइल् मेक् धी बेस्ट् ऑफ् दिस् ऑपरच्युनिटी ही क्यान्.

धा०—हो. असं तर खरंच. आणखी तें आपल्याला तर खपायाचें नाहीं. ह्या परनिशस्[9] सिसटिम्मुळें आपल्या जातींत अनर्थ होऊं लागला आहे. शेंकडो मुलींचे बाप कर्जाखालीं चुरडून जात आहेत. व ह्यापुढें काय काय भयंकर परिणाम होतील त्याची कल्पना केली म्हणजे थरकांप सुटतो. त्या सिसटिम्ला आपण होऊन एन्करेजमेंट्[10] देणं हें आपल्यासारख्या एज्युकेटेड्[11] लोकांना शोभतं काय? बोला—

वि०—अलबत नाहीं. आणखी ही चाल जर खरोखरीच मोडणें आहे तर तुमच्या सारख्या विद्वान् व तरुण अविवाहित मुलांनीं असे विचार मनांत बाळगून आपल्या आईबापांचीं मनें वळवून हुंडा बिलकुल न घेतां लग्न करण्याचा निश्चय केला तरच कांहीं होणार आहे. दुसरा मार्ग बिलकुल नाहीं.

धा०—व म्हणूनच मी या बाबतींत अनुकरणीय असं एक्झ्याम्पॅल्[12] घालून देणार. कांहीं हरकत नाहीं पेरेन्ट्स् डिसप्लीझ झाले तरी. अशा चांगल्या ऑब्जेक्ट्स्साठीं[13] घटकाभर त्यांची डिसप्लेझर्[14] झाली तरी पतकरली. परंतु यापासून

---

१ स्वतः पसंत करण्याच्या तर्फे. २ आईबापांना नाखुप करूं नये. ३ रीत. ४ उत्तेजन देणें. ५ नांवाजलेले. ६ दुसरें लग्न. ७ शेवटचा व सर्वांत चांगला मुलगा. ८ या संधीचा जितका लाभ घेववेल तेवढा घेतील. ९ अनहितकारी रीत. १० उत्तेजन. ११ सुशिक्षित. १२ उदाहरण. १३ हेतु. १४ नाखुषी.

होल. कॅम्युनिटीचें[1] कल्याण होणार आहे. तर झाला माझा निश्चय. जर मी लग्न केलें तर कोणाजवळून एक कवडी देखील हुंडा घ्यावयाचा नाहीं.

वि०—शाबास! परमेश्वर तुमचा निश्चय सिद्धीस नेओ. बरं तर मी येतों.

धा०—चला, मीही तुमच्या बरोबर खालीं येतों. पाहूं काय चाललं आहे तें.

(जातात)

प्रवेश ११ वा.

[स्थल—खंडेरावाचें घर.]

(वामनराव व पुतळाबाई.)

(वामनराव आपल्या खोलींत इझीचेअरवर पुस्तक वाचीत पडले आहेत. इतक्यांत पुतळाबाई आंत येते, तीस पाहून)

वा०—कां आज इतका वेळसा झाला?

पु०—वेळ कशाचा? कारभार आटपेल तेव्हांना? शेणपोतेरें होतां होतां दहा वाजून जातात. सगळंच मला करावं लागतं. पुन्हा इतकं करूनही दादींच्या मनास येतं का? छेः! मला बाई या घराचा कंटाळा आला आहे!

वा०—अग कंटाळा येऊन उपयोग काय? सोसलं पाहिजे.

पु०—सोसा तुह्मी! मी नाहीं सोसणार! तुमचे आईबाप तुह्मांला गोड. मला नाहीं. तशांत, दादींनां तर सगळ्या गांवचा हेवा. चार दागिने केले आहेत ते त्यांच्या डोळ्यांत खुपतात, व ह्मणूनच हा सर्व जाच!

वा०—छेः छेः तूं वेडी आहेस. तिजजवळ दागिने नाहींत कीं काय! आणि तूं कोण तिला परकी आहेस काय?

पु०—परकी नसतें तर असा जाच नसता. तीच तुमची बहीण! किती तिचे लाड आणि काय तिच्या जिवाचे सोहळे! बरोबरच आहे. ती पडली पोटची. आह्मी बोलून चालून परक्यांच्या. पण बरं आहे, कामाची इतकी उठवळ आहे कीं इकडची काडी तिकडे नाहीं उचलीत! त्याचा देखील त्रास आह्मीं काढावा!

---

१ सगळ्या जातीचें.

दोन दोन तीन तीन महिने माहेरीं! ठीकच आहे. आहेत भावजई काम करायला मग सासरीं राहतात कशाला! नवराही येतो दररोज माहेरीं! मग आणखी तें काय पाहिजे!

वा०—आज वाटतं हें सारी रात्र असंच चालवयाचं?

पु०—बरोबरच आहे, आपल्याला तें कसं आवडणार! तुह्मांला मी खरोखर सांगतें कीं मला या घरांत व अशा जाचांत रहावयाचें ह्मणून नाहीं.

वा०—ह्मणजे तूं जाणार कोठें?

पु०--तुह्मी आपलं निराळं करा.

वा०—काय ह्मणतेस? आईबापांनां सोडून निराळा संसार मांडूं? छेः छेः वेडी कोठची!

पु०—नाहीं तर मी उद्यां माहेरीं निघून जाणार. मग तुह्मांला वाटेल तें करा. (रागावून जाऊं लागते.)

वा०—(तिला वळेंच वळवून) वेडी नाहींतर! या एवढ्याशा क्षुल्लक कारणासाठीं निराळा संसार मांडणें हें मला शोभेल काय? पुन्हा, तसेंही करून आपला नफा कोणता? चार चौघांत एकत्र रहाण्यांत केवढी मौज आहे बरें. एक तर आपण आपल्याच मंडळींत नेहमीं राहतों. हात आहे, पाय आहे, पाहिजे त्या वेळीं-मध्यरात्रींही-आपल्यासाठीं सगळें घर मेहनत करील. खर्चही पुष्कळ वांचतो. चारचौघे खातात तेथें दोन माणसांचें पोट सहज भरतें. पण तींच दोन माणसें निराळा संसार करूं लागलीं तर मग त्यांस सर्वच वेगळें नको का करायाला! भांडीं कुंडीं सर्व कांहीं पाहिजे. नको तें काय? अग तो संसारच! मग दोन माणसांचा काय आणि पंचवीस माणसांचा काय! एकच!

पु०—तें सगळं खरं! पण केव्हां? जर सर्वांचं मन एक असेल तेव्हांना? नाहीं तर, बाहेरून दिसतं कीं सर्व कुटुंब एकत्र रहातं पण एकाचं दुसऱ्याशीं ठीक असेल तर शपथ! जर एकमेकांविषयीं सर्वांचीं मनें शुद्ध असलीं तर एकत्र रहाण्यांत शोभा. नाहीं तर त्यापेक्षां निराळं केलेलं अधिक चांगलं.

वा०—तूं ह्मणतेस तें खरें पण—

पु०—पण बीण मी कांहीं समजत नाहीं. मी ह्मणतें हें जर आपणास खरं वाटतं तर मग मी आपणास कांहीं सांगतें तें ऐकतां का?

वा०—काय ह्मणतेस तूं?

पु०—जर मी तुमची खातरी करून दिली कीं तुह्मी व मी दादाजींना व दादींना नकोशीं झालों आहोंत व त्यांच्या मनांत आपण निराळं करावं असं आहे तर तुह्मी निराळे व्हाल?

वा०—निराळें होण्याची गोष्ट सध्या राहूं दे एकीकडे. पण असा पुरावा तुजपाशीं कोणता आहे तो तर कळूं दे!

पु०—नको. तुह्मी त्यांचे जेवढे व्हाल तेवढे माझे थोडेच होणार आहां! तुह्मांला माझं ह्मणणं खरंच वाटायचं नाहीं.

वा०—अग पण सांग तर खरी.

पु०—छे! नको बाई–सांगितल्या सारखं ऐकेल तशाच माणसाला सांगावं. तुमच्यासारख्याला न सांगितलेलं बरं!

वा०—झालं. अशानें समजावं तरी काय? तुझ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे! तूं मला कधींही खोटें सांगणार नाहींस. चल. सांग पाहूं काय तें.

पु०—हं. तसं असेल तर सांगतें. परवां दादाजी व दादी मधल्या खोलींत गोष्टी करीत वसलीं होतीं.

वा०—मग काय, तूं त्यांचें ह्मणणें चोरून ऐकलेंस वाटतें?

पु०—झालं. हेंच तें! मी कशाला त्यांचं ह्मणणं चोरून ऐकतें! माझं काय अडलं आहे तसं करायला! (रागावून) सहज कानीं पडलं तर कानांत बोळे घालावे वाटतं!

वा०—अग पण अशी रागावतेस कां! नीट तरी बोलशील!

पु०—नीट काय बोलणार! ऐकणारे हुशार पडलेत ना?

वा०—बरं तें असो. मग तुझ्या कानीं त्यांचं कोणतं बोलणं पडलं? चल सांग पाहूं कशी झट्कन.

पु०—मी त्या वेळीं शेजारच्या खोलींत तांदूळ काढायला गेलें होतें तों त्यांचं भाषण माझ्या कानीं पडलं. दादी तुमचं नांव घेऊन ह्मणाल्या–तो फार बेपर्वा झाला आहे–सांगितलेलं तो मुळींच ऐकत नाहीं–तब्बेत संभाळणं फार कठीण–मला त्याचा आणि त्याच्या बायकोचा ह्मणजे–माझा–फार कंटाळा आला आहे.

वा०—हं. ती असें ह्मणाली?

पु०—थांबा. अजून तर मुख्य पुढेंच आहे. दादी तर येवढंच ह्मणाल्या पण दादाजी काय काय बोलत होते.

वा०—हं! दादाजी बोलत होते? छेः अशी गोष्ट कध्धीं होणार नाहीं.

पु०—नाहीं तर नाहीं! मी आपली लबाड–झालं!

वा०—तसं नाहींग. तुला लबाड कोण ह्मणतं! बरं तें असो. असं ते काय ह्मणाले?

पु०—दादाजी तुमचं नांव घेऊन म्हणाले त्याला आतांशा शिंगें फुटूं लागलीं आहेत. तो कोणाचं ऐकत नाहीं. मस्त झाला आहे. जर कां अगदीं चोख असता तर काय केलं असतं कोणास माहित!

वा०—(रागावून) हं असं ह्मणाले?

पु०—आणखीही ह्मणाले कीं–जर त्याला आपल्या येथें पतकरत नसेल तर त्यानें आपलं निराळं करावं; आणखी तेंही लवकर तितकं बरं! याशिवाय माझेविषयीं ते नाहीं नाहीं तें बोलले ते निराळंच. खरंच सांगतें, मी तें सगळें तुमच्यासाठीं गट्ट गिळून टाकलें; नाहीं तर असे शब्द मीं कधीं सहन केले नसते!

वा०—काय! माझ्याविषयीं दादाजी व दादी यांनीं असं ह्मणावेंना? त्याचप्रमाणें हिचाही त्यांनीं असा छळ मांडावा ना? छेः हें ठीक नाहीं.

पु०—ठीक नाहीं कसं. ठीकच आहे. रहा! अजून एकत्र रहा. एकत्र रहाण्यांत मौज आहेना? मारा तर अशी मौज! एव्हां नाहीं तें समजावयाचं. आज आपल्या पाठीमागें असं बोलले. उद्यां आपल्या तोंडावर असे—यापेक्षांही अधिक–बोलतील. मग उघडतील तुमचे डोळे!

वा०—छेः! आतां यापुढें एकत्र रहाण्यांत अर्थ नाहीं! (विचारांत पडतो.)

पु०—कां विचार कसचा चालला आहे?

वा०—विचार कसला वेगळं व्हावयाचं—

पु०—(आनंदानें) खरंचना? नाहींतर या वेळापुरतं?

वा०—छेः छेः झाला माझा निश्चय.

पु०—मग केव्हां निराळं व्हावयाचं? माझ्या माहितीचें एक घर आहे.

माझ्या माहेरच्या शेजारचें तें. किती सोईचें आहे सांगूं. आपण सांगाल तर उद्यांच्या उद्यां त्याची तजवीज बाळाला सांगून करवितें.

वा०—इतकी उतावीळ होऊं नकोस. एक दोन महिन्यांत आपण निराळं केलंच समज. एकदम घाई करून उपयोग नाहीं.

पु०—छेः छेः दोन महिने कोण थांबतं! मी तर उद्यांच्या उद्यांच येथून पाय काढायला तयार आहें. नाहीं पण, तेंच घर घ्यायचं ना? पहा, ही संधि घालवूं नका, नाहीं तर दुसरा एकादा तें भाड्यानें घेईल.

वा०—बरं तर उद्यां त्याविषयीं विचार करूं. चल निज जा आतां. बारा वाजून गेले.

पु०—तुम्ही नाहीं कां येत?

वा०—मला आणखी कांहीं वेळ वाचावयाचें आहे. जा निज तूं.

पु०—(जातां जातां स्वताशीं) ठीक झालं. माझ्या मनांतील फार दिवसांचा हेतु आज पार पडला! आज सात आठ महिने एकसारखी पाठ पुरविली. शेवटीं आज काम तडीस लागलं! चांगलं व्हायचं असलं ह्मणजे केव्हांही होऊन जातं! आतां लवकरच माझी मी मालकीण होणार! मग मला विचारतं पुसतं कोण आहे! सासूबाईनां ह्मणावं आतां मिरवा आपला सासूपणा सुखानें!

(पु० निजावयास जाते.)

वा०—(स्वगत) काय बरं करावं? मीं मोठ्या अडचणींत पडून गेलों आहें. इकडेही बोलवत नाहीं. तिकडेही बोलवत नाहीं. निराळं करा, निराळं करा, असा एकसारखा आग्रह करून इनें तर माझी अगदीं पाठ पुरवून टाकली आहे! दररोज हीच गोष्ट! छेः बुवा! आपल्याला तर हा त्रास पतकरत नाहीं! या गोष्टीचा कोणत्याही रीतीनें निकाल लावला पाहिजे. बरं पण, इच्या ह्मणण्यास कबूल होऊन निराळा संसार मांडावा, तर तेंही मला ठीक दिसत नाहीं. काय! इच्या सांगण्यावर विश्वास ठेवून मी दादाजीस व दादीस या त्यांच्या ह्मातारपणीं सोडून जाऊं? छेः असें केल्यानें लोक माझी फजिती करणार नाहींत काय? सोयऱ्याधायऱ्यांत, मित्रमंडळींत, माझी छीः थूः होणार नाहीं काय? (विचार करून) पण मी आतां करूं तरी कसं! इच्या ह्मणण्यास रुकार न दिला तर इचा असा हा त्रास दिवसेंदिवस वाढत जाणार यांत संशय नाहीं. बरं, अंमळ व्याघ्र-

रूप धारण करीन तर इच्यापुढें माझं चालणार काय! मघांच पाहिलं ना, जरा कोठें उडवाउडवीच्या गोष्टी करूं लागलों तों रागानें कशी लाल होऊन गेली! व तिची ती रागावलेली मुद्रा पाहिली ह्मणजे आपण तर बुवा अगदीं घाबरून जातों! निराळं करीत नाहीं असा जर जबाब देईन तर ती मला जिवंत ठेवीत नाहीं हें खचितच! बरं पण, इचा हा त्रास भोगण्यापेक्षां इचें ह्मणणें काय आहे त्याचा विचार करून निराळं झालं तर कसं? निराळं झाल्यास फायदा कोणता होणार? हं—(विचार करून) छेः एका गोष्टीखेरीज दुसरा कोणताही फायदा होणार नाहीं! ती एक गोष्ट कोणती, तर ही नेहमीं सुखी राहील व इचा माझ्या मागचा त्रास चुकेल. एवढा फायदा होईल खरा! बरं! पण इनें तरी माझा असा कोणता अपराध केला आहे कीं तिला मीं सुख देऊं नये! जर निराळं राहिल्यानें इला सुख व आनंद होणार आहे तर मग एकत्र राहण्यांतच जास्त काय आहे? उलट ही नेहमीं असी असंतुष्ट राहणार—छेः मला सगळं कांहीं खपेल, पण ही असंतुष्ट राहिलेली खपणार नाहीं! माझ्या लाडकीला मीं सुख देऊं नये तर मग कोणीं द्यावें! व या कामांत मलाही तिचा कांहीं विशेष वांक दिसत नाहीं. ती ह्मणते तसं असेलही. दादाजी तर तोंडाचे उष्टे आहेत. दादीलाही आतां त्यांचा वारा लागूं लागला आहे. तेव्हां, त्यांनीं इचा असा छळ मांडावा यांत मोठेंसें नवल नाहीं. असी जर गोष्ट खरी असली तर तिनें तरी यांचा असा जाच कां सोसावा! काय, आह्मी त्यांचे ओशाळे आहोंत? बस्स. निराळं करण्याचा विचार करावा. हाच बेत उत्तम. त्यामुळें ती सुखी होईल, माझा त्रास चुकेल व या ह्मातार्‍यांचीही चांगली खैरी मोडेल. (जातो.)

प्रवेश १२ वा.

[स्थल—खंडेरावाचें घर.]

(शामराव बेनाबाईस धक्के देत देत खोलींतून बाहेर आणतो.)

शा०—बोल, देतेस कीं नाहीं दागिने?

बे०—अहो पण ऐकाल कीं नाहीं?

शा०—वस्स. मी ऐकत बियकत कांहीं नाहीं. दे दागिने-दे–आण कोठें आहेत ते—

बे०—पण मी दागिने देऊं तरी कोठून? तुमचे होते नव्हते तेवढे दिले. आतां आंगावर एक फुटकी कवडी तरी आहे का? नाहीं ह्मणायला एवढा एक गरसोळीचा मणी आहे. तो पण घेऊन जा पाहिजे असल्यास!

शा०—काय? त्या तासाच्या बांगड्या कोठें आहेत?

बे०—त्या बांगड्या आईच्या. त्या तिच्या तिला परत दिल्या.

शा०—लुच्ची! तुला लग्नांत तुझ्या आईनें त्या घातल्या होत्याना? त्यावर तिचा काय हक्क? चल–आण जलदी. एथेंच कोठें लपवून ठेवल्या असशील. दे तुझ्या माथं उकलाच्या वाकसाची चावी!

बे०—ही घ्या चावी! पण मी सांगतें त्या येथें नाहींत. आईनें त्या कांहीं मला दिल्या नव्हत्या. उगीच चार दिवस घालण्यासाठीं दिल्या होत्या.

शा०—लबाड कोठची. तूं त्या तिच्याजवळ मुद्दाम नेऊन दिल्यास. बोल. आणतेस कां नाहीं? चल–घे शाल. चल–(इतक्यांत खंडेराव व सोनाबाई आंतून येतात.)

खं०—अरे शामराव हे हाय तरी का? अरे हें कोळ्या कुलवाड्याचं घर हाय का गरस्थाचं घर हाय? भरले ओळीन हे का तुफान हाय! अन हे रोज-चेरोज तंटे न कज्जे कशाचे?

शा०—दादाजी, नवराबायकोच्या तंट्यामध्यें तुह्मीं पडूं नये. तुह्मी आपले गुपचीप बसा. जा. तुमचं इकडे काय काम आहे?

खं०—का? माजे घरान न तूं मला चीप बसाला सांगणार–माजं इकडे काय काम हाय? अरे तूं पोर मला शिकवतेस?

सो०—अरे पण शामराव, त्यांचे तोंडीं लागूं नको!

शा०—दादी तूं मध्यें बोलूं नकोस. ह्मातारी माणसं सगळ्यांमध्यें बोलायला लागलीं तर मग त्यांचा मान तो कसा राहणार?

खं०—अरे बैला तूं शुद्धीवर हायस का छाकटा हायस! तूं ह्मातारा कोणाला बोलतेस? मी ह्मातारा? अरे मी म्हातारा? ह्मातारा तुझा बापूस! ह्मातारा तुझा आजूस! नको सांगूं तूं. (बेनाबाईस) बेने, का ग, हें का तुफान हाय?

शा०—खबरदार एक शब्द बोलशील तर! दोन थोबाडांत देईन.

खं०—अरे! माझे घरांत न माजा अपमान! न तो पण माजे पोटचे पोराकडून! (सोनाबाईस) अग ए, पायलास का तुजा पोर कसा पराकरमी निघाला तो?

सो०—अहो तुमी तरी पड खा! तो एक मूर्ख झाला! पण तुमाला तरी विचार हाय का नाय! (शामरावास) शामराव, अरे हाच का तुजा शहाणपणा? अशीच कारे तूं आमची वडिलांची मर्यादा राखणार!

शा०—हे बघ दादी! जर तुझांला आपला मान ठेऊन घ्यावयाचा असेल तर तुह्मी आतांच्या आतां जा पाहूं येथून-जा—

खं०—अरे तूं जा-जा ह्मणून कोणाला सांगतेस?

शा०—तुह्मां-तुह्मां-(इतक्यांत)—

सो०—अरे पण शामराव, तूं तरी तोंड आवर. कसेरे असे तुमी? कोणीच ऐका नाय! (खंडेरावास) तुमाला तरी तोंड आवरता नाय का ये? तुमी चुप बसा. मी सगळ विचारतय—

खं०—(रागानें) का त्या गाढवाला विचाराच हाय! करतशेल त्या विचारीचा उगीच छळ! वेडच्या पोर कोठचा. भर वळीतले घरान अस तुफान कराला शरम नाय वाटे! सकाळचे सकाळ मी गाढवाला हाकून देतय घरानशीं! मगशी उघडतील डोळे! चल–माला त्याच तोंड पावसं वाटेनाय! (जातो).

सो०—शामा-ए हाय तरी का? सांग बा—

शा०—कांहीं नाहीं—(बेनाबाईकडे बोट करून)—हिला पहिल्यानें घरांतून हांकून लाव पाहूं कशी ती—


सो०—कां? अस का तिजून केलय?

शा०—तें मी कांहीं सांगायला बसत नाहीं. बोल, हिला हांकून देतेस कीं मी चालता होऊं घरांतून?

सो०—अरे पण, असं तिजून का केल ते अगोदर सांगशील का नाय?

शा०—कांहीं करो अगर न करो! मला ही घरांत अगदीं नको. या क्षणीं गेली पाहिजे-आतांच्या आतां. बोल, तुला मी पाहिजे कीं ही सटवी पाहिजे?

सो०—अस वेड्यासारख का बोलतेस तू तरी! तुज पोराच ऐकून मी जनामदी हसवण करून घेव का? अन लोक तुला पण हंसणार नाय का?



खं० * * करतशेल त्या बिचारीचा उगीच छळ ! बेहय्या पोर कोठचा. (पृष्ठ ८४).

शा०—(रागानें) मी लोकांच्या हंसण्याची बिलकूल परवा करीत नाहीं. बोल-हिला जा ह्मणून सांगतेस का करूं मी माझं काळं?

सो०—बरं-बरं तूं आत इकडशी जा. मी सांगतय तिला जावाला.

शा०—(संतापानें) सांगतय-बिंगतय कांहीं नाहीं. (बेनाबाईस) अग ए, घे शाल—हो चालती आतांच्या आतां. खबरदार पुन्हां या घरांत पाय ठेवलास तर! कायग-ए-ऐकतेस कीं नाहीं?

सो०—(शामरावाच्या हनुवटीस हात लावून) अरे पण माज ऐकशील का नाय? मी तिला पाठवतय. तू जा. तिला जेव घालतय न पाठवतय. अवडे रात्री उपाशी कशी पाठवू!

शा०—बरं आहे तर. मी जातों. पण—

सो०—बरं-बरं-जा-जा. माझे बा-जा-(शामराव चडफडत चालता होतो). पराक्रमीरे बाबा निघालास! (बेनाबाईस) काग, अवड झालं तरी का?

बे०—कांहीं नाहीं. आईनें दिलेल्या बांगड्या मागीत होते.

सो०—पण तू ते दिल्या नायस न? मगशी हे तंटे न रुसवे कणाचे?

बे०—मीं नाहीं तंटा केला.

सो०—अग हो! तूं कशाला तंटा कराला पायजेस! माझाच सोकरा तंटेखोर! तूं अगदीं भोळी! भल्याचं बोंड!

बे०—शपथ मी कांहीं बोललें असेन तर!

सो०—बरं-बरं-झाला तंटा तो थोडा झाला! आतं तुझा माझा नको होवाला! जा-जेवा जा-न रामाचे बरोबर ओंवाळा! रा चार दिवस तिकडेच-त्याला पण कोठे चैन पडाच हाय! सकाळ बोलवाला धाडील! पण तिकडे सगळ सांगाला नको हो! त्याचा सभावच असा; त्याला का कराच! उद्यानां नवरा बायको एक व्हाल! लोकांनां सोभा मातर दाखवाची! अकला हान कोठें! उगीच नाय बाय, चार चौघान वागाच! आमी अशा असतु ते त्यांचे बरोबर अवडी वरस काढली नसती अब्रूमदी! त्यांचे सभावाचा नवरा पायजे होता! तुमी ते दोन दिवसान धिंदवडे केलसते! बरं. रात होते. जा—

बे०—(स्वगत) शेवटीं माझ्याच माथ्यावर खापर फुटलं! पण त्यांनां तरी दोष कां देऊं! आपलंच नशीब फुटकं! अजून तरी किती हाल व अपेष्टा कपाळीं आहेत तें कोणास ठाऊक! असो! देवाची मर्जी! (जाते.)

प्रवेश १३ वा.

[स्थल—सुंदररावाचें घर.]

(सुंदरराव एका कोचीवर पडले आहेत.)

सुं०—देवा. या त्रासांतून मला मुक्त कर. कर्जाच्या चिंतेनें त्याचप्रमाणें संसाराच्या घोरानें मला रात्रंदिवस चैन कसें तें पडत नाहीं. मला सांप्रत सुख तर काडीएवढें नाहीं पण दुःख पाहिलें तर पर्वताएवढें आहे. स्वतांचें सुख एकीकडेस राहिलें, पण पोटच्या पोरांवाळांचें तरी सुख! तेंही नाहीं! एक तर नवरा न मिळाल्यामुळें झुरून झुरून गेली. दुसरीचें नांवाला मात्र लग्न लागलें-तिला पाहिलें तर नवऱ्यापासून काडीचें सुख नाहीं. आमच्या जांवईबुवांचे दररोज नवे नवे पराक्रम ऐकण्यांत येतात. काल काय दारू पिऊन रस्त्यांत पडले! आज काय जुगारांत पकडतां पकडतां वांचले! याप्रमाणें दररोज कांहीं ना कांहीं तरी आहेच! बरें, हे ढंग बाहेरच्या बाहेर असते तरी पतकरते. पण तसेंही नाहीं! घरांतही त्याचप्रमाणें! बायकोस वालभरही सोनें करण्याची आशा नाहीं. उलट लग्नांत घातलेले थोडे बहुत दागिने तेही पार! असो, त्याचा आतां खेद करून काय उपयोग! आपणच मुलाविषयीं विशेष चौकशी न करितां त्याच्या पदरीं आपल्या गरीब मुलीला बांधली! ही माझ्या गृहसुखाची स्थिति! कर्जानें तर जेरीस आणलें. चाकरी होती ती देखील देवास सहन झाली नाहीं. त्या मारवाड्यामुळें पेनशन घेणें भाग पडलें! बरें! दुसरा कांहीं धंदा करावा तर आंगीं शक्ति राहिली नाहीं! आज पंधरा दिवस झाले तापानें अगदीं बेजार करून सोडलें आहे. ईश्वरा! या सर्व त्रासांतून मुक्त करणार तूंच एक समर्थ आहेस! एकदांचे डोळे मिटीत ह्मणजे झालें!

(इतक्यांत वेनाबाई एका गड्याबरोबर येते.)

(वेनाबाईस) कांग वेनू, तूं एवढ्या रात्रीं इकडे कां आलीस?

वे०—(रडत) काय सांगूं बाबा माझं कपाळ! (काशीबाई आंतून येते.)

का०—कांग वेनू, तूं इकडे ग कोठें?

बे०—बाबा-आई–(रडूं लागते.)

का०—अग पण झालं तरी काय? अशी रडतेस कां?

बे०—आई मी काय सांगू! आतां तुम्ही मला तारा किंवा मारा–मला तुमच्या इथें ठेवा किंवा घरांतून हांकून द्या–मला या पुढें त्यांच्या इथें जायाचं ह्मणून नाहीं!

सुं०—अग पण असं झालं तरी काय?

बे०—व्हावयाचं तें झालं-मी मोठी झालें ह्मणून आपला त्रास काढून टाकण्याकरितां मला एकाद्या गरीब गाईप्रमाणें कसाबाच्या स्वाधीन केलीत. दुसरं तें काय? त्यांच्या पदरीं बांधण्यापेक्षां मला ठार केली असतीत तरी बरं झालं असतं!

सुं०—हाय! हाय! आईबापांनीं एवढें करूनही त्यांसचना शेवटीं बोल! असो! पण बेने झालं तरी काय?

बे०—बाबा, व्हावयाचं तें काय आणखी? घरांतील सर्व दागिन्यांस आग लावून माहेरचे दागिने आणण्यास सांगत होते.

सुं०—एवढेंचना? त्यांनीं सांगितलें ह्मणून काय झालें? तूं कोठें त्यांनां नेऊन दिलेस? आणि आपणांपाशीं तरी दागिने आहेत कोठें? छे: एवढ्याशा क्षुल्लक कारणासाठीं तुला सासरचा कंटाळा येणें हें माझ्या मतें योग्य नाहीं! वेडी कोठची! हें तूं काय केलेंस?

बे०—पण बाबा, माझं सगळं ह्मणणं ऐकून तर घ्याल? मी इतकी वेडी आहें काय, कीं एवढ्या क्षुल्लक कारणासाठीं सासर सोडून येथें येईन? आई, तूं मला झिट्कारून टाकशील पण मी तुझ्यापाशीं पदर पसरून मागतें कीं मला क्षमा करण्याचं वचन दे! माझ्या हातून तुझा एक मोठा अपराध घडला आहे!

का०—बेने, माझ्या तोंडास काळिमा आणण्यासारखं तर तूं कांहीं केलं नाहींसना?

बे०—आई, त्याविषयीं तूं निर्धास्त रहा. तसं कांहीं माझ्या हातून या जन्मीं तर घडणार नाहीं!

सुं०—मग दुसरा असा कोणता अपराध तुझ्या हातून घडला?

बे०—आई, पण तूं मला झिटकारून टाकणार नाहींस ना?

का०—अग पण सांग तर खरी!

बे०—(आईस बिलगून) आई—

सुं०—अग पण तूं इतकी भितेस कां? बोल-चल आमची काळजी दूर कर.

बे०—आई, तुझी बाळी—

का०—काय, माझी बाळी घालविलीस? (तिला झिटकारते.)

बे०—नाहीं आई. मीं ती त्यांनां दिली—

का०—बाळी-माझी दोन हजारांची बाळी! कोठेंग मीं इला बाळी दिली! मेले तुझी अक्कल कोठें गेली होती, माझ्या बाळीला आग लावलीस ती? चल मेले माझ्या घरांतून. मला तूं आतां नको. कर तुझें तोंड काळं. चल हो चालती!

बे०—आई–बाबा–आई. पण माझं ह्मणणं तूं ऐकून तर घेशील? मी खरोखर सांगतें, जर तूं माझी सर्व गोष्ट ऐकून घेशील तर मजवर इतकी निष्ठुर होणार नाहींस!

का०—मेले मी तुझं कांहींएक ऐकणार नाहीं! माझी बाळी तूं बऱ्या बोलानें आणून दे. कारटे, तुझ्याच पायगुणानें माझ्या सर्व संसाराचे सोहळे झाले! एवढंच काय तें कमी होतं–तेंही तूं पुरं केलंस! चल कशी ती! घे शाल आणि हो चालती!

बे०—आई तूं इतकी निष्ठुर होऊं नकोस! बाबा, आईची समजूत करा! माझें ह्मणणें ऐकून घ्या आणि मग तुम्हांस वाटेल तशी माझी वाट करा!

का०—मेले आतां तुझी वाट केलीच समज! चल—घरांतून चालती हो कशी! मला तुझं तोंड पाह्याचं नाहीं.

सुं०—(काशीबाईस) अग पण ती काय ह्मणते तें ऐकतर खरी!

का०—जळळे मेले कारटीचे शब्द ऐकण्यास मी खुषी नाहीं! तुह्मींच घ्या त्या कारटीचं बोलणं ऐकून.

बे०—बाबा-आई-शनिवारीं रात्रीं त्यांनीं मजजवळ बाळी मागितली. पहिल्यानें मीं साफ नाहीं ह्मणून सांगितलं व थोडी फजितीही केली! परंतु दोन दिवसांत परत आणून देईन असें सांगितल्यावरून, माझ्या मनांत विचार आला कीं, ही त्यांनां सुधारण्याची चांगली संधि आहे. ह्मणून मीं त्यांनां सांगितलं कीं, जर तुह्मी सर्व व्यसन एकदम सोडून देण्याचं वचन द्याल तर

तुह्मांस थोड्या दिवसांसाठीं वाळी देतें. त्याचप्रमाणें त्यांनीं वचन दिलं व मीं त्यांस वाळी दिली—

का०—पण मेले ती वाळी तुझी होती का?

बे०—आई ती माझी नव्हतीं खरी, पण मीं ती त्यांस पोरबुद्धीनें दिली. मीं त्यांच्या वचनावर भरंवसा ठेवला. पुन्हा, मला वाटलं कीं तुझी व बाबांची कशी तरी समजूत करतां येईल. आणि त्यांत, जर कां ते वचनाप्रमाणें चालले, तर तशा शेकडों वाळ्या करतां येतील, असाही विचार माझ्या मनांत आला.

का०—चोर तर चोर आणि तशांत शिरजोर! मेले, आणखी दोन जन्म घेतले तरी त्यांजकडून अशी एकही वाळी होणार होती काय?

बे०—आई, नकोग मला अशा निष्ठुर शब्दांनीं मारूं. मी पदर पसरून मागतें कीं माझा इतका अपराध माफ कर. मी पोरबुद्धीनें फसलें गेलें. पण त्यांनां वाळी देण्यांत माझा हेतु कोणता याचा विचार कर!

सुं०—तुझा हेतु चांगला खरा, परंतु जी मूल्यवान् वस्तु तूं आपल्या नवऱ्यास देऊन टाकलीस ती तुझी नसल्याकारणानें ती कोणासही कोणत्याही कारणाकरितां द्यावयास तुला अधिकार नव्हता. पण असो. झाली गोष्ट परत येत नाहीं. (उसासा टाकून) माझेंच दुर्भाग्य त्यास तूं काय करशील! आज दोन हजारांची वाळी व्यर्थ गेली! हा लहान सहान तोटा झाला नाहीं!

का०—कोठें रे मला या कारटीला माझी वाळी देण्याची बुद्धि झाली! त्या दाण्यासारखे आतां दाणे मिळतात तरी काय?

सुं०—आणि मिळत असले तरी विकत घेण्याची आपणांस शक्ति कोठें आहे? एवढी वाळीच काय ती राहिली होती! तीही दैवास सहन झाली नाहीं. असो ईश्वराची इच्छा!

का०—हो! हातीं करावं आणि दैवास रडावं!

सुं०—अग पुरे कर आतां. तिला दुःखावर डाग देऊं नकोस. बरं पण बेनू, तुला एकाएकीं येथें येण्याचें कारण काय?

बे०—त्यांनीं मला घरांतून जा ह्मणून सांगितलं.

सुं०—कोणीं? सासूनें किंवा सासऱ्यानें?

बे०—नाहीं.

सुं०—तर नग कोणीं, नवऱ्यानें?

का०—सांगायाला काय झालं! होतं नव्हतं तेवढं घेतलं–आतां कांहीं राहिलं नाहीं, तेव्हां घरांत तरी कशाला पाहिजे!

सुं०—तुला त्यांनीं कां बरं जा म्हणून सांगितलं?

बे०—(आईस) तुझ्या तासीव बांगड्या आणायला सांगत होते, त्यावरून.

सुं०—बरं पण तूं येथें आलीस हें तुझ्या सासुसासऱ्यांस ठाऊक आहे का?

बे०—हो, त्यांच्या समोरच मला त्यांनीं हांकून लाविली.

सुं०—मग तुझ्या सासूनें किंवा सासऱ्यानें कांहीं म्हटलं नाहीं?

बे०—त्यांचं ऐकतो कोण! दादीबाई पुष्कळ बोलल्या. दादाजीही पुष्कळ रागावले. पण त्यांचं ऐकतो कोण!

सुं०—हं, एकूण राजश्री प्रतापी खरे! बरं बेनू तूं जेवून आली आहेस ना?

बे०—हो—

सुं०—जा तर आतां—स्वस्थ झोंप घे. उद्यां सकाळीं आपण या गोष्टीचा विचार करूं. भिऊं नकोस. माझा जीव आहे तोंपर्यंत मी माझ्या पोराबाळांस अंतर देणार नाहीं. माझ्या मागें त्यांचें नशीब! (काशीबाई व बेनाबाई आंत जातात.)

सुं०—(उसासा टाकून) झाली आतां कमाल झाली! आहेत तेवढीं दुःखें कमी होतीं! आपल्यापाठीं दैव हात धुवून लागलें आहे यांत संशय नाहीं! छेः यांतून मी पार कसचा पडतों! सर्वस्वीच नाश झाला! इतकी उचापत करून एकदाचं लग्न लावून दिलं, त्याचे हे असे सोहळे!! (एकाएकीं छातींत वेदना झाल्यामुळें) आई-आई-मरतों रे–मरतों-आई—(बेशुद्ध होऊन पडतो.)


(आंतून सर्व मंडळी धांवत येते व सुंदररावासभोंवतीं उभी रहाते.)

का०—(रडत रडत) हाय! हाय! देवा हें आणखी काय?

बे०—(रडत रडत) बाबा–बाबा–तुम्ही बोलत कां नाहीं?

बा०—(रडत) आई–बाबा असं हें काय करितात? त्यांनां काय झालं? (उपचार करितात.)

सुं०—(शुद्धीवर येऊन) अं–भिऊं नका. मी सावध आहें! अग तूं इकडून जाऊं नकोस. येथेंच उभी रहा. बेनू तूं ही येथेंच अस. माझ्या लाडक्या मुलांनों



सुं० * * आणि सरतेशेवटीं मी हुंडा मागण्याच्या दुष्ट चालीस बळी पडत आहें. (पृष्ठ ९१).

KUNTALINE PRESS, CALCUTTA.

या. मला एक वेळ भेटा. आतां मी एक दोन घटकांचा पाहुणा आहें असं मला वाटतं! ही पहा माझी जीभ कोरडी पडत चालली! हा पहा माझा ऊर भरत चालला! आतां मी तर चाललों! या जगांत जें कांहीं सुख ह्मणून भोगायाचं तें सर्व भोगलं. त्याचप्रमाणें शेवटीं शेवटीं दुःखही पुष्कळ अनुभवलें. माझ्या दुःखाबद्दल मला एवढें वाईट वाटत नाहीं. परंतु या माझ्या बायकोचें व या दीन मुलांचें माझ्या पाठीं मागें काय होईल याची मला मोठी चिंता पडली आहे. अग तुझ्याकरितां तसेंच या अनाथ मुलांकरितां मी कांहींच तजवीज करून ठेविली नाहीं हें पाहून मला फार दुःख होतें. पण त्यांत माझा कोणत्याही रीतीनें अपराध नाहीं हें तुह्मी जाणत आहांच. एक वर्षापूर्वीं मी चांगला ज्वान होतों; परंतु संसाराच्या व कर्जाच्या काळजीनें मी थोड्या काळांतच ह्मातारा होऊन गेलों! आणि सरतेशेवटीं मी हुंडा मागण्याच्या दुष्ट चालीस बळी पडत आहें. माझा सर्व प्रकारें नाश होण्यास हीच चाल कारण! असो ईश्वराची इच्छा! त्याच्या इच्छेप्रमाणें व्हावयाचें तें झालें. या माझ्या दुःख-परिणामक चरित्रापासून तरी आमच्या जातींतील लोकांचे डोळे उघडावे व असे दुःखदायक परिणाम होऊं न देण्याविषयीं त्यांनीं उपाय योजावे हें मी ईश्वरापाशीं मागून घेतों. असो. माझ्यानें आतां विशेष बोलवत नाहीं. शक्ति नाहीं. माझे हातपाय थंड पडत चालले-आतां माझें तुम्हांस एवढेंच सांगणें आहे कीं—(कांहीं वेळ स्तब्ध रहातो.) अग-मी तर आतां तुह्मांस सोडून चाललों! माझ्यानंतर या माझ्या लाडक्या परंतु अनाथ मुलांचा सांभाळ कर! त्यांस अंतर देऊं नकोस. बेनूस पूर्ण क्षमा कर. तिनें पोरबुद्धीनें केलेला अपराध आपण जर पोटांत न घातला तर मग तिनें दुसऱ्या कोणाकडे पहावें? दुर्दैवें-करून तिला नवऱ्यापासून असावें तसें सुख नाहीं. तर तिला तुझ्याकडून तरी सुख मिळों दे. बेनू, तुला विशेष तें काय सांगावयाचें आहे! तूं शहाणी आहेस. कांहीं दिवस येथें राहून मग तूं आपल्या सासरीं जाऊन रहा. तुझें कल्याण होईल. तुझा नवरा सुधरेल हा माझा तुला आशीर्वाद आहे! या वेळीं तुला देण्यासारखें माझ्याजवळ हेंच! आहा! माझ्या लहानग्या बाळा! तुझी काय अवस्था होईल? ये बेटा-मजजवळ ये. (रडतो.)

बा०—बाबा-तुह्मी रडतां कां? तुह्मी असें काय ह्मणतां? तुह्मी कोठें चाललेत?

सुं०—बाळा-मी-आतां तुह्मां सर्वांस सोडून–देवाच्या घरीं जात आहें-तुझा सांभाळ यापुढें तुझी–आ–आई–क–रील. मला–आ–आ–णखी–आ–आ–युष्य–असतें–तर–(छातींत वेदना येते.) अग–आई–मा–मा–माझ्यानें–आतां–बोल-वत–ना–नाहीं. मी–म–म–मरतों. उ–उगी–रडूं–न–नको–बे–बेनू–उ–उगीर–र–र–रा–रा–राम. (प्राण सोडतो.)

[अंक २ रा समाप्त.]

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

(स्थल—सुंदररावाचें घर.)

(काशीबाई आंतल्या खोलींत स्वयंपाक करीत आहे. बेनाबाई एका कोचावर वाचीत बसली आहे. इतक्यांत कापडवाला चिंतोपंत येतो.)

चिं०—(बाहेरून) आंत कोणी आहे काय?

बे०—कोण आहे?

चिं०—(बाहेरून) मी चिंतोपंत कापडवाला. आंत येऊं का?

बे०—थांबा, दरवाजा उघडतें. (दरवाजा उघडून आंत चिंतोपंतास घेते.) बसा. आई स्वयंपाक करीत आहे. आई—

का०—(आंतून) कोणग बेनू?

बे०—आई, ते चिंतोपंत आले आहेत.

का०—(आंतूनच) त्यांनां सांग आज तुम्ही जा. व पुढल्या आदितवारीं या.

चिं०—(अंमळ रागावून) हें काय बरं असं काशीबाई? पैसे द्यावयाचे असतील तर द्या; नाहीं तर नाहीं ह्मणून सांगा. धर्म केला असें समजून स्वस्थ बसेन. उगीच हे धक्के कशाला देतां?

का०—(बाहेर येऊन) चिंतोपंत, कांहो तुह्मी सगळे माझ्या गरीबाच्या पाठीमागें असे लागलां आहां? तुह्मीच पहा, त्यांनीं एक अरदी तरीं पाठीमागें ठेविली आहे काय? आतां हें त्यांचं सगळं कर्ज मी देऊं तरी कोठून? (बेनूस) जाग बेनू, थोडेसे त्यांतले तांदूळ निसून ठेव. (बेनू आंत जाते.)

चिं०—बाई, तें सर्व खरें; पण आह्मीं जो माल दिला त्याचे पैसे नकोत का आह्मांला? काशीबाई, आह्मी अशी सर्वांवर दया करीत बसलों तर आमचा धंदा कसा चालणार? तशांत, तुह्मी ह्मणतां तशी गोष्ट असलीच तर मग उगीच या उडवाउडवीच्या गोष्टी तरी कां सांगतां? विनाकारण आमच्यासारख्या

धंद्याच्या माणसास हेलपाटे तरी कशाला देतां? अहो एकदांचें नाहीं ह्मणा—ह्मणजे मिटली कटकट!

का०—मी त्याला काय करूं! माझा उपाय नाहीं. माझ्याजवळ द्यावयास नाहीं, तर मी देऊं तरी कोठून?

चिं०—हें पहा काशीबाई, मी माझी रकम एकदमच मागत नाहीं. दर महिन्याचे महिन्यास पांच पांच रुपये जरी दिलेत, तरी एक वर्षांत सगळी रकम फिटून जाईल.

का०—असे कितीजणांनां तरी पांच पांच रुपये देऊं? चिंतोपंत, तुह्मी एकटेच मागणारे आहां काय? पहा चिंतोपंत, या सर्व गोष्टीचा विचार करा. तुह्मांलाही मुलेंबाळें असतील. माझ्यावर दया करा व असेच कांहीं दिवस थांबा. मी कांहीं त्यांना होईल तोंपर्यंत नरकांत जाऊं देणार नाहीं. पुढें ईश्वराची मर्जी.

चिं०—(नाखुशीनें) बरं तर. मीं आतां जातों. पण पुष्कळ दिवस लावूं नका म्हणजे झालें— (चिं. जातो.)

का०—इतकं समजावून सांगितलं तरी ह्मणे पुष्कळ दिवस लावूं नका. त्याला तरी काय ह्मणून दोष द्यावा! आपलंच दुर्दैव—दुसरं काय—

(इतक्यांत भाडेवाला परदेशी येतो.)

प०—क्यौं काशीबाई—

का०—कायरे बाबा-तूं आज कां आलास?

प०—क्या पुछते हो-तूं आज कां आलास?—उघराणी करनेकु आया. और क्या. बाई, सेठ बोला आज दस महिनेका भाडा चढगया है सो जलदी निकाल करना.

का०—बाबा, शेटनां सांग, आतां फार दिवस भाडें ठेवीत नाहीं. भिऊं नका.

प०—क्या 'भिऊं नका. भिऊं नका.' पैसा देनेकी ताकद नही तो कायकु इतनी भारी जगामें रेहेते हो? जगा खाली करो. चालीमें जाकर रेहो.

का०—बोल—बाबा—बोल. ते असतांना तुझ्या शेठची बोलण्याची ताकद नव्हती—तो तूं नोकर आज मला असा टाकून बोलतोस.

प०—नही बोलेगा तो क्या करेंगा? अमारा शेठ धरम करनेकु नहीं बैठा. शेठ बोले भाडेका निकाल करो–नही तो टांच लगाकर सब सामान लेकर जाएंगे.

का०—अरे देवा हें आणखी काय! बाबा, शेठला सांग माझीतर अशी स्थिति आहे. यावर तुला बरें दिसेल तें कर. जा, जीं कांहीं भांडीं कुंडीं व या दोन चार जिनसा आहेत त्या जा घेऊन. जा, नव्याण्णव तेथें पुरे शंभर!

प०—अच्छा! अच्छा! पन दुसरे महीनेसे घर जरूर खाली करना-समजा–नही तो जुल्मसे—

का०—जा–बाबा–जा. नको दु:खावर डाग देऊं. (परदेशी जातो.)

(बाळा पाकीट हातांत घेऊन शाळेंतून परत येतो.)

बा०—(पाकीट खालीं ठेऊन) आ-आई-मला भूक लागली-कांहीं खायाला दे.

का०—(जवळ घेऊन) काय बाळा देऊं तुला खायाला! ती सकाळची भात शाक ठेविली आहे ती खा. जा बच्चा.

बा०—हं हं–ती नको मला. मला साखरपाला पाहिजे. आमचे शाळेंतला तो जयकर कसा साखरपाला घेऊन येतो शाळेंत–तसा दे. आणि आई, बाबा होते तेव्हां कसे चांगले गरम गरम खाकरे करून घालीत होतीस–तसे कां नाहीं आतां करीत?

का०—अरे! अरे! आतां या बाळास मी काय सांगूं? बाळा, आजचा दिवस तर खा; उद्यां खचीत तुझ्यासाठीं साखरपाला करून ठेवीन बरं.

बा०—पण आई, मला तें इतिहासाचें बुक नाहीं अजून दिलंसग? आज बूक नव्हतं ह्मणून मास्तरनीं लास्ट नंबर दिला व दोन छड्या मारल्या.

का०—हाय! हाय! काय हे हाल! बरँ बाळा तुला तें पण उद्यां देईन हं. जा! खा जा! (बेनूस) बेनू–अग बेनू–बाळाला तो सकाळचा भात ठेवलय तो दे-अन–त्या मोठे वाडग्यांतली थोडीशी शाक दे. (बाळा जातो.)

का०—झालं आतां कमाल झाली! देवा! आतां मी काय तरी करूं! हे लांडगे एका पाठीमागें एक असे आले ह्मणजे माझें हृदय कसें फाटून जातें. यांचे पैसे कोठून तरी देऊं? सगळे बारा रुपये पेन्शन येणार. तें तरी त्यांना काय बुद्धि सुचली असेल ती असो, दोन वर्षांवरच घेतलें. तेंही नसतें तर झोळी घेऊन दारोदार भीक मागण्याचा प्रसंग आला असता. पण

तेवढ्यांतून माझा निभाव कसा लागणार! भाडें, खाण्याचा खर्च, बाळाची फी, बुकांचे पैसे, हें सगळें त्यांतच कसें होणार? शिवाय त्यांचे मरणाकरितां काढलेलें कर्ज तेंही कसें फिटणार? काय करूं—आतां कोठें जाऊं? रिलीफफंडाची मदत मागूं? (विचार करून) काय! त्यांचें कुळ काय! त्यांचें नांव काय! माझ्या बापाचा लौकिक काय! असे माझे सासरचे व माहेरचे!—त्यांची मी काशीबाई—धर्माच्या फंडाची मदत—हें जळकं पोट पेटवण्याकरितां मागूं? नको—नको—देवा असा वेळ आणूं नको. (विचार करून) पण तसं न केलं तर पुढली वाट काय? मला माझ्या स्वतःविषयीं पर्वा नाहीं. मी एकटी असतें, तर खुशाल कोठेंही मोलमजुरी करून पोट भरतें—पण बाळ्याचं कसं होईल! त्याच्या शाळेची फी व बुकांचे पैसे व आजपर्यंत त्यानें भोगलेलं सुख मी त्यास कसं देऊं? त्याच्या शिकण्याकरितां रिलीफफंडांतून सोय होण्यासारखी नाहीं काय? बारा रुपड्यांत मीठभाकर खाऊन कसं तरी पोट जाळीन. तसाच प्रसंग आला तर शिवणकाम करूनही त्यांत भर घालीन; पण रिलीफफंडाच्या मदतीनें जर बाळ्यास चांगली विद्या मिळाली व पुढें तो नांवालौकिकास आला तर अजूनही मला पुढें सुख मिळणार नाहीं काय? आमची नुसतीं पोटें भरण्यापेक्षां त्या फंडाचा उपयोग बाळ्यासारख्या निराश्रित मुलांस विद्याभ्यास करण्याच्या कामांत मदत करण्याकडे केला तर किती बरं चांगलं होईल! व त्या योगानें, शिकण्यास उत्सुक, परंतु पैसा नसल्यामुळें ज्यांस विद्याभ्यास करतां येत नाहीं, अशां किती तरी मुलांस विद्यादान दिल्याचें श्रेय रिलीफफंडवाल्यांस मिळणार आहे बरं? पण असं होईल का? प्रयत्न तर करून पहावा! पुढें लाज राखणार परमेश्वर आहे! (का० जाते.)

प्रवेश २ रा.

(स्थल—खंडेरावाचें घर.)

[खंडेराव व धाकलाभाई.]

खं०—अरेपण, मीजुन तुला एक वखत सांगितलंन का माजे जवळुन तुला एक अरदीपण नाय मिळाची म्हणुन? चालला विलायतला! मोटा गवंडरचा नातु पडलास कां नाय!

धा०—मग तुमचे जवळ इतका पैसा असून काय कामाचा! तुमच्यापेक्षां गरीब असतात ते देखील पाठवितात आपल्या मुलांना विलायतेस.

खं०—माजे जवळ पैसा? नायरे बा! पण बाबा माजे, तूं विलायतला जाऊन जास्त ते का कराचा होतास?

धा०—मला ब्यारिस्टर व्हावयाचं आहे.

खं०—अवडच न? मग इकडे नाय का बालिस्टर होता येत? अन बालिस्टर होऊन तरी का कराचं? रोब घालून कोरटामदी माशा मारीत बसाच तेच का नाय? हे बग धाकलाभाय, पुष्कळ झाला अभ्यास. आत एकादी चाकरी बिकरी बगा. लगीन बिगीन करून खुशाल संसार कराचा ते सोडून चालला विलायतला! वेडा कोठचा!

धा०—नाहीं-नाहीं-तुह्मी पाठवाच मला—

खं०—वेडा हायस तूं. कोठें चाललास विलायतला? तिकडे धरम नाच काय नाय. त्या मलेंछांचे हातच खावाच. छेः मला नाय ते पसंत.

धा०—अंः त्याच्यांत काय झालं? सगळंच कसं साधतं! आणि तशांत कांहीं धर्म अधर्म होईल त्याबद्दल आल्यावर प्रायश्चित्त घेतलं ह्मणजे झालं.

खं०—वाः वाः ते बर आपलं सोपं झालंय. सगळं कराव न मगशी लागावं देवपूजेला! तूं पण सध्याचे पोरांसारखा झालास का? पितान का नाय आपलीं पोरं इराण्याचे कड्चा च्या! पाव बिसकूट ते घरोघर झालीच! सोवळ ओवळ ते गेलच! लगनाचे जेवणान पण ओवळ्याशी बसाला लागले! गेली! गेली! असं करून आपले जातीची बरकत अगदी नायसी झाली! अन या भिकारी दशेला येऊन पोचलुं! नाय ते अगोदरचे लोकांनां कसी बरकत होती! अरे तुमी सगळा धरम बुडवाल-बुडवाल. धरम बुडाला! पोशाक पण सोडाला लागले! तुला पायजे का नाय शर्ट न पाटलून न बुट घालाला! जसा का सायबाचा पोर!

धा०—(हंसून) ह्मणजे, ड्रेसमध्यें देखील धर्म आहे वाटतं?

खं०—अरे हो! डरेसमंदी धरम नाय ह्मणून का झाल? पण आपला चांगला सोईचा, सोबणारा, जुने काळानचा, थोडे पैशान होणारा, भारकूम पोशाक

टाकून तो भिकारडा, छिछोर, बसतांना उठतांना अडचण करणारा पोशाक कणाला पायजे! या आमचे पोशाकान भारकुमपणा कसा येते! नांय ते तुमी, इफिमिनेट दिसता–इफिमिनेट!

धा०—तसं असेल! पण दादाजी मीं काढलेल्या गोष्टीचं कसं काय?

खं०—अरे कशाची गोष्ट घेऊन बसलयस! वेडा हायस तूं. हे बग, तूं या गोष्टीचा नाद दे अगदी सोड्रन. एक ते माजे जवळ पैसा नाय. त्यांन तिकडे जाण्यामदी मोठा अरथ हाय अस पण काय नाय. वालिसटर होवाचच असेल ते इकडे नायका होता येत? तो तेलंग विलायतला गेलता का? अरे तो जडज झाला–जडज! अन हे बग, माहीमदी कनाय तुज लगीन कराचा माजा विचार हाय.

धा०—अहो लग्न होईल पुढें. लग्नाची काय घाई आहे?

खं०—घाय नाय घाय नाय ते कव लगीन करणार? ह्मातारा झाल्यावर? वेडा कोठचा. हे बग धाकलावाय, तो विनायकराव चारशेर सोन न दुसरी सगळी रीत देवाला तयार हाय. सोकरी पण चांगली हाय हो! जशी बोरींनची कीड!

धा०—दादाजी मी तुह्मांला स्पष्ट सांगतों, मला तर एव्हां लग्न करणें नाहींच. म्हणून तुह्मी या भानगडींत पडूं नका. तशांत, हुंडा घेऊन तर मी कधींच लग्न करणार नाहीं! त्याविषयीं पाहिजे तर तुमचीच शपथ—

खं०—हं हं! धाकलावाय! हे तू का बोलतेस! सोड्रन घे वगु ती शपथ! अरे हे भिकेचे डोळे कसे होतान तुला! हुंडा नाय घेवाचा! मगशी तुमचे पोराबाळाचा खरच कोण चालवील? तुमाला का चाकऱ्या धंदे हान? गाढवांनो, या रिती आमी घेतो त्या आमचेसाठीं नाय घेत. तुमचेचसाठीं. तुमचे पोराबाळाचा खरच चालला पायजे न!

धा०—(मनांत) वाः कसं जस्टीफाय् करिताहेत! (उघड) हें पहा दादाजी, जर तुम्ही म्हणतां तसी गोष्ट खरी आहे, तर मुलास चाकरी लागून त्यास स्वतांच्या बायकोचें व मुलाबाळांचीं पोटें भरण्यास शक्ति येईल तोंपर्यंत अविवाहित कां ठेवीत नाहीं? लग्न करण्याची घाई कां करतां? तसं झालं तर मग त्याच्या बापावर त्यांच्या उदरपोषणांचा बोजा पडणार नाहीं. व मग हुंडा घेण्याचें कारणही रहाणार नाहीं.

खं०—(रागानें) अरे जा जा–माला ह्मातार्‍याला अवडासा पोर शिकवाला आला! बाब्या चार पायीं उतरला! हुंडा घेवाचा नाय! तुजे सोकर्‍याचे वेळीं नको घेव पायजे ते! मी कध्धीं घेतल्याबगर रावाचा नाय!

(जातो.)

धा०—दादाजींनीं तर मला दोन्ही बाजूंनीं अडवून धरलं. विलायतेस तर जाऊं देत नाहींत व येथेंही स्वस्थ राहूं देत नाहींत! माझ्या इच्छेविरुद्ध चोपून हुंडा घेऊन व माझा विक्रय करून माझें लग्न यंदाच करून टाकण्याचा त्यांचा निश्चय झाला आहे असें दिसतें! मीं कितीही सांगितलें तरी हे माझें ह्मणणें ऐकतील असं मला वाटत नाहीं! ठीक आहे तर! माझाही निश्चय झाला! विलायतेस तर जावयाचं. व लग्नही टाळावयाचं. चला–त्याच विचारास ताबडतोब लागलं पाहिजे. लग्नाची तयारी चालण्याचीं चिन्हें तर दिसूं लागलीं आहेत. हं. होऊं द्या लग्नाची कडेकोट तयारी! आपणही आपली तयारी करावी! (जातो.)

प्रवेश ३ रा.

(खंडेरावाचें घर.)

(मंडपांत पुण्याहवाचनाचें साहित्य मांडण्यांत कांहीं ब्राह्मण गुंतले आहेत.)

व्यंकय्या०—कृष्णंभटजी, तो गंध उगाळून ठेवला?

कृष्णंभट—हो! त्या कंचोळ्यांत देखील घालून ठेवलें.

व्यंकय्या०—अहो, ते होमाचा ब्राह्मण अजून नाहीं आला?

कृष्णंभट—येतील. पुष्कळ वेळ आहे अजून. यजमान कोठें तयार आहेत!

व्यंकय्या०—अहो त्यांनां बरोबर सात वाजतां बोलावला! पण अजून ठिकाण नाहीं. आठ वाजून गेला. काय मस्करी करतो. आपणांस वेळ नसतो तर कबूल कशाला करतो? साफ नाहीं कां नाहीं सांगतो. तुमचा दक्षणी ब्राह्मण असाच! बोलावल्या वेळेस कध्धी नाहीं येतो.

कृष्णंभट—आणि तुमचा तेलंगु ब्राह्मण मात्र वेळेवर येतो. हं?

(इतक्यांत आंतून खंडेराव पीतांबर वगैरे नेसून येतात.)

खं०—कसं का भटजी, कोठपर्यंत आलं ?

व्यंकय्या०—हं आमचा तयारी आहे. तुमचाच खोटी असतो.

खं०—का बोलतां आमची खोटी ? अवो ! सुवेर येवाची भिती हाय, लवकर आटपाचं ह्मणून पहाटेस या, असं सांगतां सांगतां माजं तोंड पण दुखलं; पण सात वाजले तरी कोणी एकाजुन पण तोंड दाखवलं नाय. आले बाजीरावासारखे सात वाजल्यावरती–तंबाखु चावीत चावीत. (एका भटास) अवो भटजी, हा वेळ पान खावाचा का ? अवो हे तोंड हाय का तोबरा हाय ? टाका थुकून बगु पान सुपारी ती–टाका–(भट पानसुपारी थुंकून येतो.)

व्यंकय्या०—पण दादाजी आमचा काय यांत वाक असतो ? तुमचा उपाध्या आह्मांला वर्दी देतो त्याप्रमाणें आह्मी येतों.

खं०— तुमी सगळे सारखे ! तुमाला यजमानाची परवा कोठें हाय ! ते आमचे उपाध्ये अजून कोठें आल्यात ? येतील सगंळ आटपल्यावरती. बर चला, तिला बोलावा लवकर—

व्यंकय्या०—कृष्णंभटजी–आंतोन दादीबाईस बोलावतो-जलदी जातो.

(कृ० जातो.)

खं०—अरे ही अजून का करतय ? अन तो धाकलाभाय तरी कोठें हाय ? जा बगु तुमी व्यंकय्या. तुमचे वगर काम होवाच नाय.

व्यंकय्या०—(धांदलीनें) हे आह्मी चालले–आतां घेऊन येतो.

(व्यंक० जातो.)

खं०—(कांहीं वेळानें) अरे हीं येतान का नाय ? व्यंकय्या–व्यंकय्या—

(व्यंकय्या धावऱ्या धावऱ्या येतो.)

खं०—का व्यंकय्या, हे हाय तरी का ?

व्यंकय्या०—(कानांवर हात ठेवून) आपणांला कांहीं नाहीं समजतो. दादीबाई घाबरतो. सर्व इकडून तिकडे धांवतो ! फार गडबड होऊन जातो ! ते पहा सर्व इकडेच येतो—(सोनाबाई इत्यादि मंडळी येते.)

खं०—का ? हाय का ? अवडी गडबड कणाची ?

सो०—का सांगूं माझं कपाळ! (दागिन्यांची पेटी पुढें टाकून)—या पेटीनचे दागिने सगळे गेले!

खं०—म्हणजे? पेटींन दागिने नाय? अग वेडी हायस, कोठे दुसरे पेटींन बिटींन ठेवलसशील–जा–शोध जा–तुला विसर म्हणजे का देवाचे घरचा!

सो०—अवो नाय वो! याच पेटींन काल ठेवलते.

खं०—मग पेटीनच असतील ते. जातील कोठें? आण बगु पेटी इकडे. (खंडेराव पेटी उलथून पालथून पाहतो.) पेटींन ते नाय! मग दागिने गेले कोठे? अग–दागिने गेले कोठे?

सो०—तें मी का सांगूं!

खं०—तूं नाय सांगणार ते कोण सांगील? माझा बाप? अग प्रण सगळं देसक बगितलस का? ठेवलसशील डावे हाताशी कोठेंतरी!

सो०—अवो नाय वो, सगळं देसक शोधून बगीतल. बगाच काय पण बाकी ठेवल नाय!

खं०—बगाच काय पण ठेवल नाय! अरे ये शामराव बघतेस का? आण पोलीसला बोलावून. तोंड का बगता तुमी?

(इतक्यांत वामनराव आंतून येतो.)

वा०—दादाजी—हें घ्या धाकलभायचं पत्र. वाचा—

खं०—अरे आज तुमची सगळ्यानची अक्कल गेली तरी कोठें? धाकलाभायच पत्र माला वाचाला देतेस? दे त्याला नेऊन.

वा०—अहो तसं नाहीं हो. हें पत्र धाकलभायनें तुम्हांला लिहिलंय.

खं०—म्हणजे–तो कोठें हाय?

सो०—त्याला सकाळपासून चोखळवण्यासाठीं सोधतान पण तो हाय कोठे! कोठे गेलय कोणाला खबर!

खं०—आण कोठें हाय तें पत्र बगु. (पत्र घेतो व उघडून वाचतो.) घात झाला! अग घरानचाच चोर! या धाकल्याजुन माजा गळा कापला! अग ये–तो तुजा कारटा–सगळे दागिने बिगीने घेऊन विलायतला गेला. अरे! अरे! का करूं? आणारे माजे कपडे, मी आतं जातय त्याचे मगारी! आणतय त्याला मुसक्या बांधून. कायरे? कपडे आणतां का नाय?

शा०—पण दादाजी काय आहे तें आम्हांला सांगाल तर खरं.

खं०—अरे तुमांला पोरांनां का सांगाचं? (पत्र फेंकून) वाच हें पत्र.

शा०—(पत्र वाचून) मग आतां त्याच्या पाठीमागें कसे जाणार? त्याची आगबोट सकाळींच हांकारली असेल—

खं०—बस्स बोलला! विघ्नसंतोषी कोठचा! तुमाला मोठ्या मोठ्या गोष्टी कराला सांगा. गाढव एक उपयोगी पडासारखा नाय—तुमाला काय! गेलं तर माजं गेलं. तुमचं काय गेलं! तुमी मजा बगाला तयारच! काय करूं रे! पोलीसला रपोट करून आणवूं पकडून त्याला?

सो०—(घावरून) नको नको—तवढ नको करूं. माजे दागिने गेले तरी पतकरले पण तसं काय नको करूं.

खं०—का, दागिने गेले तरी पतकरले? अग तूं सुद्धीवर हायसका? का बोलतेस? अग ते दागिने तूं कमावाला गेलतीस का? मोठी शाणी!

वा०—पण दादाजी आतां उगीच डोकं तापवून जिवाला त्रास करून घेण्यांत काय अर्थ आहे? जाऊं द्या! दागिने गेल्यानें आपलं दैव तर गेलं नाहींना?

खं०—अरे दैवाची का गोष्ट सांगतेस! त्या दागिन्यांबरोबर माजा प्राण—माजा जीव गेला—माजा जीव!

वा०—अहो पण आतां बोलून काय उपयोग?

खं०—अग पण पेटींन का का दागिने होते?

सो०—माझे दिडाशेराचे तोडे—दोन शेरांची वेळ—बारा तोळ्याचं गाठलं अन समोरचे गंगाबायचे दीडा शेराचे वाळे.

खं०—(घाबरून)अं—गंगाबायचे वाळे? झाला! माजा सर्वस्वी नास झाला! अग हे आतां भरून देव कोठून? घरांनचे ते घरांनचे जाऊन हा वरती दंड! अग, त्या धाकल्याचं तूं सदा सत घालततीस न? अग, तो तुजे गळ्यांनचा ताईत होतानं? मगशी हें कसं केलं त्याजुन?

सो०—त्याचे मनांनचं माला का खबर! मी बिचारी भोळी! माला त्याचे मनांन अवढ कपट होतं हें खबर असतं तर लगीन कशाला उभारलसतं? झाली आतां फजिती सगळेपरी!

खं०—अग फजितीची कोणाला परवा हाय? पण हा दंड कसा भरूं?

अं—काय करूं रे!

शा०—दादाजी आतां झाली गोष्ट परत येत नाहीं–तुह्मी स्वस्थ बसा!

खं०—अरे, माजे आंगाची होळी चाललय अन स्वस्थ बसा, स्वस्थ बसा, ह्मणून का सांगतयस! बरोबरच हाय! 'आंगा वेगळा घाय-त्याच तुला काय!'

शा०—असं काय ह्मणतां दादाजी? अहो हा जो तोटा झाला तो आमचा देखील नाहीं का झाला? आह्मांला त्याबद्दल कांहींच का वाईट वाटत नसेल?

खं०—बरं! वरं! चला आतां इकडशी. इकडेच राहून काय होणार? याची कशी का तजवीज कराची त्याचा विचार केला पायजे!

(इतक्यांत गलासवाला **कासम** आंत येतो.)

कासम०—दादाजी–उद्याला किती गलास लागतील? आज पाचसे तयार केल्यात. दोन झुंबर लावाचे न?

खं०—(रागानें) फेकून दे ती तुजी गलास. आग लाव त्यांना!

शा०—(गलासवाल्यास बाजूस बोलावून) तूं आतां बाहेर जा. मग मी तुला सर्व सांगतों. (गलासवाला जातो.)

(गाडीवाला येतो.)

गा०—शेठ, ही चिठी दामोदर शेठनी दिलय. एक गाडी भरून नारळ आणल्यात. हेल तुमापासन घेन्यासनी सांगीतलय. नारळ कोठे टाकायचे?

खं०—(संतापानें) टाक भरतींत नेऊन ते नारळ! अरेरे! हा सगळा खरच बोकांडी बसला! अरे धाकल्या, तुला लगीन नव्हतं कराचं तर अगोदरशीच का नाय उघड सांगितलंस? सगळी तयारी झाल्यावरती न अवढा खरच केल्यावरती असा दगा दिलास! बुडलुं-मी साफ वुडलुं! अरे–मी जळ्ळुं–मी पेटलुं! अरे–माजं सोनं–माजं सोनं!! (दादाजीस सर्व मंडळी समजवून आंत घेऊन जातात.)

(कृष्णंभट इत्यादि ब्राह्मण इकडून थोडें तिकडून थोडें याप्रमाणें सामान घेऊन धोत्रांत बांधूं पहातात. त्यांस व्यंकय्या तसें करूं देत नाहीं. शेवटीं तसेच सर्व ब्राह्मण जातात. ते गेल्यावर–)

व्यंकय्या०—काय हरामखोर हा लोक असतो! जरा गोंधळ झाला-लागला लुटायला! बापाचा माल ! पण हा व्यंकय्या असतो तो असा करूं देतो? कध्धीं नाहीं ! यजमानाचा सदा कल्याण इच्छितो ! विश्वासघात कध्धीं नाहीं करतो-हं ! (जातो.)

प्रवेश ४ था.

[रंगी नायकिणीचें घर.]

रंगी—(कांहीं वेळ हारमोनियम वाजवून) आठ वाजले तरी शामरावाची स्वारी अजून कां बरें आली नाहीं? ह्मटलं असतां ते यापूर्वी यावयाचे. मंगेश देखील अजून आला नाहीं. सोनाराकडे चौकशी करायाला ह्मणून पाठविला त्याला इतका वेळ तो कशाला लागावा? त्या मंगेशाला जरा कोठें बाहेर पाठविला ह्मणजे तो लौकर ह्मणून कध्धीं परत यावयाचा नाहीं. शामराव यावयाच्यापूर्वी येईल तर बरं होईल. ह्मणजे आजचे आजच निकाल करायला चांगलं. नाहीं तर उद्यांवर गेलं. काय चमत्कार आहे! आज सतत तीन महिने झाले. शामरावां-कडून तोडे मागतें-पण आज देतों-उद्यां देतों-सोनाराला सोनें आणून दिलें आहे-अशा थापांवर थापा मारताहेत. पण मला तर वाटतं कीं ही सगळी उड-वाउडवीची गोष्ट आहे. शामरावाला ह्मणावं कीं तूंच आपल्या आईचं दूध प्याला आहेस असं समजूं नकोस. मी कांहीं अगदींच भोळी नाहीं. माझ्या मनांत केव्हांच संशय येऊन चुकला आहे-व त्याविषयीं खुलासा करण्याकरितां मंगे-शाला सोनाराकडे देखील पाठविला आहे. दिलं असलं तर ठीक. पण जर का तसं नसलं तर मग एका घावानें दोन तुकडे. मला काय वाण! जोंपर्यंत यौव-नाचा भर आहे तोंपर्यंत हजारों लोक माझ्या पायाशीं लोळतील ! आणि शामरा-वाशीं संबंध तोडून टाकावा हेंच बरं-अलीकडे त्याला पैशाची ओढ लागलीशी दिसते. पगारही वेळेवर पोहोंचत नाहीं-तर अशाशीं आतां संबंध ठेऊन मला काय लाभ ! चला आजपर्यंत त्याच्याकडून मिळालें तेवढें खरें-आतां जास्ती मिळण्याची आशा नको! तर त्याला सोडून एखादा पैसेवाला पाहिला पाहिजे !

पाहायाला कशाला? तो जमनादास शेठ माझ्याकडून हो मिळण्याची खोटी कीं आलाच पायां पडत! ठीक तर हाच विचार नक्की! (मंगेश येतो.) कायरे मंगेशा, तूं केव्हांचा गेला होतास! एवढा वेळ तो कशाला लागला? येथून ढेंगभर देखील जायाचं नव्हतं.

मंगेश.—ताई, तुझी की नाहीं सगळ्या कामांत उतावळ. अग येथून जायाला ढेंगभर नव्हतं पण तो सोनार दुकानावर मिळेल तेव्हां ना! तो गेला होता बाहेर. आला तेव्हां विचारून आलों.

रं०—अरे आज सोनार नव्हता दुकानावर. पण तुला केव्हांही कामाला पाठविलं म्हणजे असंच.

मं०—बरं तर असंच तर असंच. पुन्हा नको पाठवूं पाहिजे तर. मला तर या कामाचा कंटाळा आला! घटकाभर मला स्वस्थ बसूं देत नाहींस! हें कर–तें कर–इकडे जा–तिकडे जा–यांतच माझा सारा दिवस जातो.

रं०—बरं पण त्या सोनारानें काय सांगितलं?

मं०—सोनाराजवळ सोनं बिनं कांहीं दिलं नाहीं.

रं०—हं. ठीक आहे तर. शामरावजींनां ह्मणावं पहा आतां तुमची मजा!

मं०—म्हणजे ग?

रं०—ह्मणजे तेंच. मला शामरावाची सोबत नको!

मं०—काय ह्मणतेस? त्याची सोबत नको? आणि ती काय ह्मणून?

रं०—काय ह्मणून काय विचारतोस? तुला समजत नाहीं! त्याच्याबरोबर मीही भिकारी होऊं का?

मं०—छेः! छेः! ताई हें तुला शोभत नाहीं. ज्यानें आज दिवसपर्यंत तुला एवडा ऐवज करून दिला, जो तुझ्यासाठीं एवढा जीव टाकतो–त्याच्याशीं असा बेइमानपणा करणें ठीक नाहीं. असेल सध्यां त्याचा हात ओढींत. आज नाहीं उद्यां–देईल करून–त्यांत काय!

रं०—अरे आहे तें सगळं त्यांतच आहे. हें पहा, आमच्या सारख्यांना काय. जो दागदागिने–कपडालत्ता–पैसाटका भरपूर देईल त्याच्या आम्ही. अशा भुके कंगालाजवळ राहून काय करायचं! पुढें भीक मागायची! यांच्या बरोबर आपला काय जन्म निघायचा आहे! हे काय, यौवनाचा भर आहे तोंपर्यंतच हांजी हांजी

करतील. पुढें मग कोण विचारणार! आपला आपल्यालाच पुढला विचार नको का पहायाला ?

मं०—छेः ! ताई, जे विचार एखाद्या हलक्या खानदानीच्या वेश्येस देखील शोभणार नाहींत ते तुझ्यासारख्या अस्सल खानदानीच्या व प्रत्यक्ष माझ्या वहिणीच्या तोंडून ऐकण्यास मला फारच वाईट वाटतं. अग आज सहा वर्षं ज्यानें एवढा पैसा खर्चून–स्वतांच्या अब्रूची नासाडी करून–तुझ्यावरोबर सोबत टेविली त्याचा त्याला अशा रीतीनें मोबदला देणें मला तर अगदीं अयोग्य वाटतं.

रं०—त्यांत त्यानें मोठं नवल तें काय केलं ? व हें सर्व कांहीं माझ्या उपकारासाठीं केलं नाहीं. स्वतांच्या मजेसाठीं, व अशी मौज कांहीं मोफत मिळत नसते!

मं०—हें तुझें बोलणें ऐकून मला मोठें नवल वाटतें. व तुला माझी वहीण ह्मणण्यास देखील मला शरम वाटते. अग आपली खानदान केवढी अब्रूदार! अग तुझ्या आईनें वेश्येच्या कुटुंबांत जन्म मात्र घेतला परंतु मरेपर्यंत एका धन्याशिवाय दुसऱ्या कोणाकडे ढुंकून देखील पाहिलें नाहीं. तिचं वर्तन गरती स्त्रियांस देखील लाजविण्यासारखं होतं, समजलीस.

रं०—समजलं–समजलं–असंच करून शेवटीं मेली तेव्हां एक फुटकी कवडी देखील ठेविली नाहीं. केली धन्याची भर—

मं०—त्यांत काय वाईट केलं! ज्याचं घेतलं त्याला दिलं.

रं०—बरं! बरं! तिला बरं वाटलं तसं केलं तिनें–ह्मणून मीही तसं करावं असं नाहीं. तूं मला कांहीं ह्मण–मी पैशाची!

मं०—आग लाव त्या पैशाला. पैसा कांहीं बरोबर घेऊन जावयाचा नाहीं–अब्रू राहिली ह्मणजे झालं!

रं०—अरे कशाची अब्रू आणि कशाचं काय घेऊन वसला आहेस? बोलून चालून आह्मी वेश्या! आह्मांला अब्रू ती कसली आली!

मं०—ठीक तर. तुझा असाच जर विचार आहे तर मग काय! घे चैन मनासारखी भोगून! आज शामरावास सोडशील व तसाच दुसरा एखादा पैसेवाला पाहून त्याच्याशीं रहाशील. पण त्याच्याजवळ तरी कोठें तूं टिकणार आहेस?

त्याचा पैसा खलास झाला ह्मणजे तिसरा आणखी शोधशील! ठीक–ठीक–याप्रमाणें जन्मपर्यंत असंच रहाटगाडगं चालायचं.

रं०—बस! बस! फार शहाणा होऊं नकोस! मी माझ्या स्वतांची मालकीण आहें! तुझ्या नादीं लागून भीक नाहीं मागायची!

मं०—(मनांत) अंतीं तोच प्रसंग येणार! वेश्यांच्या धंद्यांत देखील इमान आहे. तें जिनें सोडलें तिचे हाल कुत्रा देखील खाणार नाहीं! (उघड) बरं तर. तुला जर माझ्या सांगण्याप्रमाणें ऐकायचं नसलं तर मग माझी तुझ्याजवळ राहून शोभा काय? मला हें असें कध्धीं सहन व्हावयाचं नाहीं. तुझे असे विचार पाहून माझें आतांच पित्त खवळून गेलें आहे, व माझ्यानें या डोळ्यांनीं असे चाळे कध्धीं पहावणार नाहींत. ह्मणून मी ह्मणतों मी आपला उद्यां गांवीं जातों. खुशाल शेतभाती करून तेथें राहीन! तूं इकडे मार हवी तशी चैन. पण ध्यानांत ठेव–करशील तसं भरशील.

रं०—बरं–बरं–जा! उद्यांबद्दल आजच कां जाईनास. (मं० जातो.)

(शामराव येतो. त्यास पाहून रंगी बाजूस टेवलाजवळ तोंड फिरवून उभी रहाते.)

शा०—(कोचावर बसून) रंगे–अहो रंगाजी–अहो रंगाजीराव–कां आज दूरच कां? या अशा बसा तरी येथें—

रं०—(दुरूनच) येतें हो थांबा. पण अगोदर ते तोडे आणलेत कीं नाहीं तें सांगा पाहूं.

शा०—(हंसून) हं! हं! तोडे का? हो हो. अहो, तुमच्यापेक्षां तोडे का जास्ती आहेत! एक सोडून पांच जोड येतील. हं! हं!

रं०—(मनांत) एकाची इतकी पंचाईत आणि रावसाहेब ह्मणतात पांच जोड! जरा गंमत तर करावी. मग आपल्याला जें काय करायचं तें शेवटीं आहेच! (उघड) हं खरंच. तुमच्या सारखे करून देणारे भेटले ह्मणजे मग आह्मांला वाण कशाची!

शा०—हं कसं बोललीस! पण काय ग अजून दुरून दुरूनच कां? जवळ नाहीं का यावयाचं?

रं०—पण कांहो ते तोडे कोठपर्यंत आले आहेत तरी? परवां ह्मणालेत कीं तास द्यावयाचा काय तो राहिला आहे—

शा०—हो. गाढव आळशी अगदीं–आज तीन दिवस झाले, अजून तास मारून होत नाहीं. गाढवाला काम उरकत नव्हतं तर पतकरलं कशाला ?

रं०—खरंच. या दुनियेंत अशींच पुष्कळ माणसं–काम करण्याची ताकद नसली तरी तें काम करण्याचं कबूल करून–थापांवर थापा देऊन लोकांना शेवटीं फसवितात !

शा०—(मनांत) हें इचं बोलणं मला लागून आहे वाटतं ? खरी गोष्ट तर इला समजली नाहींना ? छेः ! ती कशी समजणार ! तशांत समजली असती तर हें असं हास्यमुख दृष्टीस पडतं का ? तर हा संशय खोटा. (उघड) हो त्यानं तसं पूर्वींच सांगितलं असतं तर दिले असते दुसऱ्या कोणाजवळ–तो नाहीं तर त्याचे बाप हजार !

रं०—(मनांत) कशी बतलावणी चालली आहे ही ! तेवढ्या कामांत स्वारी हुशार खरी ! (उघड) पण तुह्मी तरी त्याच्या दुकानावर जायाचे होतेत. त्याच्या पाठीमागें लागल्याशिवाय तो कसचं काम करून देतो.

शा०—मग तुझ्या मनांत काय त्याचे दुकानीं मी गेलों नाहीं वाटतं ? वा ! अग रोज दोन तीन फेरे घातल्याशिवाय रहातों का ? हा आतां तेथूनच आलों.

रं०—(मनांत) शर्थ झाली ! पुरे झाला आतां विनोद. आतां खरं स्वरूप प्रगट करावं, दुसरं काय. (उघड) हें पहा शामराव, तुम्ही थट्टा सोडून द्या. खरं सांगा. त्या सोनाराकडे सोनं खरंच नेऊन दिलंत का ?

शा०—ह्मणजे यांत काय संशय ! अग मी स्वतां नेऊन दिलं–स्वतां—

रं०—हें पहा. तुह्मी उगीच लबाडी कशाला करतां ? मला खरी गोष्ट अगोदरच कळून चुकली आहे. तर आतां लबाडी करण्यांत हांशील काय—

शा०—(मनांत) माझा संशय शेवटीं खराच झाला ! इला खरी गोष्ट कळली यांत संशय नाहीं. आतां बतलावणी करून काय उपयोग ? खरं सांगितल्यानें डोकं तर उडवीत नाहीं. (उघड) हें पहा रंगे—(जवळ जाऊं लागतो.)

रं०—(दुरून) हं. हं. दुरून. जें कांहीं बोलायचं असेल तें दुरून बोला. जवळ यावयाची जरूरी नाहीं.

शा०—अग पण असं काय करतेस ? एवढा राग कां ? (जवळ जातो.)

रं०—एकदां सांगितलं ना कीं दुरून बोला ह्मणून ? हें काय निर्लज्जा-सारखं ?

शा०—हं हं ! हें काय असं–इतका राग–आणखी माझ्यावर !

रं०—ह्मणजे तुह्मी कोण मोठे आलेत बाजीराव !

शा०—रंगे—

रं०—खबरदार रंगे ह्मणाल तर–आजपासून मी तुह्मांला रंगी नाहीं.

शा०—वरं तर, रंगाजी ह्मणतों–झालं ?

रं०—कांहींही ह्मणा. मला त्याची बिलकूल पर्वा नाहीं.

शा०—अग पण ऐकशील तर खरी.

रं०—काय ऐकायचं आतां ? शंभर लबाड्या सांगितल्या त्यांत ही आणखी एक.

शा०—अग पण असं काय करतेस ? हा एवढा राग तोड्यांसाठींच ना ? हा-त्याच्या, तोडे काय हं हं ह्मणतां आणून देतों. मग तर झालं ना ?

रं०—मला तुमचे तोडे नकोत आणि कांहीं नको. झालं तेवढं पुरे झालं. मला आतां तुमचा संबंध नको—

शा०—हं हं ! हें काय ह्मणतेस ? छेः ! छेः ! असं कधीं होईल का ? आणि तेंही माझ्या रंगी–माझ्या रंगाजीच्या हातून ? कधीं नाहीं ! (हंसतो.)

रं०—(रागाचा आव आणून) दांत काढायाला शरम नाहीं वाटत ! चला व्हा येथून चालते ! जवळ पैसा नाहीं तर हे डौल पाहिजेत कशाला ! जा, तशीच एखादी भिकारडी पाहून तिच्या बरोबर चैन मारा ! माझ्या सारखीला ठेवायचं फुकटचं नाहीं !

शा०—तूं आज शुद्धीवर आहेस कीं—

रं०—मी चांगली शुद्धीवर आहें. तुह्मीच आले असाल दारू ठासून ! नाहींतर एवढें बोललें तरी लोचट मनुष्यासारखे येथें उभे राहिले नसतेत.

शा०—अग पण आज दिवसपर्यंत जें सर्व मी तुझ्यासाठीं केलें–दागदागिने दिले-स्वतांच्या बायकोस रिती करून तुझी भर केली–आईबाप-भाऊबंद यांची पर्वा न करितां व जनलज्जेची तिळमात्र भीति मनांत न बाळगतां तुझ्या ठायीं लंपट होऊन राहिलों त्याचा हा असा मोबदला तूं मला देणार काय ? पहा या गोष्टीचा नीट विचार केलास ?

रं०—अहो चला, विचार विचार कसचा घेऊन बसलेत! केलंत त्यांत नवल तें काय मोठं! स्वतांच्या आगीसाठीं केलंत! त्याचं मला काय?

शा०—अरे अरे! हें मी आज काय ऐकतों! अग, कालपर्यंत जी माझ्याशीं गोड गोड भाषणें करीत होती, जी 'तुमच्याशिवाय मला चैन पडत नाहीं' असें वारंवार ह्मणत होती, जी 'आपल्यावर माझें अतोनात प्रेम आहे' असें शपथा आणा घेऊन वरचेवर सांगत होती, जी 'तुमच्याबरोबर मी जन्मपर्यंत राहीन' अशीं वचनावर वचनें देत होती-ती तूंचना रंगे?

रं०—हो हो ती मीच! आमच्या धंद्याची ती एक खुबीच आहे. पुरुषास भुरळ पाडून-त्याच्याशीं गोड गोड बोलून-वर वर प्रेम दाखवून-त्याजवळ असेल नसेल तें सर्व काढून घेऊन-त्यास जी भुकेकंगाल न करील तिला वेश्या हें नांव कसें शोभेल? आतां तरी समजलेत कीं यापेक्षांही उघडपणें सांगूं?

शा०—नको! नको! पुरे झालें! पण रंगे-हें पहा—झाली गोष्ट विसरतां नाहीं का येत? पहा विचार कर-नको ग इतकी निष्ठुर होऊं. पहा माझ्याकडे तरी पहा!

रं०—पाहिलं-पाहिलं-चला जा येथून-माझ्या येथें पाय ठेवूं नका-खबरदार पुन्हा आलेत तर.

शा०—अग पण—

रं०—मुकाट्यानें जातां कीं नाहीं? कीं सर्वांसमोर शोभा करून घ्यावयाची आहे?

शा०—नको ग असं करूं-पहा—अग मी तुझा शामराव—

रं०—छेः तुह्मी बऱ्या बोलानें नाहीं जाणार! कोण आहेरे तिकडे?

शा०—नको! नको बोलावूं कोणाला! मीच आपला होऊन जातों. पण रंगे—

रं०—चल मेल्या-लोचट कोठचा-मेल्याजवळ फुटकी कवडीदिखील नाहीं आणि नायकीण ठेवायला पाहिजे! (सपात काढून) घे हें त्याचं बक्षीस—

(सपात उडविते. सपात लागून शामराव अडखळून पडतो. त्याबरोबर रंगी दुसरें सपात उडविण्यास पहाते. शामराव झपाट्यासारखा उठून खालीं उतरतो.)

प्रवेश ९ वा.

[स्थल.—रंगीच्या घरासमोरील रस्ता.]

(शामराव रंगीच्या घरांतून घाईघाईनें बाहेर पडतो.)

शा०—शेवटीं तिनें माझी अशी शोभा केली हं! अरे काय करूं रे! तिच्या नरडीचा घोट घ्यावासा वाटतो. माझ्या हातांत अधिकार असता तर त्या धगडीचं नाक कापून तिची धिंड काढली असती! काय करूं. या वेळीं जर का माझ्याजवळ कांहीं असतं तर आतांच जाऊन तिची चांगली खबर घेतली असती! मला सर्वस्वी नागवून शेवटीं तिनें माझी निर्भर्त्सना करून अशा रीतीनें हांकून दिलें. हं (पुढें चालून व विचार करून) पण तिचा तरी त्यांत काय वांक! मीच मूर्ख कीं तिच्या नादीं लागलों! (पुढें जाऊन व कांहीं वेळ विचार करून) उघडले—माझे डोळे साफ उघडले! रंगे, तूं माझ्या डोळ्यांत असें कांहीं जालम अंजन घातलेंस कीं त्या योगानें—माझ्या डोळ्यावर आजपर्यंत आलेला पडदा साफ उघडून मला निराळीच दृष्टि प्राप्त झाली आहे. कितीरे मी मूर्ख! हिच्या नादीं लागून मी माझ्या गरीब निरपराधी बायकोचा व्यर्थ छळ केला! नानातऱ्हेनें तिला दुखविलें. परंतु या दोघींमध्यें फरक पहा कसा तो! रंगीची मी इतकी भर केली तरी एवढ्याशा क्षुल्लक कारणावरून ती बेइमानी होऊन तिनें माझ्याशीं एका क्षणांत संबंध तोडून टाकला. पण तीच माझी बायको पहा! तिला सर्व रीतीनें त्रास देत असतांनाही व तिला माझ्याकडून कवडीचें सुख नसतां तिचा जीव माझ्यासाठीं रात्रंदिवस हळहळतच आहे! अहा! या खोट्या हिऱ्याच्या बाहेरील चकाकीलाच भुलून गेल्यामुळें त्या खऱ्या रत्नाची मला आजपर्यंत परीक्षा झाली नव्हती! किती तरी मी अधम! असो. झालें तेवढें पुरे झालें! दारू, जुगार व रंडीबाजी या व्यसनांत अगदीं गर्क होऊन मी आपली खराबी करून घेतली. पैशापरी पैसा घालवून अब्रूही गमाविली! व इतकेंही करून जिच्यावर माझा पूर्ण विश्वास तिनें माझा केंसानें गळा कापला! हर! हर! माझें निरंतर हित चिंतणारा माझा मित्र विश्वासराव याच्या सांगण्याकडे दुर्लक्ष्य करून जर मी निर्लज्जपणें या विषयांच्या आधीन झालों नसतों तर आजचा असा हा प्रसंग आला

असता काय ? पण आतां त्याविषयीं खेद करून काय उपयोग ! झाली गोष्ट परत येत नाहीं ! आतां पुढें तरी असल्या छंदांत न पडण्याची खबरदारी ठेविली पाहिजे. काय चमत्कार आहे पहा ! एवढ्याशा लहान वयांत केवढा हा पराक्रम ! बरं झालं ! ही एव्हांच ठेंच लागली ह्मणून बरं झालं. नाहीं तर एकदां का या व्यसनांनीं आपला पूर्ण पगडा मजवर बसविला असता—मग कोणत्या थरास गोष्ट गेली असती तें सांगतां येत नाहीं. खचीत त्यांनीं मला दुनियेंतून उठविलेंच असतें ! अहाहा ! परमेश्वरा ! तूं माझे लवकरच डोळे उघडलेस याबद्दल तुझे आभार मानावे तितके थोडेच ! असो. रात्र बरीच झाली. पहिल्यानें विश्वासरावाकडे जाऊन त्याला सर्व हकीकत सांगतों—व नंतर घरीं जाऊन तिचे पाय धरतों व झालेल्या अपराधाबद्दल क्षमा मागून पुढें नीट चालण्याविषयीं शपथ घेऊन टाकतों म्हणजे झालें ! अहाहा ! हें ऐकून तिला किती तरी आनंद होईल ! नाचेल—नाचेल—ती आनंदानें नाचेल !

(शामराव जातो.)

प्रवेश ६ वा.

[स्थल—खंडेरावाचें घर—शामरावाची खोली.]

(बेनाबाई खोलींत निजली आहे. शामराव आंत येतो.)

शा०—(बेनाबाईजवळ जाऊन) अग ए उठ—उठ—अशी आळशासारखी निजलीस काय ? किती वाजले ?

बे०—(उठून डोळे चोळीत उभी रहाते.) काय मेला हा तुमचा त्रास तरी ! बारा वाजायला आले—तुमचं ठिकाण नाहीं—वाट पाहून पाहून थकलें व निजून गेलें—जरा कोठेंसा डोळा लागला तों आला यांचा त्रास. बरं आलेत ते आलेत. आणखी कांहीं थाळी पिटायला पाहिजे नव्हती—

शा०—अग पण अशी चिडलीस कशाला ? मी तुला असा नेहमीं का उठवितों ?

बे०—तर मग आजच काय माझ्याशिवाय अडलं होतं? निजायचे होतेत खुशाल!

शा०—तूं किंनाही अलीकडेस माझ्यावर अशीच कारणाशिवाय ओरडतेस. कारण असो किंवा नसो. तुझ्याकडून कध्धीं ह्मणजे गोड शब्द मिळाला असं नाहीं.

बे०—अहाहा! काय बोलणं तरी! जसं काय कोणाला खरंच वाटेल! अग-बाई, माझ्या गोड शब्दाची गरज आहे कोणाला! गोड गोड शब्दांनीं मोहून टाकणाऱ्या त्या दुसऱ्याच. जा–जा. असीच कोणी तुमची वाट पहात बसली असेल! ऐका तिच्याकडून गोड शब्द पोट भरून—

शा०—अग पण तुझ्याकडून ऐकावयाची इच्छा झाली असली तर! तूं नाहींना बोलणार?

बे०—(मनांत) आज असा काय बरं रंग दिसतो? नेहमींची चर्या कांहीं दिसत नाहीं! आणि स्वारी आज रंगलेली देखील दिसत नाहीं. नाहींतर या वेळेला तोंडाला घाण घाण यावयाची. काय असेल तें असो! (उघड) हो! न बोलून कसं चालतं! आह्मी बोलून चालून बायकाच—पुरुष सांगतील त्याप्रमाणें निमूटपणें केलंच पाहिजे!

शा०—छेः छेः तसा मला जुलमाचा रामराम नको. मला तुझ्याकडून मनापासून दोन गोड शब्द ऐकावयाचे—

बे०—तेवढी मात्र आशा करूं नका—

शा०—तें कां बरं?

बे०—तें तुमच्याच मनाला विचारा—

शा०—अग पण तें कोणत्या मनाला विचारूं?

बे०—ह्मणजे? माणसाला दोन चार मनं असतात वाटतं?

शा०—तसं नाहींग–मन तर एकच–पण माणसाच्या मनाच्या स्थितीमध्यें कितीदां बरें पालट होतो? माझीच गोष्ट घेना! मी लहान असतांना माझ्या मनाची स्थिति कोणती होती–पुढें गेल्या सात आठ वर्षांत त्या स्थितींत पालट किती झाला—आणि तेंच मन आज कोणत्या स्थितींत आहे–केवढा फरक तुला सांगूं!

बे०—(मनांत) नशीबा! तुला माझी दया तर आली नाहीं ना? हें आज

मी काय ऐकतें ! हे मला आज कांहीं निराळेच वाटताहेत. खचीत यांच्या वृत्तींत कांहीं तरी पालट झाला यांत संशय नाहीं ! देवा ! माझा तर्क खरा होऊं दे ! (उघड) आज हें तुह्मीं काय मांडलं आहे ? मन काय–फरक काय–आहे तरी काय ? सांगा तरी एकदाचं.

शा०— (तिला जवळ घेऊन) अग तुला काय सांगूं ? तुझ्या हातांतून गेलेला शामराव तुला परत मिळाला याबद्दल तूं ईश्वराचे आभार मान. अरेरे–आज मला अशी कांहीं जबरदस्त ठेंच लागली कीं त्या ठेंचेच्या तिरमिरीनें आजपर्यंत माझ्या डोळ्यावर आलेला पडदा झटदिशी उडून माझे डोळे साफ उघडले—साफ—(तिच्या तोंडावर हात फिरवून) हर ! हर ! या तुझ्यासारख्या सद्गुणी स्त्रीचा अव्हेर करून मी त्या कृतघ्न, आपमतलबी व वरवरून प्रेम दाखवून केसानें गळा कापणाऱ्या कुलटेच्या नादीं लागलों–अरे ! अरे ! तुला आजपर्यंत मीं किती तरी त्रास दिला ! (गहिंवरून) मी अधम–अगदीं अधम—

वे०—अहो पण असं झालं तरी काय ?

शा०—आतां तुला सांगायला हरकत नाहीं. ती रंगी–अग त्या धगडीनें माझी शोभा करून मला घरांतून हांकून किंग लावलं ! अग नुसतं हांकून लावलं असतं तरी चिंता नव्हती, पण मला तिनें सपातानें—

वे०—(रागानें) काय ह्मणतां ? त्या अवदसेनें तुम्हांला सपातानें मारलं ! (बोटें मोडून) मेलीचे हात नाहीं जळून खाक झाले या सोन्यासारख्या शरीरास सपातानें मारतांना ! पाहूं पाहूं–कोठें मारलं तें. लागलं बिगलं नाहीं ना ? सांगा, मी तेल चोळतें—

शा०—अहाहा ! अशी कळकळ व काळजी यांची बाहेरच्या स्त्रियांकडून स्वप्नांत देखील आशा करणें व्यर्थ ! (उठून) नको–मी तुझ्या प्रीतीस बिलकूल पात्र नाहीं. या माझ्या पापी देहास हात लावून तूं आपला पवित्र हात विटाळं नकोस. मी जातों–जातों–माझं एकदाचं काळं करतों—

वे०—असं वेड्यासारखं काय करतां ? बसा—

शा०—नाहीं-नाहीं–मी तुझ्या शेजारीं बसण्यास योग्य नाहीं—आहा ! कितीतरी हें तुझें थोर मन ! अग तुला केलेल्या अपकाराबद्दल तूं मला उपकारानें मारीत आहेस ! अरेरे ! असा हिरा कीं ज्याच्या प्रकाशानें मला शोभा

आली असती त्याचा त्याग करून त्या गारगोटीचा स्वीकार केला व आपणास काळिमा लावून घेतली ! किती मी दुर्दैवी !

बे०—पुरे ! पुरे ! इतकं कांहीं मला शिखरावर नेऊन ठेवायला नको ! आहे मी आपली कशीतरी–संभाळून घ्या म्हणजे झालं—

शा०—बरं पण, आज दिवसपर्यंत तुझा जो मीं छळ केला त्याची पहिल्यानें तूं मला मनापासून क्षमा करशीलना ?

बे०—छेः छेः ! हें काय असं बोलतां ? मीच उलट आपणांस कधीं कधीं टाकून बोललें असेन त्याची आपणांजवळ माफी मागतें—

शा०—आहाहा ! हिरा तो हिराच ! (तिला आलिंगन देतो.)

बे०—(शामरावाचा हात धरून) मग झाला ना अगदीं निश्चय तुमचा ? आजपासून सर्व व्यसनें सोडायचींना ?

शा०—म्हणजे यांत काय संशय ! झाला माझा निश्चय. मला माझ्या पूर्व कर्मांचा पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. नको आतां ते छंद. मला त्यांचा अगदीं वीट आला. (इतक्यांत बाहेरून कोणी दार ठोकतें).

बे०—दरवाजा कोण बरं ठोकीत आहे ? या रात्रीच्या वेळीं कोण बरं आलं असावं ?

शा०—कोण आलं असावं बरं ? छेः बुवा कांहीं समजत नाहीं. (बाहेरून– 'दरवाजा उघडा' असे शब्द येतात.)

बे०—(घाबरून) हें काय बरं आहे ? माझा उजवा डोळा कां बरं लवतो ? खरोखर मला हें बरं चिन्ह दिसत नाहीं.

शा०—अग भिऊं नकोस. मी आतां दरवाजा उघडतों म्हणजे काय आहे तें सर्व समजेल.

(बाहेरून–'दरवाजा उघडतां कीं फोडून आंत येऊं' असे शब्द येतात. व दरवाज्यावर बाहेरून कोणी लाथा मारतात.)

बे०—(घाबरून) अगबाई–हें काय ? हे आहेत तरी कोण ? घरांत दुसरं कोणीच नाहीं का ? दादाजी व दादी कोठें गेलीं ?

शा०—अग हा पहा दादाजींचा शब्दही त्यांच्यांत ऐकूं येत आहे. अग थांब, तूं येथेंच ऐस. मी दरवाजा उघडतों व काय आहे तें पहातों.

बे०—नको–नको–मला वाटतं हे कोणी पोलिसचे शिपाई असावेत. पण त्यांचं येथें काय काम आहे? सांगा–माझ्या गळ्याची शपथ तुह्मांला आहे–तुह्मीं असं कांहीं वेडंवांकडं केलं नाहींना?

शा०—तुझ्या गळ्याची शपथ तसं कांहीं मीं केलं नाहीं.

बे०—तर मग हे लोक येथें आले कशाला? खरोखर मला बाई भीति वाटते!

शा०—हें पहा. मीं जरी कांहीं केलं नाहीं तरी मला वाटतं कीं त्यांचा हेतु मला धरण्याचा दिसतो. नाहींतर दरवाजा फोडण्याची भीति त्यांनीं घातली नसती. पण निःसंशय यांत कांहीं तरी चूक झाली असावी! (बाहेरून–'दरवाजा एकदम खोलो' असे शब्द येतात. बाहेरून लाथा मारतात. शामराव दरवाजा उघडण्यास जातो.)

बे०—(त्यास अडवून) पण तुह्मी नको दरवाजा उघडूं. मी उघडतें–तुम्ही लपून रहा येथें कोठें तरी. तुह्मीं येथें नाहीं ह्मणून मीं त्यांनां सांगतें.

शा०—छेः छेः वेडी कोठची! अग, असं केल्यानें नसता गुन्हा माझ्या पदरीं पडणार! हें पहा त्यांनीं दरवाजा फोडण्याचा प्रयत्न चालविला आहे. जाऊं दे मला! आतां एक क्षणभरही विलंब करितां उपयोग नाहीं. उघडतोंच मी दरवाजा–तूं तेथें जाऊन बस. (शामराव दरवाजा उघडतो.) काय गोंधळ मांडला आहे तुह्मीं हा! काय तुमचं येथें काम आहे? (आंत दोन शिपाई व एक कान्स्टेबल शिरतात.)

शा०—तुह्मांला काय पाहिजे?

कान्स०—(हातांतील कागद वाचून) इज् युअर् नेम्[1] शामराव खंडेराव?

शा०—यस्, धाट्स[2] माय् नेम्.

कान्स०—वेल्. हियर् आयू[3] ह्याव् ए वारंट् ऑफ् अरेस्ट अगेन्स्ट् यू.

शा०—(आश्चर्यानें) वारंट् अगेन्स्ट्[4] मी! व्हाट् फॉर्?

कान्स०—रीड् इट्[5] फॉर् युअरसेल्फ. (वारंट शामरावाच्या हातीं देतो.)

---

१ तुमचें नांव शामराव खंडेराव काय? २ होय, तेंच माझें नांव. ३ पहा. मजजवळ तुमच्यावर पकडवारंट आहे. ४ मजवर वारंट! तें कशासाठीं? ५ तुह्मीच वाचून पहा.

शा०—(वाचून) ऑल् दिस् इज् ऐं[1] गॉट्‌ अप् अफेअर्! हा सर्व बनावट खटला आहे. मी रात्रीं रंगीच्या घरीं होतों खरा. पण तेथून निघाल्यावर तिच्या येथें मीं पुन्हा कसा तो पाय ठेवलाच नाहीं.

शि०—रावसाहेब–या वेळीं आपण कांहींही न बोलाल तर ठीक! जें कांहीं बोलावयाचें असेल तें बोलण्यास पुढें तुह्मांला पुष्कळ सवड मिळेल.

कान्स०—वेल्. कम् ऑन्[2], मेक् हेस्ट् प्लीझ्—

शा०—यस्[3], आय् उइल् जस्ट् बी रेडी (कपडे घालीत असतां—)

खं०—(आंत येऊन) आय् से मिस्टर्[4] कानिसटेबल्, व्हाय् यू मेक् न्यूसन्स् हियर्?

कान्स०—(हंसून) वेल् ओल्ड् जॅन्ट्लमन्[5], आय् ॲम् व्हेरी सॉरी टु से द्याट् आय् ह्याव् ए वारंट् अगेन्स्ट् दीस् यंग् म्यान्.

शा०—दादाजी–तुह्मी अगदीं भिऊं नका! हा खोटा चार्ज माझ्यावर अदावतीनें घातला आहे. मी जातों यांच्या बरोबर. परंतु तुह्मी स्वस्थ असा!

खं०—आय् से, माय् सन्[6] मेक् नो फ्रॉड्! व्हाय् यू टेक् हिम्?

कान्स०—वेल् उइ मस्ट् डिसचार्ज[7] अवर् ड्युटी! कम् आन् माय् यंग् म्यान्.

खं०—व्हेरी वेल्–डोंट् थिंक्[8] मी लेस्! आय् मेक् इनव्हेरीटी ब्यारिस्टर-हं.

(बाहेर जातो.)

शा०—(बेनाबाईची समजूत करून) कम् आन्[9]—आय् ॲम् रेडी.

(शामराव पोलिसच्या लोकांबरोबर जातो, व बेनाबाई शोकाकुल होऊन बेशुद्ध होऊन पडते).

---

१ हा सर्व बनावट खटला आहे. २ बरें चला, घाई करा. ३ ठीक, मी आतां तयारी करतों. ४ अहो साहेब, ही गडबड काय तुम्हीं मांडली आहे? ५ ह्मातारे बाबा, मला सांगण्यास फार दिलगिरी वाटते कीं या तरुण मनुष्यावर वारंट आहे. ६ हें पहा! माझा मुलगा म्हणतो कीं त्यानें कांहीं तरकट केलें नाहीं. त्यास तुम्ही कां घेऊन जातां? ७ आह्मांस आमची कामगिरी बजाविली पाहिजे. रावसाहेब चला. ८ ठीक! ठीक! मला कमती समजूं नका! मी इनव्हेन्यारिटी ब्यारिस्टरास आणीन! ९ चला मी येण्यास तयार आहें.

प्रवेश ७ वा.

[स्थल—रस्ता.]

(रामराव व गजानन.)

रा०—ॲलो! कोण गजानन? फार चांगलं झालं. मी तुझ्याचकडे येत होतों. तूं कोठें निघालास?

ग०—जायाचं आहे जरा कामाला. कां बरं? एवढ्या सकाळीं घरीं कशाला चालला होतास?

रा०—तूं कांहीं ऐकलं नाहींस?

ग०—नाहीं बावा. काय?

रा०—आज सकाळीं आमचे घरीं तो विनायकराव आला होता त्यानें असं कांहीं सांगितलं कीं आपल्या शामरावाला रात्रीं पोलिसांनीं पकडून नेलं ह्मणून!

ग०—व्हॉट्[1]? शामरावाला पकडून नेलं? व्हाय्[2]?

रा०—तें बुवा कारण काय बरावर समजलं नाहीं. व ह्मणूनच तुझ्याकडे येत होतों चौकशी करायला.

ग०—खरोखर मला मोठं नवल वाटतं या गोष्टीचं! मग काय, येतां त्याचे घरीं? दादाजींनां विचारूं—

रा०—वाः! शहाणाच आहेस तूं तरी! अरे दादाजी आधींच जिवंत आग, त्याच्यांत शामरावाला खरोखरच पकडून नेला असेल तर मग आगीवर तेल पडल्यासारखं झालं असेल. छे:! त्याचेजवळ कोण जाऊन विचारील! अरे तो पिसाळलेल्या कुत्र्यासारखा आंगावर येईल धावून. तशांत तो बाहेरून जरी दाखवीत नाहीं तरी आपल्यावर आंतून खुब जळत असेल!

ग०—अं! आय्[3] डोंट् केअर् फॉर् सच् ओल्ड् फूल्स्! पण तूं ह्मणतोस तेंही खरें! अशा वेळेला त्याच्याजवळ जाऊं नये हेंच बरें! अरे पण बरी आठवण झाली. त्या दुड्ढाचार्यांकडे जाऊं चल. त्याला माहित असेल.

रा०—यस्! कम्[4] ऑन्.

---

१ काय? २ कां बरं? ३ मी अशा म्हातारड्यांची पर्वा करीत नाहीं! ४ हो! चल!

ग०—पण पहिल्यानें मला कामाला जायाचं आहे तिकडे जाऊं. तिकडून मग जाऊं त्याचेकडे–चल तूंही बरोबर ये. (इतक्यांत खंडेराव येतो. त्यास पाहून) अरे तो रे कोण समोरून येतोय? दादाजी तर नाहीं? बघ–बघ—

रा०—(पाहून) अरे दादाजी रे दादाजी. टॉक् ऑफ् दी डेव्हल् अँड् देअर् ही इज् ! चल–चल. त्याचे नजरेस पडतां कामा नये. (बाजूस जाऊं लागतो.)

ग०—(त्यास अडवून) अरे तिकडे कोठें चाललास? भितोस कशाला इतका त्याला! आपल्याला खाऊन तर टाकीत नाहीं! चल. आणि हें पहा, त्याच्याच कडून आपण ही बातमी काढूं.

रा०—नको रे. बिचारा दुःखांत असेल. त्याच्याशीं वात्रटपणा करून दुःखावर डाग देणें बरोबर नाहीं.

ग०—व्हॉट्, यू पिटी हिम्? नो–नो–ही डिझर्व्स् इट्–रिचली डिझर्व्स् इट्! मी पहा युक्तीनें त्याचे जवळून कशी बातमी काढतों ती. तो पहा आला. (खं० येतो.)

ग०—दादाजी, शामराव घरीं आहे का?

खं०—(न्याहाळून) कोण ? गजानन ? का कशाला पायजे शामराव तुला ?

ग०—नाहीं. विशेष कांहीं नाहीं.

खं०—नाय कस. जावाच असेल रात्री कोठें भटकाला; नायतें टिपीण बिपीण असेल!

ग०—नाहीं हो दादाजी, टिफीण कशाची—

खं०—टिपीण कशाची? शरम नाय वाटे? गाढवांदो, तुम्हीच त्या शाम्याला बिघडून टाकलात. तो तुमचे कंपनीन जावाला लागल्यापासून अगदीं बिघडून गेला. नायतें पोर कसा शाणा होता.

रा०—असं काय ह्मणतां दादाजी! आम्हीं त्याला बिघडविला?

खं०—तुमी नायते कोणीं? करून सवरून साव? विचाराला शरम नाय वाटे!

रा०—पण असे तुह्मी रागावतां कां दादाजी? आमचा बरं त्याच्यांत

---

(१) खवीसाचें नांव घ्यावयाची खोटी कीं राहिलाच तो पुढें उभा! (२) काय? तुला त्याची दया येते? नाहीं! त्याला हें योग्य शासन-अगदींच योग्य शासन आहे.

काय वांक ? आह्मीं होऊन त्याला बोलावलं का आमच्या कंपनींत ? आणि आमचे कंपनींत आला नसता तरी तो खराब झाला नसता का ?

खं०—अलबत नसता ! माझे पोराला तुमींच खराब केलात.

ग०—बरं पण दादाजी. शामरावाला आह्मीं खराब केला. आणि वामनरावाला न धाकलाभाईला कोणीं खराब केलं ? ते तर आमचे कंपनींत नव्हते—अहो, बीज तसं—

खं०—का बोललास ? बोल–पुन्हां बोल—

ग०—हो हो ! खरं बोलायला काय हरकत आहे ?

रा०—(गजाननास) तूं बसरे गुपचिप. (खंडेरावास) कांहीं नाहीं हो दादाजी. तो मूर्ख आहे, त्याचं काय ऐकतां !

खं०—चालते व्हा पोरांनो, सगळे तुमी सारखेच ! भाड नाय भीड नाय. उनाड कोठचे ! भोगाल पोरांनो भोगाल ! तुमचे हाल कुत्रा नाय खाणार ! जा इकडशी. (काठी उगारतो. रामराव व गजानन निघून जातात.)

खं०—या पोरांनीं माजे शामाला खराब केला. खरोखर, माजे स्वप्नान पण नवत का माजे पोरांचा मला अवडा त्रास होयल म्हणून. मी माजे स्वताला मोठा भाग्यवान समजत होतूं. पण मला अगदीं उलटा अनभव आला. मोठा वायला झाला, शाम्याचं हें असं झालं न धाकलाबायचा ते अजून पत्ता नाय ! या ह्मातारपणीं का हे हाल न अपेष्टा ! देवा ! मीं तुजा का असा अपराध केलता कीं माजे तीन मोठाले सोकरे असून त्यांतून एक पण कामासारखा नाय ! या पोरांचे जोरावर मीं कोणाची पण बिलकूल परवा केली नाय ! त्यांचे लगनाचे वेळीं लोकांना कसं कसं अडवून धरलं ! हुंड्यामदी नेमाचेपेक्षां एकवाल पण कमी नाय केला ! पण ज्यांचे जोरावर मीं अवडा डौल मारला त्यांनीं कसा मला दगा दिला ! माजं घर अगोदर कसं गजगजीत दिसत होतं ! एक धाकटंसं राज्य होतं–राज्य ! अन मी राजा होतूं ! पण आतं का हाय ? ओसाड न शून्य घर दिसते ! तिघं पोरांमदशीं एक पण पोर घरान नाय ! (गहिंवरून) माला एकटे ह्मातान्याला ठेवलय ! देवा ! हे असं होवाचं होतं ते माला कशाला जिवंत ठेवलस ! या ह्मातारपणीं अन ही अपेष्टा पावाला मी राहिलं तरी कशाला ! खचीत देवाचा माज्यावर कोप झालय यान संशय नाय ! अन अवडा कोप होवाच

कारण पण मीच! आतं माझे ध्यानांन आलं! त्या लोकांचे तळतळाट ते नडले नाय ? कसे नाय नडणार ? मी का कोणाचं आज दिवसपर्यंत चांगलं केलय ? उलटा झाला तवडा त्रास दिला. कोणाला दया नाय दाखवली! माया नाय दाखवली! तिचं ऐकलं नाय! सोबत्यांच ऐकलं नाय! कोणाचं ऐकलं नाय! मी माझा हेका धरून बसलं–अन माला घेवाचं ते मापून–मोजून–चोपून घेतलं! सगळे वेवलुकांना कस पिळून पिळून घेतलं. सुंदररावाला उठवला का नाय दुनियेमदशीं! त्या काशीबायचे हाल अगदी बगवत नाय नजेरशी! अन्नाला मोताद झालय बिचारी! या सगळ्याच कारण मीच नाय का? अन अवड घेऊन ते पाठीमगारी तरी रायलं? शाम्यान ते होतं नवतं ते वाटेला लावल. धाकल्यान ते घरानच–लोकांचं–सगळ पार केलं! झालं आतां धुपाटणं हातीं रायलय! बरोबरच हाय, आलं तस गेलं! हा देवाचे घरचा न्यायच झाला! जुलमाशी घेतलेल्या पैशाला न सोन्याला बरकत ती कशी असेल ? असो. आतं झाले गोष्टीचा उगीच शोक करून का उपयोग? होवाच ते चुकते? आपले नशीबानच हाल लिवले असतील ते सुख कोठच मिळणार? चला. शामाला रात्रीं पकडून नेलय त्याचेबदल विचाराला जातंय विश्वासरावचेकडे. हाय त्याला माझी कळकळ. तो पण बिचारा शामासाठीं हळहळते हो! पण त्याचे हातान का हाय? बगाला गेलं तें तो न शामा एक वयाचे, पण त्याचे गुण न त्याची अक्कल न त्याचा शाणपणा कोठें? पोर असावा ते असा असावा, नायते सगळींच पोरं. पोरं तरी चांगलीं निघाला तसंच पुण्य पदरीं पायजे! चला— (जातो.)

प्रवेश ८ वा.

[स्थल—विश्वासरावाची खोली.]

(विश्वासराव.)

वि०—काय चमत्कार आहे तरी हा! रात्रीं शामरावाची भेट झाल्यापासून पुन्हा पुन्हा तीच गोष्ट मनांत येते! कोणतीही गोष्ट बरी व्हावयाची असली म्हणजे एकादें क्षुल्लक कारणही पुरें होतें. या शामरावाला सुधारण्यासाठीं आज

सतत दोन वर्षें झालीं मीं अनेक खटपटी केल्या. हा नाहीं तर तो–तो नाहीं तर हा–असे नाना प्रकारचे उपाय केले. पण छे: ! सुधारण्याची तर गोष्ट एकीकडेसच राहिली. उलट जास्त बहकत चालला होता. शेवटीं निरुपायानें हात टेकून स्वस्थ बसावें लागलें. पण काय चमत्कार आहे पहा ! जें काम एवढी खटाटोप करूनही साध्य झालें नाहीं तेंच एका क्षुल्लक गोष्टीनें कसें हं हं ह्मणतां साधून गेलें ! वेश्याजनास योग्य अशा रीतीस अनुसरून रंगी त्याला हांकून लावते. व त्यामुळें शामरावास सर्व व्यसनांचा वीट येतो काय ! व तो तसाच मजजवळ येऊन आपलें वर्तन सुधारण्याबद्दल अंतःकरणपूर्वक आणा शपथा वाहतो काय ! हें आहे तरी काय ? रात्रीं तो मजकडे येऊन मला जेव्हां आपल्या वृत्तींत पालट झाल्याचें सांगूं लागला तेव्हां पहिल्यानें मला तें खरेंच वाटेना. व त्याप्रमाणें मीं त्याला सांगितलेंही. परंतु पुढें त्याविषयीं त्यानें माझी पूर्णपणें खातरी केली. तरी पण, तो घरीं गेल्यावर, झालेला प्रकार मीं स्वप्नांत पाहिला कीं खरोखर पाहिला याविषयीं माझ्याच मनांत संशय उत्पन्न होऊं लागला ! बरोबरच आहे ! असा प्रकार घडून येणें ह्मणजे एक दैविक चमत्कारच ह्मणायचा ! पण तें कांहींही असो. शामरावाची वृत्ति पालटली यांत बिलकूल संशय राहिला नाहीं ! आतां मात्र त्याला कांहीं वेळ संभाळला पाहिजे ! हो ! नेम काय सांगावा ! सपातानें खाल्लेला मार झणझणत आहे तोंपर्यंत एकादे वेळीं ही वृत्ति टिकायची ! नाहीं तर येरे माझ्या मागल्या ! पुन्हा मित्रमंडळीच्या व तशांत त्याला त्या दोन जबरदस्त लागलेल्या जळवा रामराव व गजानन यांच्या तडाक्यांत सांपडला कीं वृत्ति बदलायाला वेळ लागायचा नाहीं ! त्याला त्याच्या मित्रमंडळीपासून कांहीं दिवस दूर ठेविला पाहिजे ! याला उपाय काय बरं करावा ? (विचार करून) वा ! नामी उपाय ! माझी प्रकृति अंमळ अस्वस्थ असल्यामुळें डाक्टरानें मला पुण्यास जाण्यास सांगितलें आहे. पुढल्या महिन्यांत तेथें जाण्याचा माझा विचार होता. परंतु एक दोन दिवसांतच निघण्याचा बेत करावा–व शामरावास बरोबर घेऊन जावें. त्यामुळें त्याचे सोबतीही दूर रहातील व तोही नेहमीं माझ्या नजरेसमोर असेल. असे महिना पंधरा दिवस गेले ह्मणजे मग हरकत नाहीं. हाच बेत उत्तम. चला–त्याच्या घरीं जाऊन दादाजींनां सर्व सांगून त्यांचा हुकूम घेतों. शामराव तर नाहीं म्हणावयाचा नाहींच—

(खंडेराव येतो.)

कोण दादाजी? तुह्मी कां बरं इकडे?

खं—(गहिंवरून) विश्वासराव आता तुजेजवळ येव नाय ते कोणाजवळ येव? माज दुख सुख सगळ सांगाच ते एक देवाजवळ न दुसर तुजेजवळ—

वि०—भिऊं नका दादाजी. आतां तुमचे दुःखाचे दिवस सरत आले आहेत असं समजा.

खं०—हो खरंच. एकदाचे माजे डोळे मिटले ह्मणजे मग मला सुख का न दुख का! सगळ सारखच.

वि०—असं काय दादाजी बोलतां तुह्मी? आज तुह्मी असे उदास कां दिसतां बरं?

खं०—विश्वासराव का सांगू तुला–(डोळ्यांत आंसवें आणून व गहिंवरून) माजे शामाला—

वि०—काय–शामरावाला काय झालं?

खं०—(गहिंवरून) पकडून नेल—

वि०—शामरावाला पकडून नेलं? कोणीं?

खं०—पोलिसचे लोकांनीं.

वि०—कां?

खं०—(खिशांतून पत्र काढून) हे बग त्याचच पत्र हाय. वाच. त्यान लिवलय सगळ. पत्र आलं ह्मारबावडीचे चौकीवरून. मला ते त्यान काय समजे नाय!

वि०—(पत्र वाचून) अंः भिऊं नका तुह्मी. त्यांत कांहीं नाहीं! आणि हें झालं तें एका अर्थीं बरंच झालं!

खं०—तूं तरी अस विश्वासराव का बोलतेस? माझा शामा जरी अगदी वाईट असला तरी तो तुरंगात गेलेला माज्यान बघेवेल का? किती झाला तरी तो माजा पोरच न?

वि०—तसं नाहीं दादाजी–मी त्या अर्थानें बोललों नाहीं. हें पहा शामरावाला पकडलय कशासाठीं तें ठाऊक आहे का?

खं०—नाय बाबा–मला का पण खबर नाय. पण काल पकडून नेल तंव रंगीच का कोणाचं नांव निघाल होत खरं.

वि०—तेंच तें–हें पहा शामराव रात्रीं ९ वाजण्याच्या सुमारास रंगीच्या येथें

गेला होता. तिकडे त्याचें तिच्या बरोबर मोठें भांडण झालें व तिनें त्याला फट्फजिती करून घरांतून हांकून लावलं. पुढें मग सुमारें ११ वाजतां ती निजली असतां तिच्या नाकावर कोणीं मोठी जखम केली. ही जखम शामरावानेंच केली असं तिचं म्हणणं आहे. व ह्मणून त्याला संशयावरून पकडलें आहे. (स्वतांशीं) चार्ज तर सिरियस्[१] आहे परंतु ही मला अगदीं फिझिकल् ईम्पॉसिबिलिटी[२] दिसते! रंगीचे येथून सुमारें १० वाजतां शामराव येथें आला तो १२ वाजेपर्यंत माझ्याजवळच होता. मीच त्याला १२॥ च्या सुमारास घरीं पोहोंचता केला. छेः हें काम शामरावाच्या हातून झालेलें नाहीं. कोणी एकाद्या लफंग्यानें केलं असावं. आणि शामरावही पत्रांत लिहितो कीं तिचा भाऊ रात्रीं एकाएकीं घरांतून पळून गेलेला आहे. व त्या रात्रीं शामराव रंगीच्या येथें गेला त्यापूर्वीं रंगीचा व तिच्या भावाचा अगदीं निकराचा तंटा झाला होता असेंही शामराव लिहितो! तेव्हां बहुतकरून त्याचंच हें काम असावं!–(उघड) दादाजी यांत कांहीं अर्थ नाहीं–शामराव सुटलाच पाहिजे.

खं०—का सांगतेस, माझा शामा सुटेल? हं?

वि०—हो हो, यांत काय संशय!

खं०—तुजेजवळ असा का पुरावा हाय? सांग–सांग–बावा सांग—

वि०—धीर धरा. मी आतांच तुमच्या बरोबर येतों.–आपण दोघेही शामरावाला जाऊन भेटूं–मी जातां जातां तुह्मांला माझे विचार सांगतों. मला तुह्मांला पुष्कळ सांगायचं आहे. (कपडे घालून) चला—

खं०—चल बाबा— (जातात.)

(रस्त्यावर)

वि०—समजलेत आतां? आतां तर तुमची खात्री झाली? जरी तिचा भाऊ मिळाला नाहीं तरी माझ्या एकव्याच्या साक्षीवरून शामराव सुटला पाहिजे.

खं०—मी का सांगूं बावा.–तूं सांगतेस ते सगळ बरोबर हाय. पण बावा पोलीसशी काम हाय–त्यांचे कचाट्यांतून माजा शामा सुटेल तवं माझे जिवान जीव येल.

वि०—दादाजी एवढं लक्षांत ठेवा कीं ह्या वेळेस जर शामरावाला सोडवून तुह्मांस तो मिळवून देईन तरच माझं नांव विश्वासराव!— (जातात.)

१ आरोप तर अति भयंकर आहे. २ अगदीं असंभवनीय.

प्रवेश ९ वा.

(स्थल—डुकरगल्लींतील घर.)

[वामनरावाची खोली.]

(वामनराव व पुतळाबाई.)

वा०—(हंसत) पुरली तुझी हौस निराळा संसार मांडण्याची?

पु०—एकदां सांगितलं ना? आणखी पुन्हा तेंच न तेंच काय!

वा०—बरोबरच आहे! तुला काय त्याचं! ज्याला करावं लागतं त्याला समजतं. हा निराळा संसार मांडल्यापासून मला तर वाटत नाहीं कीं आपणांस एकादा ढळढळीत नफा झाला. उलट एकाचा दुप्पट खर्च चालला आहे. शिवाय, आपण एकत्र होतों तेव्हां मला जें सुख होतं त्याच्या निम्मेदेखील आतां राहिलं नाहीं. याखेरीज, दादाजींची व दादीची मर्जी उडाली ही निराळीच गोष्ट. खरोखर, मला आतां तर असं वाटूं लागलं आहे कीं त्या वेळेस तुझ्या ह्मणण्याकडे दुर्लक्ष्य केलं असतं तर फार चांगलं झालं असतं. तुझ्या पोरकट विचाराकडे त्या वेळीं मी लक्ष्य दिलं याचं आतां मला फार वाईट वाटत आहे.

पु०—(रागानें) तुह्मी पुरुष असेच आरंभीं शूर! नवीन नवीन तुह्मीचना ह्मणत होतां कीं निराळे झाल्यापासून आपण पुष्कळ स्वतंत्र झालों?

वा०—पण ही स्वतंत्रता काय कामाची! मी एकत्रांत रहात होतों तेव्हां कमी स्वतंत्र होतों असं नाहीं. तूं मात्र खरोखरीच स्वतंत्र झालीस. तुला आतां कोणाचा दाब नाहीं, कांहीं नाहीं. हवं तसं वर्तावं! आतां तूं खरी स्वतांची मालकीण झालीस! छेः, पण मला हें ठीक दिसत नाहीं. हा अनुभव पुष्कळ झाला! मला वाटतं, दादाजीजवळ जाऊन त्यांची माफी मागावी व पूर्वीप्रमाणें त्यांजपाशीं जाऊन रहावं!

पु०—(रागानें) माझं अडलं आहे इथं त्यांची माफ मागायला! तुह्मींच मागा पाहिजे असल्यास. मला तर त्यांच्या पायरीवर कसा तो पाय ठेवायचा नाहीं.

वा०—हा स्वतंत्रतेचा परिणाम! बाळमित्रांतील "मुलें जीं स्वतंत्र व्हावयास

पहातात", त्यांच्या गोष्टीसारखी आपली गोष्ट होणार. आज निराळे होऊन चार महिने झाले नाहींत तों आपल्या लहानशा संसाराचे हे हालहवाल!

पु०—अहो पण संसाराचे हालहवाल ते काय झाले हें तर कळूंद्या!

वा०—नाहीं कसे? आतां पहा. तुझें माहेर शेजारींच असल्यामुळें उठवस चाललीस तिकडे! घरांत तेवढा स्वयंपाक करण्यापुरती. जेव्हां पहावी तेव्हां तिकडे. मग मागें घरांत कोण येतं कोण जातं याची काळजी तरी!

पु०—कां घरांत गडी नसतो का?

वा०— वाहवा! गड्याच्या हवालीं घर दररोज ठेवल्यानें, जरी तो विश्वासू असला तरी त्याची बुद्धि फिरण्याचा संभव नाहीं काय?


पु०—(रागानें) तुमचें तो काय घेऊन गेला?

वा०—इकडे हिशेब कोणीं ठेविला आहे? पण मला तर असं वाटतं कीं त्याच्या हवालीं सर्व घर ठेवणें हें अगदीं अप्रशस्त आहे. आणि अलीकडे मी पहातों कीं आपल्या लहानसहान जिनसा जिकडच्या तिकडे नाहींशा होतात. तें कशाला, पंधरा दिवसांपूर्वींच अर्धा फरा तांदुळ आणले—आणि कालच तूं म्हणालीस कीं दोन तीन दिवस आणखी तांदुळ पुरतील. तर काय पंधरा वीस दिवसांत आपणां दोघांस अर्धा फरा तांदुळ लागले? मला वाटतं कीं तुझा या संबंधानें चांगला बंदोबस्त नसल्यामुळें आपला पुष्कळ तोटा होत आहे. तुझं चित्तच जर घरांत नाहीं तर हा संसार नीट चालणार तो कसा? छेः हें असं आपणांला बुवा पतकरत नाहीं. असली ही मला स्वतंत्रता नको. पुन्हा, माझ्या जेवणाखाण्याचीदेखील नीट व्यवस्था तुझ्यानें ठेववत नाहीं.

पु०—झालं आपलं, कांहीं तरी बोलायचं ह्मणून बोललेत! कां, केव्हां तुह्मांला उपाशीं ठेवलं होतं?

वा०—उपाशीं ठेवायला कशाला पाहिजे? पण कधीं तरी जेवण वेळेवर मिळालं असं झालं आहे का? बरोबरच, मुळीं पांच वाजतां माहेरून परत येणार. त्यानंतर सर्व करायचं! मग जेवण तें वेळेवर कसं तयार होणार?

पु०—येऊन जाऊन तुमचा डोळा सगळा माझ्या माहेरीं जाण्यावरच ना? बरं तर, मी उद्यांपासून माहेरीं जाणार नाहीं; मग तर झालं ना?



पु० * * येऊन जाऊन तुमचा डोळा सगळा माझ्या माहेरीं जाण्यावरच ना? (पृष्ठ १२६).

वा०—जाईनास तूं खुशाल बापडी. मी नको कशाला ह्मणूं? पण तेवढं केल्यानें आपला संसार सुरळीत चालेल असं मला वाटत नाहीं. नको, मी उद्यां दादाजींकडे जाऊन त्यांची समजूत करतों!

पु०—(रागानें) तुह्मांला वाटेल तें करा! पण मी साफ सांगतें हो कीं मी आतां तुमच्या आईच्या हाताखालीं नांदणार नाहीं! हो, आतां त्यांच्यांत जाऊन रहा आणि मग ते आपणांस वेळोवेळीं पदोपदीं टोमणे देणार! मला नाहीं बाई असं सहन व्हावयाचं! तुमचे आईबाप तुह्मांस गोड! मला नाहीं!

वा०—हें तुझ्या डोक्यांतील वेड लवकरच निघेल. हें पहा, या गोष्टीचा तूं नीट विचार कर ह्मणजे तुझेंच तुला वाटेल कीं मी ह्मणतों हेंच खरं.

पु०—विचार तो आणखी काय करायचा? माझा विचार एकदां सांगितला तोच!

वा०—वेडी कोठची! (पांडु गडी येतो.)

पांडु०—दादीबाई, तुह्माह्मी आईनीं बोलावलय. जरा येऊनशी जा अस सांगीतलय.

पु०—बरं मी आतां येतें.

पांडु—मी जाऊं का तुमी माझ्या संग येता?

पु०—थांब, मी तुझ्याबरोबरच येतें. (आंतून शाल घेऊन येते.)

वा०—घ्या. रविवारींदेखील तेथें गेल्याशिवाय चैन पडत नाहीं!

पु०—मी होऊन चाललें कीं आईनें मला बोलावयाला पाठविलं?

वा०—(हंसून) एकुणएकच!

पु०—बरं, मी जरा जाऊन येतें. तुह्मी घरांतच आहां ना?

वा०—खुशाल आपली जा. तुला नाहीं कोण ह्मणेल? मी घर सांभाळायला आहेंच! (पु० गड्याबरोबर जाते.)

वा०—छे:! थोड्या वेळांत हिचं घरांतून चित्त उडून गेलं, तर पुढें इची काय अवस्था होईल? पुरे आतां ही स्वतंत्रता! हिला ताळ्यावर आणण्यास दुसरा उपायच राहिला नाहीं! पुन्हां कुटुंबांत जाऊन राहिलं पाहिजे! उद्यां

सकाळीं पहिलं काम हें. दादाजींना जाऊन भेटतों व त्यांची समजून करतों. दादाजी नाहीं ह्मणणार नाहीं. आतां, तिथें पुन्हां जाऊन रहाणं हिला रुचणार नाहीं खरें, परंतु त्याची परवा न बाळगतां मला योग्य वाटतं तेंच केलं पाहिजे. बायकांच्या ओंजळींत पाणी पिण्याऱ्या नवऱ्यांस या माझ्या अनुभवापासून पुष्कळ उपदेश घेण्यासारखा आहे. मला खोटें खोटें सांगून आईबापांविषयीं माझं मन दूषित केलं व आपला हेतु पार पाडला! हिच्या ह्मणण्यावर भरंवसा ठेऊन व नीट विचार न करितां, मी आईबापांपासून एकदम वेगळा झालों. आपल्या आईबापांची त्यांच्या वृद्धापकाळीं माझ्यासारख्या मुलानें काळजी घेऊं नये तर मग कोणीं घ्यावी? पण, मी हा पुत्रधर्म एकीकडे गुंडाळून ठेवून माझ्या अविचारी बायकोच्या ह्मणण्याप्रमाणें चालण्यास प्रवृत्त झालों. असो! झाल्या गोष्टीस उपाय नाहीं! मला चांगलीच ठेंच लागली! व हिनें मला बराच शहाणा केला!

(पडदा पडतो.)

प्रवेश १० वा.

(स्थल—अपॉलो बंदर.)

(धाकलाभाई विलायतेच्या आगबोटीवरून नुकताच उतरला आहे.)

धा०—(स्वगत) अद्याप विश्वासराव कां बरें आला नाहीं! मी बॅरिस्टरची परीक्षा पसार झालों व या आगबोटीनें येणार ह्मणून त्यास पत्र पाठवून कळविलेंही होतें. तें पत्र त्याला कदाचित् पोहोंचलें नसेल असें तर नसेल ना? एरवीं तो आल्याशिवाय राहिला नसता. माझ्यावर त्याचे किती तरी उपकार झाले ह्मणून सांगूं! हुंडा घेऊन माझ्या इच्छेविरुद्ध माझें लग्न करण्याचा घरच्या माणसांनीं आग्रह चालविला होता. व मी नाहीं नाहीं ह्मणत असतांनाही त्यांनीं लग्नाची तयारी केलीच. तेव्हां सर्व कटकटींतून सुटून जाण्यास दुसरा कांहीं उपाय न राहिल्यामुळें माझ्याजवळचे असलेले चार साडेचार हजार रुपये घेऊन

विलायतेस गेलों. मनांत विचार केला कीं अगदीं काटकसरीनें राहिलों तर तेवढ्यांत निभाव होईल. पण तेवढ्यानें काय काथ वळतो! तेथल्या डियर[1] लिव्हिंग्नें व एकझ्यामिनेशन्च्या हेवी फीझ्नें[2] दोन वर्षांतच बहुतेक पैसा पार झाला! 'दुरून डोंगर साजरे' या म्हणीची सत्यता तेथें पूर्णपणें माझ्या अनुभवास आली! जेव्हां फक्त चारपांचशें रुपये माझ्याजवळ शिल्लक राहिले तेव्हां माझ्या मनाची काय स्थिति झाली ती माझी मलाच ठाऊक! मी तर अगदीं गर्भगळित होऊन गेलों! एवढा खटाटोप करून विलायतेस गेलों-व आतां थोडक्यासाठीं हात हालवीत परत जावें लागणार-असें जेव्हां दिसूं लागलें, तेव्हां विचार केला कीं दादाजींना लिहून पहावं-व त्याप्रमाणें पत्र लिहिलेंही. पण छे:! ते कसचे मला दाद देतात! माझ्या पत्राचा जबावही पाठविला नाहीं. एक तर त्यांचा मूळ स्वभावच तसा. त्यांत त्यांनां न विचारतां ऐन लग्नाची तयारी चालली असतां मी निघून गेलों. शिवाय, मी ज्या दिवशीं निघालों त्या दिवशीं दादीचे दागिने नाहींसे झाले त्यामुळें माझ्यावर त्यांचा साहाजिक आलेला संशय-या सर्व गोष्टींमुळें आगींत तेल ओतल्यासारखें झालें! असो! परंतु त्या विश्वासरावानें मात्र ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं मदत केली खरी! त्याला सर्व हकीगत कळविली त्यासरसे त्यानें दोन हजार रुपये पाठविले! जर त्यानें ते पैसे पाठविले नसते तर माझी धडगत नव्हती! न इकडे न तिकडे असें झालें असतें. बॅरिस्टर झाल्याशिवाय जर यावें लागलें असतें तर मग लोकांत तोंड दाखविण्यास जागा राहिली नसती! पण झालें तें ठीक झालें! ऑलस् वेल्[3] ध्याटस् एंडस् वेल्! गेल्यासारखी विलायतही पाहिली व ब्यारिस्टरही झालों! आतां दादाजींची कशी तरी समजूत केली पाहिजे. पण राहून राहून मला त्या दागिन्यांविषयीं मोठा अचंबा वाटतो! सर्व मंडळीचा तर माझ्यावरच संशय! विश्वासरावाला जरी मीं अगदीं स्पष्टपणें लिहिलें कीं मी दागिन्यांस कसा तो शिवलों नाहीं तरी त्याची कांहीं खात्री होत नाहीं. पैसे पाठवितांनाच त्यानें लिहिलें, 'दागिने घेऊन गेलास त्यांचें काय केलेंस'? हा मात्र व्यर्थ कलंक लागला खरा! असो! पण आतां येथें किती वेळ तरी वाट पहावयाची! निःसंशय विश्वासरावास पत्र पोहोंचलें नाहीं! नाहीं तर तो आल्याशिवाय रहाताना! व तो आला असता तर ठीक झालें असतें! तो बरोबर असता

---

१ सर्व गोष्टीच्या महागाईमुळें. २ परीक्षेच्या फीनें. ३ शेवट गोड झाला म्हणजे झालें.

तर दादाजींची समजूत लवकर व थोड्या आयासानें करतां आली असती! पण काय करायचं! चला जावं एकटंच! दादाजी बोलतील तेवढं मुकाट्यानें ऐकून घ्यावं. देतील–दोन चार शिव्या देतील! आणखी बसतील गप्प! चला. मला तर दादीला केव्हां पाहीन असं झालं आहे–चला— (व्हिक्टोरियांत बसून जातो.)

प्रवेश ११ वा.

[स्थल—खंडेरावाचें घर.]

(सोनाबाई देवखोलींतून पूजा आटपून जात असतां–)

बे०—(मर्यादेनें व हळूच) आज कज्जा निघायचा होता ना?

सो०—(डोळ्यांस आंठ्या घालून) हो, मगशी?

बे०—कांहीं नाहीं. कांहीं सांगावयासारखं कळलं कीं काय ह्मणून मी विचारावयास आलें होतें.

सो०—(रागानें) का? तुला का पंचाईत पडलय? आमी त्याचे आईबाप पायजे ती चौकशी करूं. तुला त्यांन मन घालाला कोणी सांगितलय? पोटचे गोळ्याची किंव आमालाच येणार! तुमी किती झाल्या तरी परक्याच!

बे०—आपण पाहिजे तें बोलण्यास मुखत्यार आहांत. परंतु मलादेखील थोडीशी किंव येणं साहजिकच नाहीं का?

सो०—हो! हो! हाय खबर कवढी मोठी किंव तुला हाय ती! नवरा तुरंगान गेलय पण इचे अष्टांगी हाय का? मारतय मजा!

बे०—(गरीबीनें) मी काय असी मजा मारीत आहें तरी!

सो०—(रागानें) बस! बस! मोठी शाणी झालयस! हाय खबर. तुज शाणपण तुजेच जवळ ठेव.

बे०—मी कोठें शहाणी आहें. मी आपली वेडीच!

सो०—वेडी कशाची हायस! वेड लावशील दुसऱ्यांनां. (रागानें) तोंडी लागाला शरम नाय वाटे!

बे०—(लीनतेनें) असं काय बरं बोलायचं—

सो०—अथ चोमडे चाळे नको कराला! बस गुपचिप. पांढरेपायाची कोठची! तुजेच पायगुणाशी त्याचेवरती अवडा परसंग आला!

बे०—तसंही असेल. मी नाहीं कोठें ह्मणतें. तुह्मी जें जें म्हणाल तें मला निमूटपणें ऐकून घेतलं पाहिजे.

सो०—नाय ऐकून घेशील ते कोणाला सांगशील! मोठी पराकरमी बाय पडलीस न! लगीन लागाची खोटी, बहिण न बापुस घालवली. नवऱ्याला तुरंगान पाठवला! न अजुन कोणाकोणाचे बळी घेशील कोणाला खबर! तरी ते बोलतते का ही सोकरी नको करू. पण माला भूल पडली न!

बे०—तुमच्या ह्मणण्याप्रमाणें कां होईना! कशी तरी पदरीं घेतलीत हाच माझ्या आईबापांवर उपकार!

सो०—हो! हान खबर, तुजा बापुस न आयस! मेले तंव होते कर्जाचे डोंगर माथ्यावरती! अन्नुमदी गेले! न हाय खबर तुजे आयसचा तोरा! पण भलं झालं देव इकडचा इकडेच हाय! अभिमानाच घर खालीच!

बे०—तुह्मी मला हवं तें बोला. मी तें सगळं निमूटपणें ऐकून घेण्यास तयार आहें. पण तुह्मी माझ्या आईबापांस व्यर्थ कां असं बोलतां? माझ्या बापास जरी डोईभर कर्ज होतं तरी त्यानें तुमच्याजवळ तर एक पैही मागितली नाहींना?

सो०—हो! हो! अन आमचे जवळ मागितल असत ते मिळते पायपोस— (रागानें) पण काग, तुजी जीभ भारी लांब होत चालली ग? माला नाय हो चालाच अस! मी तुजे असे बोल कदीपण सोसाची नाय—समजलीस!

बे०—अहो पण मी असं बोललें तरी काय? कां मला उगाच छळतां?

सो०—तू नाय बोललीस! तुजी जिभली बोलली—जिभली! थांब, टाकतय तिला चरचरा चिरून!

बे०—मी आपणांस कांहीं कमीजास्त बोललें असेन तर माफ करा. हा मी तुमच्या समोर पदर पसरतें. (पदर पसरते.)

सो०—चल जा इकडशीं. मेली निलाजरी कोठची! अवड बर तिला बोलता येतें! सासूला पायजे तस टाकून बोलाव न मगशी पदर पसरावा! खरच! तुजा मी छळ करतय का? बर. बर. येवंदे त्यांना भायेरशीं—सांगतय सगळं त्यांना. अन त्यांना अस पण सांगतय—तुमची सून तुमाला लाडकी अशेल ते ठेवा तिला—मी नाय घरान रावाची पाणी पिवाला—

बे०—पण तसं कशाला? मीच आपली जातें. तुह्मांला नकोसी असल्यास माझं तुमच्या घरीं काय काम आहे! मी माझा रस्ता करून टाकतें. तसं केल्यानें तुमच्या मागली माझी कटकट नाहींसी होईल!

सो०—(रागानें) जा मेले-रस्ता कर-का वाट कर! माला तुझी थोडीच परवा हाय! अन गेलीस ते दुनया ओस नाय पडाची!

बे०—ठीक आहे तर! तुमच्या मनासारखंच करतें. (हात जोडून) पण बोलल्याचालल्याची माफ करा बरं— (जाते. मागून सोनाबाई जाते.)

प्रवेश १२ वा.

[स्थल.—खंडेरावाचें घर.]

(बेनाबाई मागीलदारांतल्या विहिरीजवळ उभी आहे.)

बे०—देवा! तुझ्या अवकृपेमुळें आजदिवसपर्यंत मीं पुष्कळ दुःख भोगलं. परंतु आतां तें माझ्यानें नाहीं सहन करवत. ह्मणून मी जीव देण्याचा विचार करून येथें आलें आहें तर आतां त्यामध्यें विघ्न आणूं नकोस. या माझ्या आत्महत्येनें कोणासही विशेष दुःख होण्यासारखं नाहीं. बावा तर दुःखांतून सुटले. कायती आई राहिली आहे. तिला मी असलें नसलें सारखीच. तिची वाळी घालविल्यापासून तिचं मन माझ्यावरून उडून गेलं आहे. सासुसासऱ्यांस तर हेंच पाहिजे आहे. दादीनीं तर सकाळीं साफ सांगितलं कीं माझी त्यांना परवा नाहीं व मी असं कांहीं केलं तर दुनियाही ओस पडणार नाहीं. ठीक आहे. मीं असं केल्यानें त्यांना तरी आनंद वाटो! जर माझ्या पायगुणानें त्यांच्या घराची वाताहात झाली तर असले मेले पांढरे पाय मी त्यांच्या घरांत ठेवूं तरी कशाला! असो, आतां वेळ करून उपयोग नाहीं. येथें कोणी नाहीं तितक्यांतच आपलं काम उरकून घ्यावं म्हणजे झालं! देवा, तुझ्याजवळ सरशेवटची माझी हीच विनंती आहे कीं त्यांची अब्रूमध्यें सुटका कर व त्यांनीं मजजवळ जो निश्चय केला होता त्याप्रमाणें वागण्याची त्यांना बुद्धि दे! माझ्याच कपाळीं सुख भोगणं नव्हतं ह्मणून आजपर्यंत त्यांच्या बुद्धींत फरक झाला नाहीं! व जरा कोठें होत होता तों हें विघ्न मध्यें आलं! असो! परमेश्वराचीच तशी मर्जी! आपण त्याला काय करणार! देवा, मी तर माझ्या दुःखाचा या रीतीनें शेवट करीत आहें. परंतु यापुढें त्यांच्यावर कोणत्याही रीतीचं दुःख पडूं देऊं नकोस! हीच माझी तुझ्यापाशीं शेवटची विनंती आहे! (आंत उडी टाकणार इतक्यांत—)

शा०—(धांवत धांवत येऊन) अग, हें काय करतेस? अग मी आलोंना? माझ्याकडे बघ—(बेनाबाईस हातानें बाजूस करितो.)

बे०—(शामरावाचा हात दूर करून) चला तुह्मी–अडवूं नका मला–मला जाऊंद्या—

शा०—अग वेडी बिडी तर झाली नाहींसना? हा मी तुझा शामराव–मी आतांच सुटून आलों!

बे०—(संशयानें) खरंच? काय, तुह्मी सुटून आलेत? पण पुन्हा येतील ते तुह्मांला पकडायाला! तुह्मी त्यांच्यापासून पळून आले असाल. (बाहेर आवाज होतो तो ऐकून) ते पहा—ते आले! पळा–पळा–अहो पळा येथून–नाहींतर या माझ्याबरोबर–आपण दोघेंही आंत उडी घालूं–(विहिरीजवळ जाऊं लागते.)

शा०—(तिला दूर करून) तुझ्या मनाला भ्रम तर झाला नाहींना? अग चल–आतां काय त्यांची बिशाद लागली आहे यावयाला! अग ती सगळी चूक होती–चूक–

बे०—खरंच? (मोठ्यानें रडून व मिठी मारून) तर मला टाकूं नका आतां. मला तुमच्याशिवाय दुसरं कोणी नाहीं हो!

शा०—वेडे तुला मी टाकीन! अग, आतां मुकी रहा. अशी रडतेस कां? अशा आनंदाच्या वेळीं सुख मानण्याबद्दल असं रडायचं का?

बे०—सुख? मला सुख आतां पुढल्या जन्मीं—

शा०—छेःछेः आतां जोंपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुला काडीएवढें दुःख देईन तर शपथ! रात्रीं दिलेलें वचन विसरलीस वाटतं?

बे०—घ्या पुन्हा शपथ!

शा०—हो! ही घेतली शपथ—

बे०—माझ्या गळ्याची शपथ?

शा०—अग वेडे–(तिच्या गळ्यावर हात ठेवून) तुझ्या गळ्याचीच शपथ—झालं?

बे०—(मिठी मारून व किंकाळी फोडून) देवा—(बेशुद्ध होऊन पडते.)

शा०—अरेरे—ही तर बेशुद्ध झाली–कोण आहेरे तिकडे? रामा—अरे–रामा–

(इतक्यांत खंडेराव, सोनाबाई इत्यादि मंडळी येत.)

खं०—कारे शामराव, अरे तूं कदी आलास? (बेनाबाईस पाहून) पण ही इकडे कोण पडलय? अरे ही बेनी! (शामरावास) कारे, तिला मारलीस बिरलीसका का? हं?

शा०—नाहीं हो. ही जरा घेरी येऊन पडली आहे.

खं०—(सोनाबाईस) अग ए अशी बगत काय उभी रायलयस खुळ्यासारखी? सावध कर तिला. (बेनाबाईस सावध करितात. बेनाबाई सावध होऊन बाजूस उभी रहाते.)

खं०—कारे! इकडे तुमी का करीत होतेत?

शा०—कांहीं नाहीं दादाजी. मी सुटून आलों व वरती चढणार तों इला विहिरीजवळ पाहिली. तसाच मी धांवत धांवत इकडे आलों. ही आंत उडी टाकणार इतक्यांत तिला बाजूस केली. नंतर कांहीं विचारपूस झाल्यावर ती घेरी येऊन पडली.

खं०—(आश्चर्यानें) का? जीव देवाला आलती? (बेनाबाईस) काग वेडे, तूं आपले जिवाला कां अवढी कंटाळलीस?

बे०—(मर्यादेनें) तें दादीबायनांच विचारायचं होतं.

खं०—(सोनाबाईस) काग, तूं इला काय कमी जास्ती बोललीस वाटते?

सो०—आ-नायबा. मी असं का बोललुं? अन माला का खबर ही असं कराला जायल म्हणून. मी माजे तोंडाला खीळ घातलसती.

खं०—बरं ते असो. झाली गोष्ट परत येत नाय. आजचा दिवस मोठा आनंदाचा समजला पायजे! एक ते शामराव अबरूमदी सुटून आला अन दुसर इची वेळेवर सुटका झाली! जर का इला कोणी बगीतल नसत ते सगळ फसल असत. शामराव, मला या विश्वासरावनी सगळ सांगितलय. हे बग, झालं ते आतां पुष्कळ झालं. यापुढें तरी संभाळून वागा—

शा०—तें मी सांगून काय उपयोग! करून दाखवीन. विश्वासरावासारखा आपल्या कुटुंबाचें हित चिंतणारा खरा मित्र मला मिळाला हें मी माझं भाग्य समजतों. मी जो सुधारलों त्याचं श्रेय सगळं यालाच दिलं पाहिजे.

वि०—छेः छेः मला काय म्हणून? (हंसून) रंगूबाईला—

शा०—(तिरस्कारानें) नको! तिचं नांव नको आतां काढूं—

(इतक्यांत वामनराव व पुतळाबाई येतात.)

वा०—दादाजी-मी तुमच्याजवळ क्षमा मागण्यासाठीं आलों आहें. (पुतळाबाईकडे बोट करून) इचें म्हणणें ऐकून व इच्या लबाड बोलण्यावर भरंवसा ठेऊन मी अविचारानें तुमच्यापासून निराळा झालों. त्याबद्दल मला आतां पूर्ण

पश्चात्ताप झाला आहे. तुह्मी जर आमच्या अपराधाची क्षमा न कराल तर मग आह्मीं कोणाकडे पहावें—

खं०—अरे, आज हे मी का ऐकतय! (वामनरावास) तुमाला माजी पूर्ण क्षमा हाय. निराळा संसार मांडण्यान का फायदा हाय याचा अनभव तुमाला लवकरच आला अस दिसते! असो! तुमीच आमाला ह्मातार्‍यांना सोडून गेलेत न तुमीच होऊन पुन्हा एकवट रावाला मागता तवं मी तरी कोठचे तोंडान नाय बोलूं. या–खुशाल या. हें घर तुमचच हाय.

वि०—(मनांत) या वेळीं धाकलाभाई असता तर काय मौज झाली असती वरं! ह्मातार्‍याचा आनंद गगनांत मावला नसता! (उघड) दादाजी, मी तुम्हांला सकाळीं काय सांगितलं? तुमचे दुःखाचे दिवस सरत आले आहेत ह्मणून ना?

खं०—हो बाबा. तुजे वाणीला देवान यश दिलं खर. पण विश्वासराव, यान एक गोष्ट कमती हाय. माजा धाकल्या असता तर काय मजा झालस्ती.

(रामा गडी येतो.)

रामा—दादाजी–ओटीवरती एक किरिस्तांव आलय–तुमासनी विचारतय.

खं०—कोण किरिस्तांव? जारे शामा, कोण आलय तो बग. (आंत इंग्लिश ड्रेसमध्यें धाकलाभाई येतो.) अरे हा ते इकडे आला! अरे ये किरिस्तावड्या, हे घर कोणाच हाय? भायेर उभा रा. मर्दी कोठे चाललास?

धा०—दादाजी–मला तुह्मी–

खं० सो० वगैरे—अरे हा धाकलाभाय! (धाकलाभाई सोनाबाईस भेटतो.)

धा०—तोच मी. दादाजी, मी तुमचे जवळ माफी मागण्यास योग्य नाहीं. परंतु, येथून गेल्यावर माझी काय स्थिति झाली–मला किती हाल सोसावे लागले–व तुमच्या बरोबर कपटानें वर्तन केल्याबद्दल माझा जीव किती हळहळत आहे–हें तुह्मांस समजलें ह्मणजे तुह्मी देखील माझ्यावर दया केल्याशिवाय राहणार नाहीं.

खं०—बस्स–(विश्वासरावास) विश्वासराव, तुजं बोलणं अगदीं शबदान शबद खरं झालं रे! (धाकलाभाईस) धाकलाभाय, तूं जरी आमचं पुष्कळ नुकसान केलयस तरी पण या वखताला तुला माज्यान नाय बोलवे नाय. मी मोठ पोट करून सगळ्यांचे अपराध पोटान घालतय. सकाळ भटाला बोलावून प्रायश्चित्त घेऊन सुद्ध हो. पण कारे, नेलस त्याच्यांतल काय पण परत आणलयस का?

वि०—(धाकलाभाईकडे पाहून हंसत) जाऊंद्या दादाजी आतां. सलामत घरचे घरीं परत आला हेंच समाधान—

खं०—हो खरंच–(सोनाबाईस) अग ए–त्या तुजे सुनाना तुजे पदरान घे–त्यांना पोटचे सोकऱ्यांसारख्या वागव–(पुतळाबाई व वेनाबाई यांस) अन तुमी पण तिचे बरोबर नीट वागत जा. सासू हाय–दोन सबद बोलली तरी ती आपले बऱ्यासाठींच बोलतय–अस समजा. अन तुमी सगळे मिळून हें घर पुन्हा नांदतं करा. वग विश्वासराव, घर कसं पुन्हा हंसाला लागल ते?

वि०—त्यांत काय नवल! अहो, मुलं बाळं ही एक घराची शोभाच आहे. ही सर्व संतति ईश्वरकृपेनें तुह्मांला मिळाली असतांही कांहीं दैविक कोपानें त्रास भोगावा लागला! तथापि शेवट गोड झाला हीच ईश्वराची कृपा—

खं०—अन विश्वासराव, देवाचा अवडा कोप होवाचं कारण पण माजे ध्यानांत आलय. ते लोकांच घेतलेल सोनं–ते नडलं. ते घरान होत तवं असे हालहवाल झालते. न ते एकदाच गेलं–त्याचे बरोबर घरानच दुसरपण घेऊन गेलं–तंव त्याचे बराबर सगळी बला गेली न बरे दिवस दिसाला लागले. हे वग विश्वासराव, मी देवाची शपथ घेऊन बोलतय ऐक. या धाकल्याच लगीन करीन तवं एक वाल पण हुंडा घेणार नाय! एकवाल पण नाय. तुला न धाकाला जसं बर वाटेल तस तुमी करा. मला कवूल हाय. बर ते, चला आतां. आजचा असा दिवस मी बघीन अस माजे स्वप्नान पण नवत. देवाची मोठी कृपा झाली यान संशय नाय! अन आजचे आनंदाचे दिवसाची याद रावी ह्मणून मी एक जेवण देतय! चल विश्वासराव, आपुण सगळे त्याचे तयारीस लागूं—

(जातात.)

समाप्त.



खं० * * या धाकल्याच लगीन करीन तंवं एक वाल पण हुंडा घेणार नाय ! एक वाल पण नाय. (पृष्ठ १३६).

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१	१८	गरीबाजवळ	गरिबाजवळ.
४	९	अक्षरशत्रू	अक्षरशत्रु.
६	१३	सदाव्रतास	सदाव्रतांस.
७	६	गरीबांनीं	गरिबांनीं.
८	११	जरूरीच्या	जरुरीच्या.
१२	१३	गरीबांतही	गरिबांतही.
१७	६	यांना	त्यांना
१९	३	लोकांतील बायकांचा	लोकांतील कित्येक बायकांचा
१९	६	वारंवार	केव्हां केव्हां.
२२	२५	तुमचे परभु	तुमचे सारखा परभु.
३०	१४	दृष्टी	दृष्टि.
३९	२७	फर	फार.
४१	१	युक्ती	युक्ति

४८ या पानावर खालीं असलेल्या टिपेंत:-'वाः नामी; हेंच तिचें मर्मस्थल' इतकेंच वाचावें. पुढील भाग रद्द असे.

५८	२८	कसी	कशी.
७३	३	जनन	जननं.
७७	३	नेओ	नेवो.
७८	१	भावजई	भावजया.
१२८	४	ओंजळींत	ओंजळीनें.